मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

अभिनंदन



गोंदियाचे दानशूर उद्योगपति श्री. मनोहरभाई पटेल

वर्ष २४ अंक ११

मार्च १९७०

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

२४ अंक १२

एप्रिल १९७०

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २४] एप्रिल १९७० [अंक १२

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर-१

या अंकाची किंमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

बौद्ध धर्माची वैदिक पार्श्वभूमी

आदिकालीन वैदिक धर्माचार–विचार

पुरोहितांचा काळ (पूर्वार्ध)

डॉ. सर भवानीशंकर नियोगी

प्रस्तुत लेख बराच मोठा असून स्थूलमानाने त्याचे तीन विभाग पडतात. पहिल्या विभागात आदिकालापासून वेदांची उत्पत्ति आणि त्यांतील विचारांचा आढावा घेतला असून पुढच्या भागात उपनिषद्-कालात परमात्म–तत्त्वासंबंधी निरनिराळ्या मनीषींनी व द्रष्ट्यांनी कशा प्रकारची तत्त्वचिंतनात्मक प्रगती केली ते आले आहे. आणि शेवटच्या भागात बौद्ध मताची वेदोपनिषदविचाराच्या पार्श्वभूमीवर चर्चा करण्यात आली आहे. एका महत्वाच्या विषयाचा असा सर्वांगपरिपूर्ण हा लेख तयार करून डॉ. भवानीशंकर नियोगींनी विचारकांचे लक्ष त्याकडे आकर्षित केले आहे. संपूर्ण विचार सुमारे सहा लेखांकांत पूर्ण होईल.

—संपादक

काही बाबतीत बौद्ध धर्म पाश्चात्य विचारधारेशी अधिक मिळता-जुळता, तिच्याशी फारसा दूर नसलेला वाटतो. म्हणूनच, पाश्चात्य विचारवंतांना हा धर्म विचारासाठी अधिक जवळचा असल्यासारखा वाटतो. आपल्या विचार-सरणीच्या चौकटीत ज्याला सहज बसविता येईल असे ह्या धर्म-विचारात काहीतरी आहे, असे त्यांना वाटते. आणि तरी देखील, "एक पौर्वात्य सिद्धान्त" म्हणून बौद्ध-धर्म त्यांच्या बुद्धीच्या मुठीत नीटसा गवसत नाही. "धर्म" शब्दाचा पाश्चात्य लोक जो अर्थ करतात त्या अर्थाने हाही एक धर्म म्हणून ते जेव्हा बौद्ध धर्माकडे पाहायला लागतात त्यावेळी आपण गोंधळात पडलो आहोत असे त्यांना दिसून येते. हा धर्म ईश्वरवादी आहे की अतीश्वरवादी ? आणि मग त्याचा अभ्यास केला म्हणजे त्यांना दिसून येते की तो जसा ईश्वरवादी नाही तसाच तो अनीश्वरवादी किंवा बहुईश्वरवादीही नाही. पाश्चात्यांचा असा गोंधळ उडतो ह्याचे कारण असे की, पाश्चात्य कल्पने-प्रमाणे बौद्ध-धर्म हा काही 'धर्म' नाही. ती एक विचार-प्रणाली आहे. ती एक जीवन-वृत्ति आहे. ह्या कारणामुळेच स्वतंत्र धर्मातीत भारताचे संविधान प्रस्तुत करणाऱ्यांनी भारताचे राष्ट्रीय चिन्ह म्हणून अशोक-चक्र स्वीकारले. भगवान् बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचा २५०० वा वार्षिक दिन संपूर्ण भारतात मानला गेला, तोही ह्याच कारणामुळे.

हे असे असल्याकारणाने तथाकथित बौद्ध मताचे मूळ भारताच्या आध्यात्मिक विचारोद्‌गमातच कसे आहे त्याचा शोध घेणे मनोरंजक वाटते. विचित्र योगायोग असा की डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर ह्या ग्रंथकाराने आपल्या Indian Empire, its Peoples, History and Products ह्या ग्रंथात १८८२ सालीच भाकित करून ठेवले होते. बुद्धधर्म ज्या देशात जन्माला आला त्या देशातच तो परत जाणार असे सांगताना त्याने म्हटले आहे,— "A revival of Buddhism, I repeat, is one of the present possibilities in India. The life and teachings of Buddha are also begining to exercise a new influence on religeous thought of Europe and America. As that teaching becomes

more acuurately known to the western world, it will be divested of its mystical pretensions with which certain of its modern professors have obscured it. Buddhism will stand forth as the embodiment of the eternal verity that as a man sows he will reap; associated with the personal duties of mastery over self and kindness to all men; and quickened into a popular religion by the example of a noble and beautiful life."

बुद्ध-मताची जुलुम-जबरदस्ती करून भारतातून हकालपट्टी करण्यात आली होती काय ? ह्या प्रश्नाचे निर्धाराने व ठामपणाने देण्यासारखे उत्तर म्हणजे "नाही." भारतातील आणि भारताबाहेरील काही स्वार्थी आणि दुराग्रही पुरोहित-वर्गानेच हा गैरसमज पसरविला आहे. धर्माचे पुनरुत्थान करायला निघालेल्या कुमारिलभट्टाच्या प्रेरणेने छळवादाचे थैमान सुरू झाल्याचा उल्लेख काही ब्राह्मणांनी केला आहे. विल्सन आणि कोलब्रुक ह्या दोघा पौर्वात्य भाषेतिहास शास्त्रज्ञांनी या मताचा पाठपुरावा केला आणि त्याचाच प्रतिध्वनी डब्ल्यू. टी. विल्किन्स ह्या लेखकाने अत्यंत अतिशयोक्तिपूर्ण पद्धतीने उमटविला. हा लेखक म्हणतो, "These desciples of Buddha were so ruthlessly persecuted that all were either slain, exiled or made to change theis faith. There is scareely a cese on record where a religious persecution was so successfilly carried out as that by which Buddhism was driven out of India." युरोपात धर्मासाठी जे भीषण अत्याचार घडले त्यांचेच चित्र ह्या लेखकाच्या दृष्टीपुढे होते, हेच ह्यावरून स्पष्ट होते. परंतु कोणत्याही प्रकारच्या पूर्वग्रहांनी दूषित न झालेल्या निर्लिप्त मनाच्या अभ्यासकांनी व पुरातत्त्व संशोधकांनी ह्या पूर्वग्रहदूषित मताचा अगदी स्पष्ट शब्दात इन्कारच केला आहे. ऱ्हाईस डेव्हिड हा अव्वल दर्जाचा विद्वान संशोधक ह्या बाबतीत म्हणतो, "I do not believe a word of it. In the Journal of the Pali Text Society for 1896, I have discussed the question in detail, and have come to the conclusion entirely endorsed by the late Prof. Buhler, that the misconception has arisen from an erroneous inference drawn from the expressions of vain boasting of ambiguous import and doubtful authority.

प्रख्यात पुरातत्त्ववेत्ता मेजर कनिंगहॅम ह्यानेही ह्याच मताची पुष्टी केली आहे. तो म्हणतो, "The idea that Buddhism was systematically persecuted and stamped out of India is supported by not the shadow of any satisfactory evidence; occassionally individual kings like Shashanka may have tried to stamp out by force, but it mainly died the death it deserved. Brahmninism with all its faults is a natural product of humanity. Buddhism appears to be essentially a protest against, rather than itself, a religion."

तथाकथित हिंदुत्वाशी किंवा ब्राह्मणधर्माशी बुद्ध-मताचा किती घनिष्ठ संबंध आहे ते दाखवून देण्यासाठी मी काही प्रमुख विद्वानांची मते येथे उद्धृत करतो. मॅक्समुल्लर म्हणतो, "बौद्ध धर्म म्हणजे ब्राह्मण-धर्माच्या सर्वोत्कृष्ट आविष्काराला दिलेले लोकप्रिय स्वरूप होय. गूढत्वाचा किंवा केवळ व्यक्तिगत अनुभूतीचा जेवढा भाग असेल तो त्यांतून वगळलेला आहे. पुरोहितांची जागा भिक्षूंना दिलेली आहे. आणि हे भिक्षू आपल्या वास्तविक स्वरूपात पूर्वकाळच्या अरण्यवासी ज्ञानी ऋषि-मुनींचेच प्रतिनिधी, त्यांचीच पूर्वपीठिका पुढे चालविणारे होत."

जे. जो. जेनिंग्ज म्हणतो, "बौद्धधर्म म्हणजे ब्राह्मणधर्माची सुधारलेली आवृत्ति होय, ही गोष्ट कधीही विसरता कामा नये. ह्या संज्ञेचा गौतमाने जो सातत्याने बहुमानपूर्वक उल्लेख केलेला आहे, आणि काही वैदिक आणि वैदांतिक सिद्धान्त जे त्याने गृहीतच मानलेले आहेत, त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. ब्राह्मण-धर्माप्रमाणे बुद्धधर्माची पार्श्वभूमीदेखील ब्रह्मतत्त्वच आहे. सर्व प्रकारच्या अनेकत्वाच्या मुळाशी असणारे व त्यात अविरोधी सुसूत्रता निर्माण करणारे, सर्व प्रकारच्या मीपणाच्या जाणिवांचा, विलगपणाचा आणि विरोधाचा एका सुसंवादात लय करणारे व्यक्तिनिरपेक्ष स्वर्गीय एकात्म-तत्त्व म्हणजेच हे ब्रह्मतत्त्व."

ए. के. कुमारस्वामी हा प्रख्यात पंडित म्हणतो, "बुद्धमताकडे जेवढे ओझरत्या, धावत्या दृष्टीने पाहिले तेवढे ते ब्राह्मणधर्मापासून वेगळे असावे असे भासते; पण ह्या ब्राह्मणधर्मातूनच त्याचा प्रारंभ झाला आहे. आपले अध्ययन जसजसे अधिक सखोल होत जाते तसतसे आपल्याला उमजायला लागते की बुद्ध-मताला ब्राह्मण-मताहून निराळे लेखणे, किंवा, बौद्ध-मत असलेच तर कोणत्या विशिष्ट बाबतीत या परंपरेपेक्षा निराळे आहे ते सांगणे दुरापास्तच आहे."

विंटरनित्झचे म्हणणे आहे की, "आपल्या अति-प्राचीनत्वामुळे वेद हे भारतीय साहित्याच्या मूर्धस्थानी आहेत. वैदिक साहित्यात ज्यांनी प्रवेश मिळविलेला नाही, अशांना भारतीय संस्कृती किंवा भारतीयांच्या आध्यात्मिक जीवनाचे ज्ञान कधीच होणार नाही. त्याचप्रमाणे वेदाचे अध्ययन न केलेल्या माणसाला भारतातच जन्म पावलेल्या बौद्ध मताचे आकलनही होणे अशक्यच. कारण, ख्रिस्ती धर्माच्या न्यू टेस्टॅमेंटचा ओल्ड टेस्टॅमेंटशी जसा संबंध आहे तसाच बौद्धमताचा वेदाशी संबंध आहे. वेदप्रणीत जुन्या विचार-प्रणालीची ओळख असल्याशिवाय नव्या विचार-प्रवाहाचे आकलन होणे शक्य नाही.

ड्रेपरने तर अगदी मोजक्या शब्दात ह्या वादाच्या मुळावरच आघात केला आहे. तो म्हणतो, "Vedism developed itself into Buddhism"— वेदप्रणीत विचारानेच प्रगत होऊन बौद्ध-मताचे स्वरूप धारण केले.

खरी गोष्ट अशी आहे की बुद्ध हा त्या काळातला एक सुधारणावादी होता. ज्यात पशु-हत्यादि स्वीकार-लेली होती. अशा यज्ञ-संस्थेशी एकरूप झालेल्या आदिकालीन वेदमान्य पूजाविधीत त्याने सुधारणा घडवून आणली. महाकवि जयदेवाने रचलेल्या गीत-गोविंद काव्याच्या अष्टपदीत हे अत्यंत निःसंदिग्धपणे दिग्दर्शन करण्यात आले आहे. ह्या काव्यात बुद्धाचे विष्णूचा नववा अवतार म्हणून वर्णन करण्यात आले आहे. ह्या काव्यावरील टीकाकाराने, बुद्ध जरी यज्ञ-संस्थेचा धिःकार करणारा असला तरी त्याने वेदग्रंथा-बद्दल अमान्यता दर्शविलेली नाही, ह्या मुद्यावर विशेष भर दिला आहे ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

वेदासंबंधीचा विचार चर्चेला घेण्यापूर्वी, पाश्चात्य आणि पौर्वात्य लोकांची धर्माकडे पाहण्याची जी दृष्टी आहे तीमधील भेद आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. हा भेद एडमंड होल्मसने आपल्या "Creed of Buddha" नामक ग्रंथात स्पष्ट केलेला आहे. तो म्हणतो, "सुसभ्य समाजाने स्वीकारलेल्या धर्माचे दोन महत्त्वाचे वर्ग पाडता येतात. एक वर्ग ज्यू लोकांच्या धर्मातील जेहोव्हाला सर्वश्रेष्ठ परमेश्वर मानणारा. आणि दुसरा वर्ग भारतीय लोकांच्या ब्रह्माला सर्वश्रेष्ठ परमेश्वर मानणारा. परमपिता परमेश्वराच्या नावा-खाली जेहोव्हा यूरोपवर आणि यूरोपने निर्माण केलेल्या वसाहतींवर अधिराज्य गाजवितो, तोच पश्चिमी आशिया खंडावर आणि उत्तर आफ्रिकेवर आल्ला ह्या नावाने सत्ता गाजवितो. आणि जगातील सुदूर पूर्वेकडच्या भागावर ब्रह्माचा अधिकार आहे. भारतावर त्याची प्रत्यक्ष सत्ता चालते, आणि इंडो-चायना, चीन, जपान वगैरे देश त्याच्याच प्रभुत्वाखाली येतात."

ह्या दोन विभागांत एक अत्यंत महत्त्वाची-अनु-ल्लंघनीय म्हटली तरी चालेल अशी दरी आहे. ही दरी ओलांडता येईल का ?

एक नवा जागतिक मानवी समाज निर्माण होण्यासाठी ही दरी ओलांडणे अगत्याचे आहे. पूर्व आणि पश्चिम हे शब्द परस्परावलंबी आहेत एवढेच नव्हे तर ते एकामेकाला पूरक आहेत हे दाखविण्याकडे ह्या नव्या विचारधारेचा कल वळू लागलेला दिसतो आहे. सर्व मनुष्यमात्राने एकामेकाच्या बरोबर चालावे, बोलावे, विचार करावा आणि पृथ्वीवर शांती प्रस्थापित करावी असे वेद साऱ्या जगाला आवाहन करतात. वेद शब्दाच्या निर्देशित अर्थाच्या सीमा इतक्या विस्तृत आणि सर्व-संग्राहक आहेत की त्यात मानवी जीवनाच्या आणि कार्यसमुच्चयाच्या प्रत्येक पैलूचा समावेश सुखाने होऊ शकतो. निरुक्तात सांगितल्याप्रमाणे त्याचा अर्थ ज्ञान होणे, प्राप्त करून घेणे, विचार करणे असा आहे. वेदाचे क्षेत्र सीमाहीन् अनंत असे आहे. (अनंताः वै वेदाः) मूळ वेद तीन होते,-संहितारूप (प्रार्थना) ऋग्वेद, कर्मकांडरूप यजुर्वेद आणि संगीतप्रधान सामवेद.

त्रयी विद्या (त्रिवर्गीय ज्ञान) या नावाने ओळ-खला जाणारा हा तीन वेदांचा समूह एका वर्गात

जोडतो. पाली भाषेत या 'त्रयी विद्या' शब्दाचे रूप 'त्रिविज्जा' असे आहे. कालांतराने यात चवथ्या वेदाची भर पडली आणि त्याला धार्मिक मान्यताही प्राप्त झाली. याचे नाव अथर्ववेद अथवा ब्रह्मवेद, म्हणजे मंत्र–ज्ञान. ऋग्वेद निसर्गसृष्टीबद्दलच्या आत्यंतिक प्रेमाने आणि मानव व देवता यांच्याबद्दल सहानुभूतीने ओथंबलेला आहे. ह्या भावना द्रष्टयांच्या आणि गायकांच्या हृदयांतून प्रार्थनेच्या आणि भक्तीच्या उमाळ्याने त्यात बाहेर पडल्या आहेत. पण अथर्ववेद म्हणजेच ब्रह्मवेद भूत–प्रेत–पिशाच्चादिकांचे आणि त्यांच्या द्वारा होणाऱ्या अनाकलनीय दुर्व्यवहाराचे निराकरण करणाऱ्या मंत्र–तंत्रादिकांनी खच्चून भरलेला आहे. बौद्ध धर्माच्या दीघनिकायातील ब्रह्मजाल सुत्तात किंवा उपनिषदात आढळते त्याप्रमाणे हे काल्पनिकताप्रधान विचारधारेच्या रोखाने उचलले गेलेले पहिले पाऊल असावे.

वेदाची सर्वमान्य व्याख्या अशी आहे की त्यात प्रार्थना–मंत्रांचा व गीतांचा यज्ञविधीचे निरूपण करणाऱ्या ब्राम्हणांचा, आध्यात्मिक विचार–मंथनाला वाहिलेल्या आरण्यकांचा व उपनिषदांचा समावेश आहे.

वेदाचा प्रवास यूरोपकडे कसा झाला ते पाहणे मनोरंजक आहे. व्हाल्टेर हा आपल्या काळातील सर्व प्रकारच्या आततायी आणि अतिरेकी मतप्रतिपादनावर अत्यंत कठोरपणे हल्ला चढविणारा विद्वान लेखक सर्वच लिखाणात आणि विशेषेकरून आपल्या "The Manners and Spirit of Natives" या प्रबंधात यजुर्वेदासंबंधी बोलताना, हा वेद म्हणजे ब्राह्मण वर्गाच्या प्राचीन ज्ञानाचे भांडारच होय असे प्रतिपादन करतो. त्याच्या प्रतिपादनाकडे सुरुवातीला कोणी फारसे लक्ष दिले नाही; पण जेव्हा हर्डर या दुसऱ्या एका विद्वानाने, वेद व संस्कृत साहित्य म्हणजे हिंदूंच्या ज्ञानाचा खजिनाच असे आवर्जून सांगावयास सुरुवात केली, त्यावेळी लोकांचे लक्ष त्या गोष्टीकडे प्रकर्षाने ओढले गेले. त्यानंतर युरोपीय विद्वानांचे लक्ष संस्कृत साहित्याकडे वळले. त्यांना संस्कृतचा 'शोध' लागला, आणि इ. स. १८०५ साली कोलब्रुक या पंडिताने लिहिलेले Essays on the Vedas" हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या ग्रंथात त्या लेखकाने वैदिक वाङ्मयातील संपूर्ण विचार–क्षेत्राचा महत्त्वपूर्ण असा आढावा घेतला होता. पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर सुमारे वीस वर्षांनी फ्रेडरिक रोसेन या जर्मन पंडिताला त्या गोष्टीचे महत्त्व पटले आणि हे विचार–धन यूरोपिअन विद्वानांपर्यंत पोचविण्याची गरज त्याला भासू लागली. त्याने ऋग्वेद प्रसिद्ध केला, पण अन्य ग्रंथांवरील कार्य पुरे होण्यापूर्वीच तो वारला. इ. स. १८४६ मध्ये स्टुट्गार्ट येथील व्हॉन् रुडोल्फ रॉथ या पंडिताने "On the Literature and History of the Vedas" हा क्रांतिकारी ग्रंथ प्रसिद्ध करून या विषयाला फार जोराची चालना दिली. इ. स. १८५२ साली "रॉयल लायब्ररी ऑफ बर्लिन" या संस्थेने संस्कृत साहित्याचा एक मोठा व महत्त्वाचा संग्रह मिळविला आणि त्याच्या अध्ययनाने ए. वेबर या लेखकाने "Studies in Indian Literery History" हा ग्रंथ प्रसिद्ध केला. यांत त्याने वेद–ग्रंथांचा सांगोपांग आढावा घेतला होता. मागाहून मॅक्समुल्लरने "History of Ancient Sanskrit Literature" हा ग्रंथ लिहून वेबरच्या ग्रंथाला पुस्ती जोडली. गेल्या शतकाच्या शेवटी–शेवटी मॅकडोनेलचे History of Sanskrit Literature प्रसिद्ध झाले. त्याच सुमारास The Sacred Books of the East, Pali Text Society, वगैरेची प्रकाशने बाहेर पडली आणि विन्टरनित्झने लिहिलेला History of Sanskrit Literature ग्रंथही विद्वानांच्या हाती पडला.

वैदिक साहित्याचे आणि वेदप्रणीत धर्म–मार्गाचे प्रास्ताविक म्हणून या साहित्यात प्रगट झालेली विचार–धारा कशी प्रवाहित होत गेली त्याचे निरूपण करणे आवश्यक वाटते. ऑगस्ट कॉम्टने वर्णन केलेल्या "तीन अवस्था" मधून हा प्रवाह प्रगत होत गेला असे म्हणायला हरकत नाही. पहिली अवस्था देवप्रामाण्यवादी धर्मशास्त्राची. या अवस्थेत विषयाचे आकलन देव–प्रामाण्याच्या पद्धतीने करण्यात येते. सर्वच प्रश्न जे पुढे येतात ते कोणत्या तरी दैवी शक्तीच्या कारकत्वाने, असे या अवस्थेत मानले जाते. उदाहरणार्थ, आकाशस्थ ग्रह–नक्षत्रादी देवस्वरूपी मानले जातात, त्यांना अतिथी म्हणून पाचारण केले जाऊ शकते, त्यांना खायला–प्यायला देऊन व त्यांची स्तुती आणि प्रार्थना करून प्रसन्न करून घेतले जाऊ शकते. या अवस्थेत मानवी देह आणि त्याच्याशी संबद्ध असलेली सारी सुखे, ऐहिक

सुखोपभोग, थोडक्यात म्हणजे सर्व शारीरिक वासनांची तृप्ती हेच जीवनाचे इतिकर्तव्य मानले जात असते, आणि याच दृष्टीने विषयाचा विचार झालेला असतो.

यापुढील दुसऱ्या अवस्थेत विषयाचे विवेचन केले जाते ते अतींद्रिय, अशरीरी विचार-कल्पनाच्या बौद्धिक पातळीवरून. उदाहरणार्थ, या अवस्थेत ग्रह-नक्षत्रादी तारकासमूहाकडे देव म्हणून न पाहता त्यांच्या गतिविधीचे निरीक्षण केले जाते; तारका गोल वर्तुळाकार गतीने भ्रमण करीत असतात आणि एक अति संपूर्ण अशी आकृती निर्माण करतात असे येथे म्हटले जाते. मानवी शरीर क्षणभंगुर असल्याकारणाने त्याला रस मानू नये, सर्व वासनांचे निराकरण करण्यात खरे सुख आहे, अमूर्त आणि विश्वरूप अशा ब्रह्म-तत्त्वाशी एकरूप होऊन अमरत्व प्राप्त करून घेणे म्हणजेच खरा आनंद, असे या अवस्थेतील विषय-प्रतिपादनाचे स्वरूप असते.

यानंतरची तिसरी अवस्था म्हणजे अनुभवसिद्ध आणि शास्त्रसिद्ध अशा ज्ञानाची. या अवस्थेत विषयाचे काटेकोरपणे निरीक्षण केले जाते, गृहीत धरलेल्या प्रमेयांचे आणि प्रयोगांचे परीक्षण केले जाते, मनुष्य-स्वभावाच्या क्रियाप्रक्रियांचे अध्ययन केले जाते, आणि नैसर्गिक कार्य-कारणभावाच्या सुनियमित तत्त्वाला अनुसरून विषयांचे विश्लेषण केले जाते. या गोष्टीला पुढे भारतात नीतिशास्त्राचे स्वरूप आले. त्याची परिकल्पना बुद्धाच्या मनात उत्पन्न झाली आणि त्याने तिला मोठे रूप दिले. याची परिणती शेवटी झाली ती म्हणजे निर्वाण. आत्मकेंद्रित अशा इच्छा-वासनांचे खंडन, आणि पूर्णत्वाची प्राप्ती असे या निर्वाणाच्या तत्त्वज्ञानाचे द्विविध स्वरूप आहे.

जागतिक अथवा वैश्विक दृष्टी म्हणून आलबर्ट स्वीट्झरने याच मताचा उल्लेख केलेला आहे. तो म्हणतो,-या संसाराचे आणि मानवी जीवनाचे अस्तित्व स्वीकारणे याचा अर्थ असा की, मनुष्य या अस्तित्वाचा जसा स्वतःच्या ठायी अनुभव करतो, आणि ते ज्या स्वरूपात बाह्य जगात वृद्धिगत झालेले दिसते, त्याला काही स्वयंसिद्ध महत्त्व आहे हे मनुष्य गृहीत धरून चालतो, आणि त्याप्रमाणे ते अस्तित्व किंवा जीवन स्वतःचे ठायी पूर्णावस्थेला पोचावे एतदर्थ प्रयत्न करीत असतो. जेथे जेथे माणसाची सत्ता चालू शकते त्या सर्व क्षेत्रात तो या जीवनाला कायम ठेवून त्यात प्रगती घडवून आणण्यासाठी झटतो. याउलट संसार आणि जीवन नाकारणे म्हणजे, स्वतःच्या अनुभव-क्षेत्रातले आणि त्याबाहेरचे विश्व म्हणजे काही तरी निरर्थक, दुःखपूर्ण वस्तु आहे असे होते. अशा स्थितीत मनुष्य आपल्या जिवंत राहण्याच्या इच्छेला मृतप्राय करून आपल्या ठायी असलेली जीवनाची गती रुद्ध करून टाकतो हे एक, आणि दुसरे म्हणजे, तो जग अधिक चांगले बनावे, त्यातील जीवाच्या अस्तित्वाची परिस्थिती अधिक चांगली व्हावी यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व कर्मांचा तो त्याग करतो. येशूख्रिस्ताच्या विचारसरणीतही जगाच्या आणि जीवनाच्या त्यागाची कल्पना आहे हे शेविट्झर मान्य करतो पण ख्रिस्ताच्या विचारसरणीतील त्या बाबतीचे वैशिष्ट्य असे की त्याने मांडलेले नीतिशास्त्र त्या विचारांच्या चौकटीत बसणारे नाही. या नीतिशास्त्राचा हेतु जीवनाचा त्याग नसून त्याचा पूर्णांशाने स्वीकार करणे आणि संसाराच्या सेवेला त्या जीवनाला वाहून घेणे हाच आहे.

मनुष्याच्या हातून जे काही घडले किंवा जे करण्याचे त्याने टाळले त्याचे नैतिक स्वरूप काय ते ठरविण्याचा हा एक अगदी सरळ, प्रत्यक्ष करून पाहण्यासारखा मार्ग आहे यात संशय नाही. कारण त्याचा संबंध संसाराशी आणि मनुष्य-जीवनाशी येतो.

येथे एक गोष्ट आपण लक्षात ठेवायला हवी ती ही की प्रत्येक गोष्टीकडे पाहायचे ते आपल्या पाश्चिमात्य दृष्टि-कोनातून आणि आपल्या मनश्चक्षूपुढे असलेल्या काचेच्या कोणाकृति लोलकामधून, अशी यूरोपामधील पंडितांना स्वाभाविकपणे सवय जडली आहे. वास्तविक पाहता, गोष्ट थोडी वेगळी असायला पाहिजे. एखाद्या सिद्धांताचा खरा-खरा अर्थ विशद करायचा तर, तो विचार ज्यांना प्रथम स्फुरला त्यांची या बाबतीतील दृष्टी शक्य तेवढी आत्मसात करून घेऊन त्या विचाराशी शक्य तेवढे समरस होण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असते. तसे हे युरोपीय विद्वान् करीत नाहीत. रेने गेडनाँ या पंडिताचे म्हणणे हेच आहे.

जीवनाच्या समस्येकडे पाहण्याची प्रारंभकालीन वैदिक दृष्टी व त्यामागील मनोभूमिका कशी होती ते पाहण्याचा आपण आता प्रयत्न करू. या धर्म-संस्थेचे

प्रणयन करणारे किंवा यस्काचार्यांप्रमाणे त्याचा प्रत्यक्ष आचारात अवलंब करणारे जे होते त्यांच्याबरोबर त्याच परिस्थितीत लहानाचे मोठे झालेले जे एतद्देशीय प्राचीन विचारक होऊन गेले त्यांनी या विचारधारेची केलेली अर्थ–मीमांसा आपण लक्षात ठेवली पाहिजे. प्रार्थना–मंत्रांची रचना करणारे ऋषी द्रष्टे म्हणून ओळखले जात असत. जीवनात अनुभवलेल्या प्रत्येक गोष्टीचे अंगीभूत वैशिष्टय ओळखण्याची त्यांच्या ठायी शक्ती होती सर्वसाधारण मनुष्याच्या चर्मचक्षूंना जे दिसले नाही ते अंतश्चक्षूनी टिपून घेण्याचे सामर्थ्य या ऋषींच्या अंगी होते. त्यामुळे वस्तू आणि घटना यांचा वास्तविक स्वभाव–धर्म ज्यांना आकलन करता येतो ते ऋषी अशी व्याख्या रूढ झाली.

आदिकालीन मानव, वास्तव्यासाठी सुस्थिर (घराच्या) निवासस्थानाच्या शोधार्थ इतस्ततः भटकणारा आणि आपल्या नैसर्गिक अवस्थेतच राहणारा असणार. त्याला ठाऊक असणारा कायदा एकच. तो म्हणजे शरीरसामर्थ्याचा—इतिहासात ज्यांचे वर्णन आलेले आहे ते वेदकालीन आर्य याच अवस्थेत राहणारे होते. आता, मनुष्य म्हटला म्हणजे देह आणि मन यांच्या संयोगाने बनलेला प्राणी. देह म्हणजे काय ? देह म्हणजे, या पृथ्वीवर जीवन–धारणा करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शक्तीचा, चैतन्याचा साठा. आणि मनुष्याचे मन ? ते निम्नयोनीत जन्मणाऱ्या इतर प्राण्यांपेक्षा निराळे आहे. ते माणसाच्या आयुष्यातील हालचालींचे नियंत्रण करणारे आणि त्यांचे नियमन करणारे आहे. ते विधायक स्वरूपाचे आहे आणि पुढाकार घेऊन नव्याला प्रारंभ करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी आहे अन्न–पाण्यासाठी, निवाऱ्यासाठी, आपल्या सर्वच शारीरिक आणि ऐतिहासिक गरजा पूर्ण करून घेण्यासाठी मनुष्य निसर्गावर अवलंबून असतो, आणि त्याबरोबरच, आपले नैतिक आणि सरतेशेवटी सामाजिक जीवनही निर्माण करून घेण्यासाठी तो निसर्गाकडेच मार्गदर्शनासाठी डोळे लावून बसलेला असतो.

खरी गोष्ट अशी आहे की, जीवनाचे खरे सत्य असते भावनेत. भावनाच कवीला जन्माला घालते. आणि कवी आपल्या भावनांच्या कल्लोळातून स्वतःला निसर्गाशी आणि निसर्गाच्या कार्यपद्धतीशी एकरूप बनवून घेण्यासाठी धडपडत असतो. आणि अशा रीतीने तो निसर्ग म्हणजे काव्य असा अर्थ लावतो. तो म्हणतो, विश्वं देवस्य काव्यम्. या काव्याची रचना करणारी कोणती तरी दुसरीच, अधिक उच्च श्रेणीची शक्ती आहे, तिला तो देव म्हणतो. त्या शक्तीच्या निरनिराळ्या पैलूंना (अंगांना) तो मूर्त रूप देतो आणि तिच्याशी संपर्क साधण्यासाठी व तिच्याशी आपले नाते जुळवून घेण्यासाठी तो कोणते तरी उपाय तयार करू लागतो. अंतराळातून स्वैरपणे उडत फिरणाऱ्या या वैदिक विहंगमाच्या दृष्टीला यज्ञाचे दर्शन कसे घडले ते पहा. त्याने आपल्या कल्पनेला ज्या सूक्तींच्या रूपाने व्यक्त केले त्या अशा:–"यज्ञाच्या प्रभावामुळे सूर्य उदय पावतो. पंचतत्त्वे ज्याप्रमाणे पृथ्वीचे पोषण करतात त्याचप्रमाणे यज्ञ सर्व जगताचे पोषण करतो." या सूक्तींचे महत्त्व वेगवेगळ्या प्रकारचे आहे, पण एकंदरीने पाहता त्या सर्वांमधून आपल्याला रसरशीत अशा निसर्गकाव्याच्या चैतन्यपूर्ण स्पंदनाचा स्पर्श अनुभवायला मिळतो, हे खरे. अगदी प्रारंभिक अवस्थेपासून तो दैवी सत्तेचे अधिष्ठान आणि तिच्याशी असलेला मानवाचा संबंध याबद्दलच्या गंभीर स्वरूपाच्या धार्मिक कल्पनांचा विकास आपल्या ऋग्वेदातील सूत्रांमधे झालेला सापडतो. प्रथम आश्चर्य आणि नंतर या आश्चर्याला मिळालेले धार्मिक स्वरूपाचे वळण याचे प्रतिबिंब या सूत्रांत कसे उमटले आहे ते पहा:—

हा आधारहीन आणि बंधन नसलेला
खाली किंवा वर जाताना पडत कसा नाही ?
तो कोणत्या शक्तीने चालतो ? कोणी त्याला
पाहिले आहे ? द्युलोकाचा खांब असा स्वर्गाला
मिळून त्याचे संरक्षण करतो.

(ऋग्वेद IV. १३–५)
भाषांतरकार : चित्रावशास्त्री

बाल्यावस्थेतील मनःस्थितीप्रमाणे या काळात त्यांची इच्छा निसर्गाला समजून घेण्याची असावी या विशुद्ध निसर्ग–पूजनामधूनच कल्पितांचा जन्म झाला हे स्पष्ट आहे. पृथ्वी आणि आकाश असे दोन वेगवेगळी जगते असण्याच्या कल्पनेचा प्रथम उदय झाला. हे दोघे म्हणजे एक स्वर्गीय युगुल असून त्या उभयतांचे मीलन सर्व प्राणिमात्राला जीवन देते असा त्याच्याबद्दलची कल्पना केली गेली. त्यांना द्यौस् आणि पृथिवी (स्वर्ग

आणि पृथ्वी) अशी नावे देण्यात आली. द्यौस् हा शब्द दिव् म्हणजे प्रकाशमान होणे या मूळ धातूपासून बनला आहे. या कल्पनेतून पुढे द्यौस्पितर म्हणजे स्वर्गस्थ पिता हा पुढे आला. पाश्चात्य पुराणग्रंथात हा झेडस् आणि जुपिटर म्हणून आला आहे. त्याचप्रमाणे ख्रिस्ती धर्मात त्याला 'आकाशातील बाप' (Father in Heaven) असे म्हटले आहे. या प्रकाशमान द्यौस्मधे दुसरेही अगणित प्रकाशमान राहात, म्हणजे देव राहात. मुळात ह्यांना 'असुर' ही संज्ञा होती. पण पुढे या शब्दाला दुष्ट असा अर्थ प्राप्त झाला, कारण इराणातल्या यांच्या प्रतिस्पर्धी आर्यकुलाने असूर शब्द देव या अर्थाने वापरायला सुरुवात केली (अहूर मज्द), आणि म्हणून देवांना असुर न म्हणता 'सुर' ही संज्ञा दिली गेली. द्यौस् आणि पृथिवी या प्रारंभीच्या स्वर्गीय युगुलाव्यतिरिक्त एक तिसरे जगही होते. याचे नाव होते अंतरिक्ष. या तीन जगतात सर्व देवांची प्रतिष्ठापना केलेली होती. हे सर्व वस्तुतः काल्पनिक देव होते. पुढे वैदिक आणि वेदांतिक साहित्यात हे देव म्हणजे नुसते शब्द होते असे सांगितले आहे. यांनाच पाश्चिमात्य विद्वान 'पुराण–कथा' असे (myths, कल्पित कथा) नाव देतात. कल्पित कथा (myth) शब्दाचा अर्थ निसर्गाच्या एखाद्या घटना–विशेषाचे वर्णन. हे वर्णन कोणा एका विशिष्ट नियमाचा परिपाक म्हणून नसते, तर ते कोणातरी अतिमानवीय अशा बऱ्या किंवा वाईट शक्तीच्या द्वारा घडविलेल्या घटनेचे वर्णन असते. वेदात आलेल्या कल्पितांचे सौंदर्य असे की ज्या नैसर्गिक घटनांनी त्यांना जन्म दिला त्याच निसर्ग–स्वरूपात पुन्हा जाऊन मिळायला त्यांना मुळीच वेळ लागत नाही. नुसता विचाराचा स्पर्श झाला की पुरे. वेदात आपल्यापुढे असे देवांचे एक चक्रच निर्माण करून ठेवलेले आढळते–द्यौस्, वरुण, मित्र, अग्नि, सोम, वायु, यम आणि इंद्र इत्यादी किती तरी! द्यौस् हा बीज उत्पन्न करणारा, वरुण वेढणारा, चंद्र हा मोजमाप करणारा, सूर्य हा प्रकाश पसरविणारा, सविता हा चैतन्य देणारा, पूषन् हा भरण–पोषण करणारा, आणि इंद्र हा पराक्रम गाजविणारा वगैरे वगैरे. हा प्रकाश पसरविणारा अवकाशात भटकत असतो. आकाशावर प्रभुत्व गाजविणारा बादशाही इतमामाचा हा मित्र! अंधकारलेल्या पश्चिमेकडे तो निघून जातो आणि नियमितपणे झळाळणाऱ्या पूर्वेस तो परत येतो. त्याच्या दैनंदिन आणि वार्षिक आवागमन–क्रियेने माणसाला एका अखंड नियमाची, एका कधीही न बदलणाऱ्या कडक शिस्तीची (ऋत) जाणीव दिली. त्या व अशाच अनेक नैसर्गिक घटना म्हणजे इच्छाशक्तीने प्रेरित झालेल्या व्यक्तिगत स्वरूपाची मानवी रूपे मानण्यात आली. त्यांना अविशृंखलित, सुव्यवस्थेचे पालन करायचे असते. ह्या अवस्थेविरुद्ध पृथ्वीतलावर कोणीही जाऊ शकत नाही. निसर्गाच्या अशा या आदि शक्तींना दिव्य, तेजाने झळाळणारे (देव) म्हणून संबोधिले गेले असले तर ते स्वाभाविकच होते.

यानंतर आता, भावनेनंतर, मानवी इतिहास–क्रमाच्या नाटकात रंगभूमीवर बुद्धि प्रवेश करते, आणि अत्यंत वाजवी असा प्रश्न विचारते,––

देवाकडे नेणारा मार्ग कोणता हे खरोखरच कोणी जाणले आहे? कोणी येथे सांगितले आहे? देवांचे श्रेष्ठ प्रकारचे व गूढ असे जे वर्तन आहे, त्याचा वरवरचा भाग मात्र आमच्या दृष्टीस पडतो.

ऋग्वेद III ५४.५–भाषांतर चित्रावशास्त्री

या अतिदूरच्या, खोलीत लपून असलेल्याचा शोध काढण्यासाठी प्रयत्न सुरू असताना कोणी तरी अचानकपणे 'अज एकपाद' च्या कल्पनेवर धडपडला, आणि मग, सर्वप्रथम जन्माला आलेल्या त्या एकच पाय असलेल्या अजन्म्याबद्दल अधिक माहिती मिळविण्यासाठी कुतूहल जागृत झाले. ते पुढे दिलेल्या सूक्तात पहाः—

अजाणता आणि अज्ञानी असा जो मी तो जाणून घेण्यासाठी ज्ञानी कवीला याविषयी विचारतो की ज्या जन्मरहित देवाने हे सहा लोक धारण केले आहेत त्याच्या स्वरूपात काही एकात्मक आहे हे खरे की नाही? (ऋग्वेद I १६४–६ चित्रावशास्त्री)

या संदर्भात ऋग्वेदातील दुसऱ्या एक गूढार्थाने भरलेल्या सूत्राचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्या सूत्रातील संबंधित भाग असा :—

"कोणी इंद्र, मित्र, वरुण व अग्नि असे म्हणतात. हाच तो पक्षयुक्त दिव्य सुपर्ण होय. हा एकच असून शहाणे लोक ह्याला अनेक नावांनी संबोधितात. ते ह्याला अग्नि, यम, मातरिश्वन् असे म्हणतात. (ऋग्वेद I. १४४. ४६ चित्रावशास्त्री).

(पुढील मजकूर पान ५८० वर)

जीवन आणि साहित्य

--ब. स. येरकुंटवार

(उत्तरार्ध)

मानवी जीवन व साहित्य यांचा परस्पर संबंध नीट लक्षात येण्याच्या दृष्टीने भाषेचा मूलगामी प्रवाह व प्रभाव, तिचे स्थान व वैशिष्टय डोळयापुढे ठेवणे अवश्य आहे. उपकरणांच्या साह्याने मनुष्य सृष्टीस पालटतो व त्या क्रियेतच तो स्वतःही बदलतो, तसेच भाषेचे आहे. किंबहुना हात या उपकरणात्मक अवयवापेक्षा वाणी या अवयवाने हीच पालटण्याची क्रिया (transformation) अनेक पटींनी प्रभावीपणे साधली आहे. कारण हातापेक्षा वाणी हे उपकरण अनेकपटींनी अधिक पल्ला गाठणारे आहे. सूक्ष्म व स्थूल अशा दोन्हीही प्रकारचे त्याचे पल्ले आहेत. वस्तुस्थिती अशी दिसते की, मानव स्वतः व भोवतालचे जग यांत देवाणघेवाण जी करतो ती त्याने स्वतःभोवती निर्माण केलेल्या भाषेच्या वेष्टणांतूनच (envelop) करतो. पाच इंद्रियांच्या खिडक्यांमधूनच त्याला जसे जगाचे ज्ञान होते, तसेच भाषेने निर्माण केलेल्या घन पण पारदर्शकही असू शकणाऱ्या पटलातून होते. प्रा. मुक्तिबोधांचा लेख आपल्याला इथेही चांगला उपयोगी पडतो. संवेदनाच्या पूर्वीच इंद्रियाच्या ठिकाणी उपजत असलेला संवेदनाबोधच (perecption) हे पटल निर्माण करण्यात फार मोठा भाग घेतो. इन्द्रिये व मन यांच्यावर जे पूर्वसंस्कार असतात ते संवेदना-बोधाचे स्वरूप जसे निश्चित करतात, तसेच इतरही संस्कार करतात. स्मृती या व्यापक अर्थाच्या शब्दाने जो बहुरूपी अनुभव व्यक्त होतो तो संवेदना-बोधाची जडणघडण करणारा फार मोठा घटक आहे. पूर्वानुभूतीच्या ज्या संस्कारांनी संवेदनाबोधास स्वरूप येते ते मानवी व्यक्तीत किती खोलातून आलेले असतात याचा शास्त्रांनी बांधलेला कयास पाहिला की भाषाजन्य वेष्टणाची पारता जाणवल्याशिवाय रहात नाही. 'डेप्थ सायकॉलॉजी'च्या एका शाखेत--डॉ. युंगची ॲनॅलायटिकल सायकॉलॉजी--वंशात्मक अबोध-मनाचा (racial unconscious) जो सिद्धांत आहे तो स्मृतीला व संस्कारांना किती तरी खोलात नेतो. व्यक्तीच्या गर्भावस्थेपासूनचे स्मृतिसंस्कार, वंशाचे स्मृतिसंस्कार आणि तसेच मागे गेल्यावर, तर्कसंगतपणे सुचणारे पूर्वजन्म स्मृतिसंस्कार ही परंपरामालिका ध्यानात आली की संवेदनाबोधात अनुस्यूत असलेले अनंत धागेदोरे मनश्चक्षूपुढे उभे राहतात; आणि मग भाषेने मानवाच्या भोवती उभारलेल्या वेष्टणाचे प्रभुत्व व सर्वगामित्व पटू लागते. या वेष्टणाने लाभ व हानी दोन्हीही मानवाच्या पदरात पडले आहेत. भाषेने मानवी जीवन समृद्ध व प्रगत झाले आहे हे जितके खरे, तितकेच हेही खरे आहे, की तिच्यामुळेच ते कोंडीत सापडून, गुदमरल्यासारखे होऊन, संकुचित व अवास्तवही बनले आहे. भाषा सत्याचे ज्ञान जितके देते, तितकीच ती त्यापासून वंचितही करते. भाषेचे हे द्विविध सामर्थ्य व ही द्विविध प्रकृती भारतीयांनी चांगली ओळखली होती असे दिसते आणि म्हणूनच शब्दप्रामाण्य व शब्दब्रह्मनिरसन ही दोन्हीही अंगे त्यात ठळकपणे दिसून येतात. शब्दशास्त्राचा सखोल व अपार विस्तार भारतीयांत जेवढा झाला, तेवढा जगात इतरत्र कोठेच झालेला दिसून येत नाही. 'शब्दाचे सम्यक् ज्ञान त्याचा सम्यक् प्रयोग केला तर तो कामधेनूप्रमाणे स्वर्गात व इहलोकात सर्व इच्छा पुरविणारा होतो' हे महान् शब्ददर्शन-भाष्यकार पतंजलि-भारतीयांच्या प्रज्ञेचे कोणासही कौतुक करावयास लावील !

भाषा साहित्यात परिणत होताना हा आपला द्विविध स्वभाव टाकीत नाही, उलट तिला जास्त प्रौढता येते. ज्या प्रगल्भतेने साहित्य मानवास सत्यदर्शन

घडविते, त्याच प्रगल्भतेने त्यास त्यापासून दूरही नेते; आणि म्हणूनच साहित्याचे दोन प्रमुख प्रकार दिसून येतात. एक प्रकार, जगास पालटविणारे व मानवासही पालटविणारे साहित्य हा आणि दुसरा प्रकार, जगास व स्वतः मानवासही आपल्या अघटित-घटना-पटीयसी अशा मायावी सृष्टीत गुरफटून ठेवून ज्ञान-अज्ञानाच्या चिरंतन फेऱ्यात टाकणारे साहित्य हा. मानवाचे व जगाचे स्थित्यंतर (human and world transformation) घडविणाऱ्या साहित्याची प्रकृति व ज्ञानाज्ञानाच्या शाश्वत संधि-फेऱ्यामध्ये टाकणाऱ्या व घुमविणाऱ्या साहित्याची प्रकृति यांत महदंतर राहील यात शंका नाही. 'कलेकरिता कला' की 'जीवनाकरिता कला' असले वाद दुसऱ्या प्रकारच्या साहित्यातच माजू शकतात, पहिल्या प्रकारचे साहित्य या वादापासून दूर असते.

काव्य, कथा, कादंबऱ्या, नाटक इ. प्रकार असलेल्या साहित्याच्या निर्मितीबाबत देशी व विदेशी साहित्यमीमांसकांनी आजवर खूप खल केला आहे. नाना उपपत्त्या मांडल्या आहेत. त्यात शिरण्याचे इथे प्रयोजन नाही. भाषा हे मानवाचे अंतर्जीवन बाहेर प्रकट करणारे, जगाला व स्वतः मानवालाही पालटवून टाकणारे एक अत्यंत प्रभावी उपकरण आहे ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे साहित्यात परिणती झाल्यावर तिने प्रथमतः व प्रमुखतः काय साधले पाहिजे, याबद्दल वाद होण्याचे कारण नाही. उपकरण म्हटले, की विनियोग आलाच. ज्यात विनियोग नाही ते अकरणात्मक. म्हणजे विनियोगप्रधान साहित्य व विनियोगशून्य साहित्य असे साहित्याचे मूलभूत भेद पडतात व तसे ते पडणे अपरिहार्य आहे. मानवाने आजवर दोन्हीही प्रकारचे साहित्य निर्माण केलेले आहे. तरीही जे साहित्य विनियोगप्रधान आहे व ज्याचा विनियोग गंभीर व सनातन आहे, ते मानवाच्या जीवनात ललामभूत होऊन बसले असल्यास नवल नाही.

साहित्याचा अभ्यास तीन चार प्रकारांनी होतो वाङ्मयीन, ऐतिहासिक, तत्त्विक अशा प्रकारांप्रमाणेच विनियोगात्मक प्रकार हाही आहे. एक उदाहरण मी घेतो. महाभारतात येणाऱ्या विष्णुसहस्रनामाचा आपण वरील दृष्टींनी जसा विचार करतो, तसाच त्याचा विनियोगाच्या दृष्टीने विचार धर्मशास्त्र व आयुर्वेद करतो. त्याची तदंतर्गत असलेली फलश्रुती याचेच गमक आहे. आयुर्वेदाने 'ज्वरचिकित्से'त (चरक-संहिता) सर्व उपचार सांगितल्यावर अखेरीस 'विष्णुसहस्रनामानं चराचरपतिं विभुम् । स्तुवन्नामसहस्रेण ज्वरान् सर्वान् व्यपोहति ॥' (अ. ३, श्लो. ३११-३१२ चिकित्सा स्थान) हा उपाय सांगितला आहे. प्रयोगदृष्ट्या यात किती तथ्य आहे हा मुद्दा वेगळा, तो संशोधनाचा विषय आहे. पण साहित्यिक कृतीकडे विनियोगाच्या दृष्टीने पाहण्याचा त्यातला अभिप्राय अत्यंत उद्बोधक आहे. भारतीय प्रज्ञावंतांच्या मनोधारणा व प्रज्ञालोक यांच्या वैशिष्ट्याचा तो साक्षीदार आहे. फार लांब कशाला जावयाचे ? खुद्द श्रीज्ञानदेवीच एतद्विषयक मोठा भारदस्त व विश्वसनीय साक्षीदार आहे. साहित्य म्हणून श्रीज्ञानदेवीचा अद्वितीय अधिकार जगन्मान्य आहे. श्रीज्ञानदेवी म्हणजे गगनचुंबी प्रतिभेचा मोकळाचाकळा उद्दाम शृंगार, अभिजात व सत्त्वघन असा ! पण ही श्रीज्ञानदेवी, तिच्या कर्त्याच्या मनोगतानुसार दिव्य मुशीत आटविलेले व हेतुपूर्वक उपसलेले एक खरप्रभावी शस्त्र आहे (साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र । पैं संसारु जिणतें हें शस्त्र । आम्हां अवतरवी ते मंत्र । अक्षरें इयें ॥ १५.५७७). 'दृष्टादृष्टविजया'च्या महत्त्वाकांक्षेने आर्त व कलिकलित जीवांच्या हाती ते त्याने मोठ्या कळवळ्याने व नाजुकपणाने सोपविले आहे. त्याकरिता त्याने 'विश्वेशरावा'स दान मागितले आहे, ते मिळाल्याच्या अपूर्व समाधानाने तो उदंड सुखावला आहे आणि अखेरीस 'ग्रंथोपजीविके'चा असा गुलाल उधळून गेला आहे, की 'पुढती पुढती पुढती । इया ग्रंथा-पुण्यसंपत्ति । सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजे ॥' आतापर्यंत वाणी या उपकरणाचा, त्याच्या स्थित्यंतर घडविणाऱ्या अपूर्व सामर्थ्याचा, त्याच्या सजीव प्रकृतीचा जो ऊहापोह केला त्याचे मूर्तिमंत उदाहरण श्रीज्ञानदेवीच्या रूपाने आपल्या समोर ज्वलंतपणे उभे आहे !

अशा विनियोगप्रधान साहित्याची सृष्टी भारतवर्षातच अधिक फुललेली दिसते, असे, कोणताही दुरभिमान व मिथ्याभिमान न बाळगता, म्हणता येईल. जगात जुन्यातले जुने विनियोगप्रधान साहित्य म्हणजे वेद. ग्रंथांची फलश्रुती हा प्रकार विनियोगप्रधानतेमुळेच उत्पन्न होतो. महाभारतात, रामायण, पुराणे इ. अनंत ग्रंथांची फलश्रुती भारतात जशी बहरली,

तशी जगातील वाङ्मयात इतरत्र कुठे बहरली असेल असे वाटत नाही. भारतात विनियोगप्रधान वाङ्मयाबरोबरच विनियोगशून्य साहित्यही भरपूर निर्माण झाले आहे; पण त्या बाबतीत दोन गोष्टी लक्षात घेण्याजोग्या आहेत. त्यांना एक तर गौणच लेखले आहे आणि दुसरे असे, की जिथे कुठे त्यांना मानाचे स्थान मिळाले आहे तिथे देखील त्याचा पालट घडविण्यात उपयोग झाला आहे अथवा होणे शक्य आहे असे दिसत असल्यामुळेच तसे झाले आहे. संस्कृत भाषेतील साहित्य असो की विविध देशी भाषातील साहित्य असो, यांत हे दोन भेद पडलेले दिसतात आणि त्या दोहोंची वैशिष्ट्ये व स्थाने ओळखण्यात भारतीयांनी दाखविलेली प्रज्ञा अलौकिक व विनतोड आहे. त्या दृष्टीने मराठीत अलीकडे संतवाङमय, पंतवाङमय इ. जे फरक दाखविण्यात येतात ते मननीय आहेत. विनियोगप्रधान असलेले संतवाङमय, विनियोगशून्य असलेले पंतवाङमय इ. प्रकाराने या रूढ होऊ लागलेल्या संज्ञांच्या व्याख्या करता येतील. शब्दच्छलाने आणखी असेही म्हणता येईल, की केवळ मौजेखातर उत्पन्न झालेले विनियोगशून्य वाङ्मय 'पसंत वाङ्मय' असे म्हणता येईल, तेच विनियोगशून्यतेपासून विनियोगहानीपर्यंत ताणले गेले, की 'अ–पसंत' अथवा 'अप–संत' (संतवाङमयापासून अप म्हणजे दूर दूर गेलेले!) वाङ्मय म्हणता येईल !

विनियोगप्रधान साहित्य स्थित्यंतर अथवा पालट ढविते म्हणजे काय करिते ? ही शंका सहजच कोणाच्याही मनात उत्पन्न होईल. तिचे निरसन करण्याचा आपण थोडा प्रयत्न करू या. मानवी जीवनाचे जरा क्ष्म निरीक्षण केले, की मानवातील एक आंतरिक धडपड विचारवंतांच्या लक्षात येते. मानवी व्यती संस्कृत असो की असंस्कृत असो, तरुण असो की वृद्ध सो, श्रीमंत असो की दरिद्री असो, स्त्री असो की ष असो, तिला अहर्निश, 'आपण जखडले गेलो ीत, या बंधनांतून सुटले पाहिजे' असे काही तरी मिक वाटत असते; मग हे वाटणे जाणीवेत आलेले ो अगर नसो. शरीराचे विविध व्यापार, सवयी ातेने करावे लागणारे दैनंदिन व्यवहार इ. इ. ींची इतकी बंधने माणसाला जखडून ठेवीत ात, की तो त्यांतून सुटका करून घेण्याची तृष्णा ीत असतो. सुट्टी अथवा विश्रांती हिला मानवी जीवनात स्थान यामुळेच आहे. शेणात रमणाऱ्या शेणकिड्यांप्रमाणे बंधनांनी घडलेल्या जीवनात एखाद्या दीन दासाप्रमाणे माणूस पुष्कळदा रमताना दिसत असला, तरी अधूनमधून त्याला त्यांचा उबग येतो, वीट येतो आणि तो ते झुगारून देण्याच्या मनःस्थितीत येतो. देहाचे बंध व मनाचे बंध ढिले करून या दोहोंच्या जाचातून बाहेर पडण्याच्या दोन दिशा असू शकतात. एकतर त्यांच्यावर चढावयाचे अथवा त्यांच्याखाली घसरावयाचे. वर आणि खाली या अर्थातच सापेक्ष संज्ञा आहेत. वर आणि खाली म्हणजे या परस्परविरुद्ध दिशा कोणत्या अपेक्षेने समजावयाच्या याची काहीशी कल्पना देण्याजोगी आहे. माणसाच्या ठिकाणी अश्लीलतेची व व्यसनासक्तीची जी प्रवृत्ती दिसून येते ती कशाकरता याचा विचार केला तर असे दिसते, की देहाचे व मनाचे बंध तोडून मोकळे होण्याकरिता मानवाने हे मार्ग पत्करलेले दिसतात. मनुष्याला अधूनमधून युद्धाकरता जी तीव्र आस लागलेली दिसून येते, रोमहर्षकता व अद्भुतता यांत विहार करावासा त्याला जो वाटतो, चार मंडळींत व झुंडीत जमा होऊन थिल्लरपणाने व हुल्लडपणाने वागण्याची जी अनावर लहर येते तीत त्याची खालच्या दिशेने घसरण्याची प्रवृत्ती दिसून येते. ॲल्डस हक्स्लेसारखे लोक 'Cramping limitations of their ego.' 'periodical holidays from their too familiar, too squalid littleself,' 'subnormal, sub-human world of unrestrained feeling and uncriticized belief' 'member of crowd an experience closely, akin to alcoholic intoxication' इ. भाषेत याच देहबंधाचे व मनोबंधाचे वर्णन करीत असतात. या भाषेवरून मनुष्य, विशेषतः यंत्रबद्ध समाजाचा मनुष्य, किती जखडलेला असतो याची कल्पना येईल पश्चिमेतील समाजवादी राष्ट्रांत व पक्षांत स्वातंत्र्य व आत्मविमुखता (alienation) या बाबतचा जो उसळता ऊहापोह चालू आहे आणि समाजवादी राष्ट्रांतही या दोन्हीही गोष्टींना विलक्षण ऊत आलेला असल्याचे आक्रोश करून जे सांगण्यात येत आहे, ते प्रस्तुत मुद्याच्या दृष्टीने मुद्दाम उल्लेखनीय आहे. गुंगी आणणारी, सुस्त करणारी, कैफ आणणारी द्रव्ये माणूस आजवर वापरीत आला आहे, नाना प्रकारच्या अश्लील कृती (वाङ्मयीन देखील) तो करीत आला आहे व तद्द्वारा खालच्या दिशेने देहबंध व

मनोबंध शिथिल करीत आला आहे, बेवंद होत आला आहे. याच्या उलट, वरच्या दिशेने देहबंध व मनोबंध शिथिल करण्याचा प्रयत्नही मनुष्य करतो. त्यातूनच साहित्य, कला, शास्त्रे, तत्त्वज्ञान इ. चा जन्म होतो. ज्या साहित्याच्या सेवनाने मनुष्याला देहबंध व मनोबंध यांतून सुटण्याचा (Cempulsions, oppressions and tyrann'ies of ones own personality) आणि समृद्ध झाल्याचा अनुभव यतो, ते साहित्य वरच्या दिशेने माणसास उचलणारे आहे, असेच कोणालाही कबूल करावे लागेल. हे साहित्य अर्थातच बेबंद करणारे राहू शकणार नाही; अवकाशयानांतील मानवाने पृथ्वीकडे पाहावे तशा तऱ्हेने पाहण्याची व बंधनातीत होण्याची संधी निर्माण करून देणारेच ते राहावे हे स्वाभाविक आहे. हेच साहित्य मानवाला व जगाला पालटविणारे असते. ज्या साहित्याने ' self transcendence ' साधत नाही, ते अभिजात नाही असे पर्यायाने म्हणता येईल. श्रीसमर्थांनी 'दासबोधा 'त ग्रंथाची जी व्याख्या केली आहे, ती या प्रतिपादनाचे स्पष्टीकरण आहे. साहित्याचा, लेख, कथा, कादंबरी, नाटक, काव्य इ. पैकी कोणताही प्रकार असो, त्याचा असा विनियोग होण्यातच कृतार्थता आहे. अक्षर वाङमयाची खरी प्रकृती अशी. ज्या वाङमयाने अथवा साहित्याने माणूस 'वर उचलले गेलो आहोत' असा केव्हाही अनुभव घेऊ शकेल, जीवनात काही तरी श्रीमंती आली आहे असा प्रत्यय कोणत्याही काळात घेऊ शकेल, तेच अक्षर ठरेल. अक्षर म्हणजे झरून न जाणारे! माणसालाही झरू न देणारे!!

साहित्याचा या दृष्टिकोनातून विचार केल्यास अभ्यासक या पदावर येऊन पोचतो, की साहित्य हे जीवनाचे नुसते प्रतिबिंब नव्हे. श्री. गोडसे यांनी अलिकडे 'पोत' नावाच्या आपल्या पुस्तिकेत जी साहित्य व कला यांची मीमांसा केली आहे, ती अपुरी आहे असे वाटल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या विवेचनाच्या बुडाशी, आज एकांगी व सांप्रदायिक ठरलेला मार्क्सवादी दृष्टिकोण आहे. याचा अर्थ असा नव्हे की साहित्यात जीवनाचे प्रतिबिंब नसते आणि केवळ 'साहित्याकरिता साहित्य' या ब्रीदाने प्रवृत्त होऊन त्याची निर्मिती होत नाही. साहित्याचे दोन प्रकार मी दाखविलेच आहेत. एक दृष्टांत देऊन असे म्हणता येईल, की मानवी ज्ञानाप्रमाणेच साहित्यही मुळात जुळ्या प्रवृत्तीचे आहे. कोणत्याही काळी मानवाला जे ज्ञान होते ते निरुपाधिक (absolute) व सोपाधिक (relative) अशा जुळ्या स्वभावाचे असते. काही शाश्वत ज्ञानाचा अंश व काही तात्कालिक ज्ञानाचा अंश. लेनिनसारख्या मार्क्सवाद्यालाही ही वस्तुस्थिती मान्य करावी लागली आहे. (Materialism and Empirio-criticism) त्याचप्रमाणे साहित्याचेही आहे असे म्हणता येईल. प्रतिबिंबात्मक साहित्य आणि देश-काल-वस्तु या भेदाच्या अतीत असलेले साहित्य. मनुष्य प्राण्याच्या ठिकाणी स्वयंभू निर्मितीचा (creativity) जो उत्कट व निरंकुश गुण आहे त्यामुळे तो जावबेल तितके देश-काल-वस्तु-भेदाच्या अतीत जातो व ज्ञान संपादन करतो. अर्थात् यातही व्यक्तीनुसार तरतमभाव दिसून येतोच. मनुष्याला पालटविणारे, ज्याचा खरा विनियोग होऊ शकतो ते साहित्य दुसऱ्या प्रकारचे. प्रतिबिंबात्मक साहित्याने माणसात काही काळ बदल घडवून आणलेला इतिहासात दिसून येतो. पण ते सुकतेही तितक्याच लवकर, आणि त्याचे सेवन करणारा मानवही पूर्ववत् बनतो तितक्याच अल्पावधीत. हवा भरावी तसा भरला गेलेला मानव तितक्याच वेगाने रिक्त व प्रसंगी छिद्रबहुल बनतो. अशा साहित्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे गेल्या तीनशे वर्षांत उत्पन्न झालेले युरोप अमेरिकेतील वेगवेगळ्या राष्ट्रांचे राष्ट्रभक्तीने ओथंबलेले पुष्कळसे वाङ्मय. याच्या उलट वेदवाङ्मयाचे उदाहरण देता येईल. एच्. एच्. गोवेन याने आपल्या ग्रंथात पुढील अभिप्राय दिला आहे; " India literature has an intrinsic value which no remoteness avails to destroy. For sacredness, variety and continuity scarcely any other may compare with it. As for sacredness, no other scripture, not even our Bible, may compare with the Veda in its continuity or in the matter of general acceptance." (A Histry of Indian Literature, P. 8. 1931 Edn.) इथे अशी शंका येण्याची शक्यता आहे, की वैदिक लोकांनी त्या वाङ्मयाला पवित्र समजून केवळ धार्मिक श्रद्धेने जतन करून ठेवले म्हणूनच ते अक्षर समजले गेले. परंतु ही शंका बरोबर नाही. कारण धार्मिक श्रद्धेने तीच गोष्ट जतन केली जाते, की जी विनियोगप्रधान आहे. वेदा-

ध्ययन हे 'human transformation' करणारे उत्तम साधन म्हणजे उपकरण आहे, ही दृढ धारणा सर्व काळात आढळून येते. गीतेने 'स्वाध्याय यज्ञ' हा कर्मयोगाचा एक प्रकार सांगितला आहे व पतंजलीनेही तो 'क्रियायोग' (योगसूत्रे) ठरविला आहे. कोणत्याही काळात वेदाचा हा विनियोग करता येऊन त्याच्या अध्ययनाने अधिकारी मानव स्वतःचे व भोवतालच्या जगाचे स्थित्यंतर (transformation) घडवून आणू शकते, हा वैदिक धर्माचा दृढ विश्वास आहे व ही अव्याहत परंपराही आहे. 'वेदाअंगी सामर्थ्य नसे। तरी वेदास कोण पुसे। म्हणोनि वेदीं सामर्थ्य असे। जग उद्धरावया॥' असे दासबोधा'त श्रीसमर्थांनी व 'तरावया आधी शोधा वेदवाणी' या प्रकारे अभंग–गाथांत श्रीतुकारामांनी जे दटावणीपूर्वक सांगितले आहे ते यामुळेच. ऋग्वेदातील ऋषी वाणीच्या दिव्य प्रभावाबद्दल आणि तिचा आत प्रवेश झाल्यामुळे आलेल्या धन्यतेबद्दल व तेजस्वितेबद्दल वारंवार उतराई झाल्याचे आढळून येते.

उत्तम साहित्य व कला यांची एक कसोटी सांगण्यात येते. ती ही, की त्यांचा आस्वाद घेणाऱ्याला स्वतःचा काही विसर पडतो, त्याचे आंशिक देहभान हारपते. ही कसोटी विनियोगप्रधान साहित्याचे अंतरंग जास्त विशद करते. खोळ गळून पडावी, त्याचप्रमाणे माणसाचा देहबंध व मनोबंध गळून पडावयास अथवा एखादे फूल देठापासून अथवा एखादे फळ मुखीपासून निसटावे त्याप्रमाणे त्यांतून निसटावयास आणि 'आपण वाढलो, उंचावलो' असा अनुभव घ्यावयास जे साहित्य लावते, ते खरे साहित्य. साहित्य म्हणजे सामग्री; म्हणजेच उपकरण. भाषेच्या उपकरणात्मकतेचा हा अंतिम परिपाक व हाच अंतिम उपकार!

भारतीय साहित्यमीमांसकांनी 'साधारणीकरणा'चा जो सिद्धांत नीटनेटकेपणाने मांडला आहे, त्याचा प्रस्तुत संदर्भात उल्लेख करण्याजोगा आहे. 'साधारणीकरणा'त सहृदय रसिक देहबंध व मनोबंध यांच्या बेड्यातून निसटलेला असतो व त्याच्या एक प्रकारच्या 'mental preparedness' च्या पूर्वावस्थेमुळे तो समृद्ध झालेला, उंचावलेला, आनंदात न्हालेला असा बनतो. रसिकाचे काही दोष भरतादि रसमीमांसकांनी कटाक्षाने सांगितले आहेत. आधुनिक भाषेत सांगावयाचे तर असे म्हणता येईल, की रसग्रहणाच्या वेळी रसिक आपले सर्व 'subjective elements' झुगारून देऊन ज्यावेळी शक्य तितका 'objective' म्हणजे तटस्थ बनतो, त्यावेळीच त्याचा रसव्यापार बहरतो, त्यावेळीच त्यात 'साधारणीकरण' (objectivisation) होते, त्यावेळीच त्याला निर्मळ अवस्थेचा प्रत्यय येतो. रसिकाच्या स्थित्यंतरास trans–formation) ही पात्रताच खरी उपयोगी पडते. प्रा. मुक्तिबोधांच्या लेखाकडे मला पुनः वळावेसे वाटते. त्यांनी संवेदनाबोधांत उपजत, पूर्वनिहित असा जो अंश असतो त्याकडे चांगले लक्ष वेधले आहे. पण या अंशाच्या स्वरूपाकडे लेखाच्या मर्यादांमुळे म्हणा अथवा त्यांना ते न सुचल्यामुळे म्हणा, ते वळले नसल्यामुळे त्यांची मजल तितपतच राहिली आहे. संवेदनांच्या बोधाच्या मागे बरीच घडामोड असते व ती कळली, की मग विचारवंत भारतीय रसमीमांसेवर येऊन टपकतो. ग्रोस क्लार्क या नावाच्या एका तज्ज्ञ अधिकाऱ्याने आपल्या एतद्विषयक लेखात असे निदर्शनास आणून दिले आहे, की "...... for conscious perception necessarily involves a factor of attention, and attention presupposes interest, which in turnhinvolves the affective and conative aspects of mental activity. In other words, to be perceived the effects of external stimuli must in some way be linked up with the subjective side of experience; that is to say, with the idea of self." (New Biology. No 1, The Basis of Sensory Experience, P. 82) म्हणजे सांख्याच्या 'त्रयस्य तत्पूर्विकावृत्तिः' या सिद्धांताकडेच विज्ञानाची वाटचाल आहे हे उघड आहे. प्रा. मुक्तिबोधांनी ॲग्नेस आर्बरचा जो उतारा दिला आहे तो या दृष्टीने परिपूरकच आहे. या मुद्याचा थोडा अधिक ऊहापोह मी 'आयुर्वेद व मनोविज्ञान' या विस्तृत लेखात केला आहे तो जिज्ञासूंनी पहावा. 'अहंकार' या शब्दाचा शास्त्रीय व प्रमुख अर्थ समजवून घेतला म्हणजे या सर्व विषयावर उत्तम प्रकाश पडतो. इंग्रजीत ज्याला 'ego' म्हणतात तो या 'अहंकारा'चे स्थूल, भ्रष्ट, मलिन स्वरूप होय. श्रीज्ञानेश्वरांनी 'अगा अर्जुनपण न घेतां। मी ऐसे पंडुसुता। उठतसे जें तत्त्वता। तें तयाचे स्वरूप॥' असे जे मर्मदर्शन केले आहे त्यात, मार्क्सवाद्यांच्य

'de-class' होण्याच्या प्रक्रियेप्रमाणे असलेल्या 'depersonalize' होण्याची म्हणजे सर्व प्रकारचे पाश (तंत्रशास्त्रात अष्ट पाश सांगितले आहेत. ते अभ्यासकांनी लक्षात घेण्याजोगे आहेत.) सर्व प्रकारच्या मर्यादा व उपाधी (limitations and conditionings) झाडून टाकून निखळ, निर्धूत, नग्न अशा अवस्थेचा अनुभव घेण्याचीच प्रक्रिया आहे. अभिनवगुप्तादी भारतीय रसमीमांसकांच्या 'साधारणीकरणा'त तीच अभिप्रेत व अनुस्यूत आहे; ही प्रक्रिया प्रवृत्त क न, रसिकास स्थित्यंतराचा अनुभव देऊन, त्याचा चटका लावणारे साहित्यच खरे साहित्य!

जाता जाता एका आनुषंगिक विचाराची नोंद करून ठेवणे अनाठायी होणार नाही. प्रा. मुक्तिबोधांनी, संवेदनाबोधात मानवी जीव सामग्य (integratiou, organization etc.) कसे ओतीत असतो याचे जे दिग्दर्शन केले आहे, ते 'अहंकार' या भारतीय तत्त्वात पूर्णपणे समाविष्ट झाले आहे. 'अहं' ही वृत्ति जितकी विलगीकरणाची (individuation) आहे, तितकीच ती सलगीकरणाची ही (integration) आहे. संश्लिष्ट व सन्नद्ध असा जो अनुभव शरीर, मन व बुद्धि यात मानवाला येतो आणि 'a whole' या एकमुखीपणाने व साकल्याने तो आपले निरामय जीवन जे व्यतीत करतो त्यात 'अहं' हीच वृत्ती आहे. म्हणजे 'अहं' ही वृत्ती ध्रुवात्मक स्वभावाची (polar characteri) आहे. मानवाच्या आतून खोल खोल गुहेतून, ही वृत्ती मनोबोध व संवेदनाबोध यात उतरते व 'forms rather than a flux' 'structured' इ. प्रकारची जादू त्यात ओतते. ही वस्तुस्थिती ध्यानी आली, की रसिक मानव सौंदर्याच्या प्रतीतीच्या बुडाशी जातो. सौंदर्य म्हणजे काय? मर्ढेकरांचीच व्याख्या घेतली तरी तीही आपल्याला भारतीय भूमिकेवर आणून उभी करते. 'लयबद्ध रचने'त सौंदर्य असेल तर, प्रश्न असा उत्पन्न होतो, की सजीव-निर्जीव वस्तूच्या ठिकाणी ही लयबद्ध रचना कशी निर्माण होते? व्यक्तीकरणाच्या प्रक्रियेत अंतिम परिणत म्हणजे स्थूल स्वरूपात दिसणारी लयबद्ध रचना त्या त्या वस्तूच्या अंतर्हित गुहेतून वा गाभाऱ्यातून बहिर्गत व बहिर्मुख झालेलीच नसते काय? हीच त्या त्या वस्तूतील 'अहं'ची साक्ष आहे. मोकळ्या स्वरूपात स्पंदमयतेने वाहणाऱ्या सर्व जडशक्ती (energies) त्यांचे अणूत बद्ध झालेले स्वरूप अणु-संघ (molecules), रेणू (miscella) इ. इ. भौतिक सृष्टीतली लयबद्ध रचना तदधिष्ठित 'अहं'मुळेच असते. त्याही दृष्टीने 'individuality' हा शब्द पदार्थविज्ञानी व रसायनविज्ञानी वापरतात. कोणतीही 'system' म्हटली, की ती 'अहं'शिवाय संभवतच नाही. विज्ञानात, 'equilibrium' 'homeostasis' इ. सारखी जी तत्त्वे आहेत ती 'अहं'चीच प्रात्यक्षिके होत. 'अङ्गप्रत्यङ्गकानां यः सन्निवेशो यथोचितम्। सुश्लिष्टसन्धिबन्धो यस्तत्सौंदर्यमितीर्यते॥' ही भारतीयांनी केलेली सौंदर्याची व्याख्या मांसमय शरीरासच केवळ लागू नाही. ती वस्तुमात्राला, नव्हे अस्तित्वमात्राला लागू आहे. 'यथोचित सन्निवेश', 'सुश्लिष्टसन्धिबन्ध' इ. शब्द व 'form', 'sructure', 'organization', 'intigration' इ. शब्द पर्यायवाचकच ठरतील.

प्रा. मुक्तिबोधांच्या मर्ढेकरांवरील एका आक्षेपाचाही इथे विचार करणे समुचित होईल असे मला वाटते. मर्ढेकरांची 'सौंदर्यभावना' यांत्रिक जडवादी (mechanical meterialist) आहे अशी त्यांची जी टीका आहे ती एका बाजूने अगदी यथार्थ असली, तरी दुसऱ्या बाजूने ती अयथार्थही आहे. त्यांच्या लेखाच्या द्विस्वभावीपणामुळेच असे झाले आहे. प्रा. मुक्तिबोध, श्री. मर्ढेकरांच्या ढोबळ प्रतिपादनाच्या मागे जाऊन मूलग्राही विचार करू पाहतात, पण ते तिथेच न थांबता आणखी मागे गेले, तर, त्यांच्या लक्षात येईल, की, द्वंद्वगतीच्या नियमानुसार, (laws of dialectics) उच्च पातळीवर मर्ढेकरी कल्पना पुनरुक्त होतात व अंततः मूलगामी ठरतात. 'सौंदर्यभावना' इतर भावनांपेक्षा अगदी भिन्न व स्वतंत्र अस्तित्व असलेली, बाह्यसृष्टी व अंतःसृष्टी या ठळकपणे वेगळ्या कापून काढल्यामुळेच वाटते, हा प्रा. मुक्तिबोधांचा आक्षेप अधिक मागे गेल्यावर गतार्थ होतो. सर्व उपाधी (conditionings) व बंधने झाडून टाकता येऊन (अगा अर्जुनपण न घेतां। मी असे पंडुसुता।) निर्विशेष अशी चित्तावस्था झाल्यावर जी प्रतीती सहृदय व प्रगल्भ मानवास येते (उठतसे जे तत्त्वता), तीतच आनन्द, रस, सौंदर्य इ. भरले आहेत, सघनत्वाने भरले आहेत. म्हणूनच त्या अवस्थेस निर्विघ्न व निघूत अशी संज्ञा देता येते. ती निर्लेपा-

वस्था असल्यामुळे सौंदर्यभावना वेगळी व स्वतंत्र असल्याचे प्रतिपादन यथार्थ ठरते. हा 'मी' mechanical सारखा वाटणारा पण तसे नसणारा, 'organismal', 'whole', 'more than the total of the parts' असा सचेतन असणारा, पण त्याच्या अतीत असणारा कूटस्थ आहे. तीही समग्र प्रतीती (as a whole) आहे, त्यात आनन्द, रस, सौंदर्य, चमत्कृती इ. एकरूप असतात. श्री. मर्ढेकरांच्या संकुचित व ढोवळ दृष्टिकोनास ही वस्तुस्थिती आकलन करता न आल्यामुळे तो mechanical level वरच थबकून गेला आहे, त्याच्या पुढचा टप्पा प्रा. मुक्तिबोधांचा व त्याच्याही पुढचा टप्पा भारतीय रसमीमांसकांचा ! असो.

आपला मूळ मुद्दा साहित्याच्या विनियोगप्रधानतेचा. विनियोगप्रधान साहित्यच रसिकाला प्रक्षीणवन्धन बनविते. कामातुरतेने विव्हळणाऱ्या गोपींच्या बाबतीत श्रीमद्भागवताने असे म्हटले आहे, की 'जहुर्गुणमयं देहं सद्यःप्रक्षीणवन्धनाः ।।' तत्काळ बंधने गळून पडणाऱ्या गोपींनी आपल्या गुणमय देहाचा त्याग केला. साहित्यातील रसास्वाद घेण्यास आतुर झालेल्या रसिकाला 'सद्यःप्रक्षीणवन्धन' असा घडवून पालटण्याची किमया करणारे साहित्यच जीवनात सखा, गुरू, शिष्य, सचिव, गृहिणी या सर्व भूमिका वठविते, सजविते. त्यात उणीव आली, की साहित्यिक व साहित्य यांच्यात मोठी खाई निर्माण होते, साहित्यिकाचे जीवन वेगळे व साहित्य वेगळे असा दुर्गंधी विसंवाद निर्माण होतो. मानवातील सनातन द्वंद्वात सापडलेले साहित्यिक जगात काही कमी नाहीत ! साहित्याच्या करुणामूर्तीच त्या !! दैन्यवाणे जीवन, पण प्रतिभा मात्र गगनभेदी !!!

मानवातील सनातन द्वंद्व कोणते ? सृष्टीत बुद्धी व ज्ञान यांचा परमोत्कर्ष मानवात झालेला असल्यामुळे त्याच्या ठिकाणी मूळ तत्त्व शोधून काढण्याची झेप सतत दिसत आली आहे, पण झेपेच्या अनुसार त्याचा मनःपिंड व शरीरपिंड साथ देत आला आहेच असे दिसत नाही. येशू ख्रिस्ताने म्हटल्याप्रमाणे 'The spirit is ready, but the flesh is weak' असे मानवी जीवनात नेहमीच दिसून येते. श्रीरामकृष्ण परमहंसांना त्यांच्या एका शिष्याने असा प्रश्न विचारला होता, की "महाराज, आपल्याकडे मोठमोठे तत्वज्ञ व विचारवंत आढळून येतात, पण त्यांचे प्रत्यक्ष जीवन जर पाहिले तर त्यात व त्यांच्या ज्ञानात फार मोठी खाई दिसून येते. असे का ?" त्यावर त्यांनी, त्यांच्या नेहमीच्या सुत्रोग्र पद्धतीप्रमाणे छोटासा दृष्टान्त देऊन मार्मिक व यथार्थ उत्तर दिले. ते म्हणाले, "अरे, असे पहा ! घार आकाशात किती उंच उंच जाते आपल्यास ती दिसत देखील नाही. पण तिचे सारे लक्ष कुठे असते ? तर, जमिनीवर कुठे प्रेत आहे, कुठे सडघाण आहे यावर तिची तीव्र नजर असते आणि ती दिसली, की इतक्या उंचीवरूनही ती भर्रकन् खाली उतरते व आपली चोच खुपसून त्या सुखात रममाण होते.' याच संदर्भातला ॲल्डस हक्स्लेचा 'Intelligent fools are people who have refused to apply their intelligence to the subject of themselves.' (Ends and Means, P. 322) हा उद्‌गार विदारक वाटतो. मानवतावादी साहित्यिकांच्या बाबतीत पूर्वोक्त चिरंतन द्वंद्व काही कमी धुडगूस घालताना दिसत नाही ! समाजवादी राष्ट्रातील व पक्षातील साहित्यकृती व त्यांचे जनक असलेले साहित्यिक यांच्यातली दरी अपूर्व विस्मयावह आहे. शास्त्रज्ञ व त्यांचे जीवन यातली अशीच भेसूर दरी अणुशक्तीच्या विध्वंसक बाजूने दाखविली आहे, तत्त्वज्ञ व जीवन यातलीही तशीच घृणास्पद व भयप्रद दरी पूर्वीच्या काळाप्रमाणेच आजच्या काळीही मानवजातीस भेडसावीत आहे, मग साहित्यिक व जीवन यातला प्रकार तरी अपवादास्पद का ठरावा ? जे आदर्श मानव आपल्यापुढे ठेवतो ते प्रत्यक्ष जीवनात अनुभवण्याइतपत तो पालटेल कसा, त्याकरिता काय करावयास हवे इ. मानवजातीपुढे पडलेले यक्षप्रश्न होत. आदर्शाबाबत अज्ञान, संदेह, अपुरेपणा इ. असणे ही गोष्ट वेगळी आणि त्याचे निःसंदिग्ध व ठाम ज्ञान झाल्यावर तदनुसार बदलणे व तन्निष्ठ जीवन जगणे ही गोष्ट वेगळी. या दोन्हीही बाबतीत मानव सतत झुकांड्या खात आला आहे. त्याबाबत त्याला नित्यसिद्ध, निश्चित व अनुष्ठेय असे मार्गदर्शन हवे असते पण त्या दृष्टीने, इतर क्षेत्रातील प्रतिभावंताप्रमाणेच साहित्यिकही कागदी, नकली, फुसका ठरत आला आहे आशय व आकृती यांत ऐक्यात्म्य असणे हा सिद्धांत साहित्यिक व जीवन यास लागू नसावा ही वस्तुस्थिती जुगुप्सा

उत्पन्न करते, तशीच त्वेषही निर्माण करते. देह व आत्मा यातले सामंजस्य यातील परस्पर जिव्हाळा व यातले अद्वैत जितके अभिलषणीय व रमणीय, तितकेच, साहित्यिक व जीवन यातले का नसावे ? नसते याचे कारण हेच, की विनियोगप्रधानता त्यात मुळात नसते. एक अलीकडचे उदाहरण. हेमिंग्वे या अमेरिकन कादंबरीकाराचे. जीवनात व साहित्यात साहसांची सृष्टी निर्माण करणारा हा जगद्विख्यात साहित्यिक बंदुकीच्या गोळीने आत्महत्या करून 'सख: प्रक्षीण बन्धन:' बनला असा ! त्याला 'depersonalization' करण्याचा तोच एक मार्ग अवलंबनीय वाटला !!

आपल्या देशातील साहित्यिकांत या नमुन्याची काही वाण नाही. चिरंतन द्वंद्वाचे ते गर्भगोळेच ! उदा. श्री. गंगाधर गाडगीळ यांनी आपल्या लेखात (सत्यकथा, मर्ढेकर विशेषांक, १९५६) असे म्हटले आहे, की मर्ढेकरी नवकाव्य संतकाव्याप्रमाणे सप्रतीतपणे रोकडे आहे; त्यामुळेच त्याची भाषाही अनलंकृत, उघडीनागडी आहे असा दावा मांडल्या जातो. ते ठीक आहे. पण याच वस्तुस्थितीमुळे श्रीतुकारामांचा मार्मिक अभंग डोळ्यापुढे तरळतो :—

> चंद्रसूर्य बिंब लिहितां येती चांग ।
> प्रकाशाचे अंग आणतां नये ॥
> संन्याशाचें सोंग आणतां येईल ।
> वैराग्याचे अंग आणतां नये ॥
> कागदीं लिहितां नामाची साखर ।
> चाटितां मधुर केवीं होय ॥

आणि म्हणूनच कवी बोवडे यांची,

'सरस्वतीचे अस्वल करुनी नेशी दारोदार'

ही रसिक हृदयास गुदगुल्या करणारी काव्यपंक्ती आठवत राहून या गर्भगोळ्यांचे चिंतन टाकून द्यावेसे वाटते ! हे वाटणे, आपातत: कडू पण परिणामी गोड असे अमृत ठरणे अशक्य आहे काय ?

(पान ५७२ वरून)

त्यानंतर 'सृष्टयुत्पत्तीचे गीत' म्हणून ओळखले जाणारे हे सूक्त पहा:—

जेव्हा म्हणजे मळारंभी असत् नव्हते व सत्ही नव्हते तेव्हा मृत्यु म्हणजे मृत्युग्रस्त नाशवंत सृष्टीही नव्हती व म्हणून अमृत म्हणजे नित्य पदार्थही नव्हता. जे काय होते ते एकटे एकच स्वधेने म्हणजे आपल्या शक्तीने वायूशिवाय श्वासोच्छ्वास करीत म्हणजे स्फुरत होते. सताचा हा विसर्ग म्हणजे पसारा कशापासून व कोठून आला ? कोण निश्चयात्मक जाणतो ? हा पसारा जेथून निर्मिला गेला, ते, परम आकाशात असणारा या जगाचा जो अध्यक्ष तो जाणीत असेल किंवा नसेल ! (कोणी सांगावे ?) (ऋग्वेद X. १२९, १–७ चित्रावशास्त्री)

त्यानंतर दुसरे प्रश्न पुढे आले. धातृ, प्रजापति' विश्वकर्मा ह्या नावाने ओळखला जाणारा दुसरा एक उत्पत्ती-कर्ता शोधून काढण्यात आला. ह्या ठिकाणी सृष्टीची उत्पत्ति कोणी केली हा प्रश्न नसून, ती उत्पत्ति कशी केली हा प्रश्न होता. त्यांचा प्रश्न होता, "ते अरण्य कोणते, आणि स्वर्ग आणि पृथ्वी ज्याची घडविली असा तो वृक्ष तरी कोणता होता ? हे दोन्ही लोक दृढपणे होते तसेच स्थिरपणे उभे आहेत, ते कधीच जुने, वृद्ध होत नाहीत; किती तरी दिवस आणि प्रात:काळ उलटून जातात, तरीही ते वृद्ध होत नाहीत." (ऋग्वेद X. ३१. ७)

"सर्वद्रष्टया विश्वकर्म्याने स्वसामर्थ्याने ज्यापासून ही पृथ्वी घडविली आणि स्वर्ग उघडा केला त्याचे स्थान कोणते, त्याचा दृढ आधार कोणता, त्याची स्थिती कोणती, आणि हे सर्व घडले कसे ? अरे विद्वानांनो, आपल्या बुद्धीने (मनाने) ह्याचा विचार करा. (ऋग्वेद X. ८१. २,४)

(अपूर्ण)

वींच्या प्रेम-गाथा : बकुल आणि बुल्बुल

--भवानीशंकर पंडित

'चाफ्या'प्रमाणेच 'बकुल' आणि 'बुल्बुल' ह्या वींच्या कविता प्रणयभावनेवर आधारलेल्या आहेत 'बकुला'त एका रूपगर्विता परंतु पश्चात्तापपुनीत प्रणयिनीचा चिरविरह व्यक्त झाला आहे. एका युवकाच्या हृदयात तिच्याविषयी प्रथमदर्शनी प्रेम उद्‌भूत होते. आपल्या प्रेमाचे उत्फुल्ल फूल तो तिला समर्पण करतो. ती त्याचा आनंदाने स्वीकार करते. त्याच्याशी रमते-गमते. परंतु तिला आपल्या सौंदर्याचा गर्व असतो. अशा रीतीने एखाद्या तरुणाने आपले 'प्रेम' अर्पण केले, तर ते स्वीकारण्याचा आणि त्याच्याशी लीला-लाघव करण्याचा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे तिला वाटते. स्त्री ही स्वभावतः चंचल असते. त्या युवकाबरोबर इतर अनेक युवक आपल्या चाटूक्तीने आणि चातुर्याने हिचे प्रेम जिंकण्याचा प्रयत्न करू लागले. त्यामुळे तिची चित्तवृत्ती चकरावली. ह्याच्या प्रेमाचा स्वीकार करू की त्याच्या प्रेमाचा स्वीकार करू ह्या अस्थिरतेत तिचे मन हेलकावे खाऊ लागले. आपल्याकडे प्रणयिनीचे लक्ष नाही ह्या समजुतीने तिला हृदय अर्पण करणारा तो युवा तिच्यापासून दूर निघून गेला. तो केव्हा, कसा व कुठे गेला हेही तिला समजले नाही.

स्वत :वींनी या कवितेचे स्पष्टीकरण केले आहे.* ते सांगतात,---"या कवितेवरून आणि फक्त ह्याच कवितेवरून या स्त्रीची स्वभावरेखा कशी रेखाटली गेली आहे हे आपण पाहू. रूप आणि ऐश्वर्य यांच्या मदाने ही गर्वांध झाली आहे. स्वभावात अवखळपणा आणि नादिष्टपणा भरला आहे. दुसऱ्यावर अधिकार गाजविण्याची हौस आहे, सर्वांनी आपली स्तुती सदैव करावी, आज्ञा पाळावी, आपल्या मर्जीप्रमाणे वागावे अशी प्रबळ इच्छा आहे. थाटमाट, आपल्या वैभवाचे प्रदर्शन करणे तिला आवडते. तिच्यात बेपर्वाई आणि बेफिकीरपणा भरला आहे. हे सर्व तिच्या अल्लडपणाचे दोष तिच्या मुग्धावस्थेत फार खुलून दिसतात. अस्सल आर्य संस्कारात ती जन्मलेली आणि वाढलेली आहे. 'बकुला'प्रमाणेच तिच्या परिचयाचे इतर तरुणही तिच्या प्राप्तीकरिता सारखे झटत असतात. 'बकुला'-विषयी तिच्या मनात प्रेमाचे बीजारोपण केव्हा झाले ते तिला कळले नाही. तसेच आपल्या हातीचे 'बकुल' पुष्प केव्हा गळून पडले याचे तिला भान राहिले नाही. तारुण्याच्या प्रभातकाळीच तिच्या उत्साहपूर्ण आयुष्याच्या प्रदेशात निराशेचा अंधार पडला."

वींनी ह्या कवितेत 'प्रेमा'साठी 'बकुला'च्या फुलाची प्रतिमा योजिली आहे. ती अतिशय समुचित आहे. बकुळाच्या फुलझाडाची पाने आंब्याच्या पानासारखी असतात. फूल लहान, पांढरे, चक्राकार व मधोमध छिद्रयुक्त असते. त्याचा गंध मंद व मधुर असतो. फळे बदामाएवढी असतात. ती किंचित् गोड व किंचित् तुरट असतात. फुलांचा अत्तरासाठी आणि बियांचा व सालीचा औषधासाठी उपयोग करतात. बकुळाचे चिमुकले फूल वाळले तरी त्याचा सुगंध दरळत दरवळत राहतो.

या कवितेतील प्रणयिनीच्या मनात 'प्रथम दर्शनी' प्रेमाचा प्रादुर्भाव होतो तो तिच्या लक्षात येत नाही. पुढे वाढत्या वयाबरोबर तिच्या वृत्तीतील अवखळपणा लोप पावतो. ती गंभीर बनते. तेव्हा तिला 'प्रेमा'ची खरी कल्पना येते. ती म्हणते; "दिवसा सूर्याच्या प्रखर तेजात नक्षत्राच्या अस्तित्वाची जाणीव होत नाही. पण ते तेथे तसेच असते. प्रेमाचेही तसेच आहे. ते आपणाला विसरत नाही आणि आपण त्याला विसरत नाही."

---

* युगवाणी-फेब्रुवारी १९४६

प्रेम हे बकुळाच्या फुलाप्रमाणेच आकाराने लहान असणाऱ्या हृदयाच्या गाभ्यात निवास करते. आणि आपल्या सुवासाने देहातील कणन्कण दरवळून टाकते. त्याचे महत्त्व सर्वमान्य आहे. जीवसृष्टीच्या संरक्षणाचे श्रेय त्याला आहे. त्याच्याशिवाय संसाराचे चक्र फिरणे अशक्य आहे. या कवितेतील प्रणयिनीला जेव्हा त्याची जाणीव होते तेव्हा ती उद्गारते;

" श्वासें देह करी प्रफुल्लित जरी संसर्ग याचा घडे,
चित्ता छंद जडे, अनावर मिठी प्राणास याची पडे,
स्फूर्तीच्या उठती अखंड लहरी याच्याच जीवातुन
ठावे काय मला स्वभावच असे याचा असा दारुण !"

प्रेम जितके कोमल तितकेच कठोर आहे. या कवितेतील नायिकेला त्याचा कठोर अनुभव येतो. तिला अतिशय पश्चात्ताप होतो. परंतु वेळ निघून गेलेली असते.

बींनी प्रेमाचे बीजारोपण होण्याच्या अवस्थेला " रहस्यमय, अत्यंत रमणीय, अत्यंत आनंदमय, अत्यंत सुखमय " अशी नानाविध विशेषणे योजिली असून या "अद्वितीय अवस्थेचे शब्दांनी वर्णन करणे अशक्य आहे. याच चरमदशेला, परमावधीच्या अवस्थेला 'भावसमाधि' हे नाव दिले आहे. प्रणयिनीचा मनोभंग होतो तो तिला 'प्रेमाच्या' वास्तव स्वरूपाची कल्पना फार उशीरा होते म्हणून. बकुलाची निराशा होते, कारण त्याला स्त्रीच्या मानीपणाची कल्पना नसते म्हणून." लॉर्ड बायरन्ने थोडया वेगळया शब्दांत हा भाव सांगितला आहे.

" Man's love is of man's life a thing apart
'Tis woman's whole existance."

हालाच्या 'गाथासप्तशती'त थोडयाफार फरकाने याच आशयाची एक आर्या आहे—

' गोपायन्ति ये प्रभुत्त्वं कुपितां दासा इव ये प्रसादयन्ति ।
त एव महिलानां प्रियाः शेषाः स्वामिनाः एव वराकाः ।।'
' णूमेत्ति ते पहुत्तं कुविअं दासाव्व जे पसऽअन्ति ।
तेच्चिअ महिलाणं पिआ, सेसा सामिच्चिअ वराकाः ।। '

जे पुरुष स्त्रियांवरील आपले स्वामित्व प्रकट करीत नाहीत आणि त्या रागावलेल्या असल्या म्हणजे दासाप्रमाणे वागून त्यांना खूष करतात, तेच फक्त स्त्रियांना आवडतात. बाकीचे त्यांचे स्वामी असले तरी त्यांची कीव करावीशी वाटते.* केवळ निरनिराळ्या युगांतील कवींचे विचारसाम्य किंवा कल्पनासाम्य म्हणून हा येवढा प्रपंच केला आहे.

मानवी मनोविज्ञानाच्या दृष्टीने बींची ही कविता अपूर्व आहे. यौवनाच्या यक्षभूमीत पहिल्यानेच पदार्पण करणाऱ्या मुग्ध मुलीला अल्लडपणामुळे 'प्रेमा'च्या वास्तव स्वरूपाची ओळख नसते, पुढे पुढे करणाऱ्या आणि भुंग्याप्रमाणे भोवती भोवती सदाकदा पिंगा घालणाऱ्या तरुणांमुळे तिची मनःस्थिती चाकाटल्यासारखी असते. 'चाकाटणे' म्हणजे मनाची चलबिचल होणे. मन आश्चर्याने चकित होणे. या ठिकाणी प्रणयिनीची मनःस्थिती व्यक्त करण्याकरिता बींनी हा एक प्राचीन मराठी परंतु अर्थाच्या दृष्टीने अत्यंत समर्पक शब्द योजिला आहे. बींचा संतसाहित्याचा व्यासंग होता. त्यात त्यांना ज्ञानेश्वरीत हा शब्द भेटला असावा.† पुढे आरंभीचा अल्लडपणा ओसरल्यावर तिला 'प्रेमा'च्या सत्यस्वरूपाचा साक्षात्कार होतो. पण त्याचा काही उपयोग नसतो. स्त्री मानी असते. प्रत्येक स्त्रीला आपल्या सुंदरतेचा अभिमान असतो. पुरुषाला घोळ घालीत वसवण्यात तिला आनंद होतो. त्याने आपली सेवा करावी अशी तिची मनापासून इच्छा असते. 'बकुला'ला हा तिचा स्वभाव अज्ञात असतो. त्यामुळे ती त्याला मुकते व तो तिला मुकतो. अज्ञानामुळे दोघांच्याही प्रेमाचा शेवट निराशेत होतो.

---

* ह्यावर ज्ञानकोशकारांचे सामाजिक भाष्य आहे;—"या श्लोकात तत्कालीन प्रेमपांडित्य व्यक्त झाले आहे. पुरुषांनी त्यांचा अधिकार जरी थोर असला तरी तो स्त्रियांना दाखवू नये. उलट स्वामित्व असताना देखील प्रेम साधण्यासाठी स्वतःच दासाप्रमाणे वागावे अशी स्त्रियांची अभिरुची व अपेक्षा असते असे व्यक्त केले आहे." ही गाथा 'माधवी' या कवयित्रीच्या नावावर आहे. त्यावर ज्ञानकोशकार मखलाशी करतात,—"या गाथेची कर्ती स्त्री आहे ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे."

—प्राचीन महाराष्ट्र, विभाग दुसरा, पृष्ठ ४०३.

† 'चित्त चाकाटले आइ्कु घेत.' ज्ञानेश्वरी, अ. ९, ओ. ५२७.

'बुल्बुल' ही कविता मे एकोणिसशे एकोणिसच्या मासिक मनोरंजनात आली होती. त्यातल्या पाठात व 'फुलांच्या ओंजळी'तील पाठात काही ठिकाणी अंतर आहे. ही कविता इराणी काव्यातील एका सर्वश्रुत कविसंकेतावरून सुचली असावी. त्या संकेतानुसार 'गुल' म्हणजे फूल आणि 'बुल्बुल' ही दोघे अनुक्रमे प्रणयिनी व प्रणयी आहेत. त्यांचे परस्परांवर प्रेम आहे. परंतु त्यांच्या प्रेमाची परिपूर्ती होत नाही. त्या दोघांना मृत्यू येतो. तेव्हा ती दोघे मरणोत्तर स्मशानात भेटीगाठी घेतात आणि एकमेकांना आपापली दुःखे सांगून त्याचा भार हलका करतात.

इराणी काव्यात गुल् म्हणजे बहुधा गुलाबाचे फूल अभिप्रेत असते. त्याने आपले अर्धेमुर्धे डोळे उघडले म्हणजे बुल्बुल त्याच्या कानाशी लागते आणि सर्व रात्रभर आर्त व आर्द्रवाणीने उभयतांच्या प्रेमभंगाची करुण आणि दारुण गाणी गाते.

बींनी आपल्या कवितेत तरुणाच्या ठिकाणी 'बुल्बुला'ची प्रतिमा योजिली असून प्रणयिनीच्या जागी 'जाई'च्या वेलीची प्रतिमा स्थापन केली आहे. मराठी भाषेत 'गुलाब' हा शब्द पुल्लिंगी आहे म्हणून कदाचित् त्यांनी त्या जागी 'जाई' या स्त्रीलिंगी शब्दाची योजना केली असावी. आपल्या भारतीय साहित्यात 'जाई'ची— 'जातिलते'ची बरीच महती आहे. **'फूलामध्ये फूल। फूल हुंगावे जाईचे। सुख भोगावे आईचे। बालपणी'** या सर्वश्रुत ओवीत ती व्यक्त झाली आहे. बींच्या कवितेतील 'जाई'ने स्मशानात पुनर्जन्म घेतला आहे. तिचे फूल रंगाने पांढरे आणि आकाराने व देहाने नाजूक साजूक असते म्हणून त्यांनी तिला 'व्रतस्था' या पदवीने गौरविले आहे.

इराणी काव्यातील एका कविसंकेताचा केवळ नाममात्र आश्रय घेऊन बींनी या कवितेत 'जातिलता' आणि 'बुल्बुल' यांच्या मरणोत्तर पुनर्मीलनाची करुण पण मधुर कहाणी गाइली आहे. तिच्यात रतीच्या जोडीला शोकाचा, भयानकाचा आणि अद्भुतांचा संयोग झाला आहे. एका स्मशानात एका पिंपळाखाली एक चिरव्यथित अशी 'जाई' होती. तिच्या पहिल्या-वहिल्या प्रेमाची उपेक्षा झाली होती. तिचा वर्ण फिकट पांढरा होता, देह शिथिल होता, इतका कीं वारा सुटला, तर तो त्याला उडवील की काय, अशी तिला भीती वाटत होती. परंतु तिच्या पांढऱ्या शुभ्र निर्मल फुलांचा बहर कायम होता. जणू कुणी स्वर्गीय ललना आपल्या दिव्य अश्रूंचे सिंचन करून तिचे संगोपन करीत होती. त्या भयानक स्मशानात त्या व्रतस्थ 'जाई'ला अखंड फुलताना पाहून स्त्रियांना आश्चर्य वाटावयाचे. त्यांच्या मुखाने उद्गार बाहेर पडावयाचे :—

> "अगाइग नवल— ही 'जाइ' न ह्या महिवरिल.
> **साहुनि राहे कडक उन्हाळा**
> **कुंजाचा आधार न हिजला**
> **तरी भोगकल्लोळ सोहळा—**
> **फुलांचा भोगी—ही 'जाई' नवलाजोगी"**

परंतु दररोज रात्री त्या 'जाई'जवळ एक 'बुल्बुल' पक्षी येत असतो, त्याच्या हृदयात शोकाचा सागर उसळलेला असतो, प्रेमाने घायाळ झालेला तो हतभागी दिवसभर रानोमाळ भटकून रात्रभर आपल्या आर्त कंठाने गूढ परंतु भावमय सुस्वर काढीत असतो, म्हणून तिचा बहर कायम आहे, हे मात्र त्या स्त्रियांच्या लक्षात येत नाही. कारण बींच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे—

> **चिन्मय पंखाचा अलबेला**
> **पक्षी पडता नच दृष्टीला**
> **येई तत्सन्निध रात्रीला**

हे होय. तो पक्षी दृष्टीस पडत नसला, तरी त्याची आर्त व आर्द्रवाणी कानी पडताच समदुःखी अशा अनेक स्त्रियांची व पुरुषांची पाउले त्या स्मशानभूमीकडे वळत. त्यांना तिच्यात आपल्या असफल प्रेमाचे सूर ऐकू येत. ते ऐकण्यात ते सर्व इतके मग्न होत की, रात्र संपू नये व त्या करुण सुरातच रात्र विरून जावी असे त्यांना वाटे. बींनी हा भाव—

> **विलक्षण भारी। विरुताची जादूगारी**

या शब्दात व्यक्त केला आहे. 'विरुत' म्हणजे पक्ष्यांच्या कूजनाचा पुन्हा पुन्हा होणारा प्रतिध्वनी. तो सर्व वातावरण एकाच नादाने भरून टाकतो. त्याची जादू काही और आहे.

बींनी या काव्यकथेत प्रेमविषयक एक तत्त्व ध्वनित केले आहे. प्रेमाचे सामर्थ्य विलक्षण आहे. शरीर नश्वर असले, तरी त्यात वास करणारे प्रेम चिरंतन आहे. ते जाळल्याने जळत नाही की जमिनीत पुरल्याने मातीत मिसळत नाही. त्याला अंत नाही. अनंत जन्मात ते तसेच अक्षय राहते.

अनुक्रमणिका

बींनी या कवितेत सहजगत्या— ' तेज बंबाळी । रम्याची होते होळी ' हा एक अर्थांतर यास साधला आहे. जे रम्य असेल त्यात रात्र पोषक असते हा अनुभव कुणास बरे नाही ? ' मनोरंजना 'त बींनी या कवितेचा शेवट किंचित् निराळा केला आहे–

> **उत्कटतेने हृदय फाडिती**
> **ते स्वरस्वर रूपा येती**
> **कोणी म्हणती त्यात उमटती**
> **स्पष्ट साचार । राधेचे नामोच्चार.**

' कृष्ण ' हा प्रणयी आणि ' राधा ' ही प्रणयिनी म्हणून बहुधा बींनी मुळात ' राधे ' चा निर्देश केला असावा. परंतु इराणी कवितेतील ' बुल्बुला 'च्या प्रतिमेशी तो विसंगत वाटल्यामुळे पुढे गाळला असावा. ' प्रणयी ' पुरुषासाठी ' बुल्बुला 'ची प्रतिमा योजण्याचा प्रघात मुसलमान सूफी साधूंच्या कवितेत पुष्कळ आढळतो. एकनाथांच्या एका रूपकात तिचा अवलंब आढळतो.* बींचा संतसाहित्याचा व्यासंग प्रसिद्ध आहे. त्यांना कदाचित् तेथून ही प्रतिमा स्फुरली असावी.

---

* ' बुल्बुल '

लाखो बुलबुल हूं । दावोजी मुबारखो ।।धृ०।।
तेरा जप । भारत रोटी गप । सद्गुरूमे छप । तुझे काल करेगा गप ।।१।। लगो मुखलिया नाम । आंदर भरा हूं काम । ऐसा केंव हुआ बेफाम । तुझ काहे मिलेगा राम ।।२।। मोकू आंगकू लगायो राख । दिलमो नापाक ऐसा देखे लख । एकाजनार्दनी देख ।।३।।

—एकनाथांची गाथा. आवटे. पृष्ठ ८२२.

मराठी कवितेविषयीची माझी अपेक्षा

——यशवंत मनोहर

आज आपण एका गुंतागुंतीच्या तरीही डोळस वाङमयीन वातावरणात उभे आहोत. एका अर्थानं हा उधाणकाळ किंवा तीव्र प्रतिक्रियाजन्य उत्साहाचाही काळ म्हणता येईल. त्यामुळे उपकारक वा अपकारक काहीही असेल पण एक लक्षणीय गतिमानता सर्वच वाङमयीन व्यवहारात दिसून येते. नवनव्या कक्षा आत्मसात करण्याची धडपड सतत चाललेली असल्याने सतत बदलते देखावे आज पाहावयाला मिळत आहेत. तेव्हा मोल काहीही असो पण एका जागृतीच्या जाणिवांनी आजचा वाङमयीन व्यवहार भारावलेला आहे, झपाटलेला आहे यात वाद असू नये. तेव्हा अशा या वाङ्मयीन वातावरणात उभे राहूनच मराठी कवितेविषयीची अपेक्षा मला नोंदविली पाहिजे.

समग्र ललित वाङमयाविषयी माझी अपेक्षा एकच आहे. ती म्हणजे ललित वाङमयाने व्यापक आणि अर्थवान जीवनानुभवाचा कलात्मक आविष्कार करावा. रसिकाला त्यांची उत्कट जीवनगर्भ प्रतीती घडवावी. मानवाच्या स्थितिगतीची, 'नियती'ची क्रीडा अनेक पातळ्यांवर अव्याहतपणे चालू आहे. इच्छा असो नसो प्रत्येकच जण या अटल चक्रव्युहात भागीदार आहे. हे विश्ववास्तव ललित लेखन करणाऱ्या लेखकाची जन्मभूमी, कर्मभूमी आणि नवनिर्माण भूमी आहे. या बहुशील विश्ववास्तवाच्या गुंतागुंतीच्या प्रवाहामध्ये बुडी घेणे, अनुभव ग्रहण करणे आणि अनुभवामागील जीवनसत्याच्या विविध स्तरांवरील भाववंधाचे नेमके रहस्य शब्दद्रव्यामधून मूर्तिमान करणे हा प्रत्येकच कलावंताचा कलावंत म्हणून धर्म असतो. 'बोली अरूपाचे रूप दावीन अतींद्रिय परि भोगवीन इंद्रियांकरवि.' ही एकट्या ज्ञानेशांचीच नाही तर सर्वच कलावंतांची प्रतिज्ञा आहे. अर्थात या अरूपाला जीवनधर्माचा तळ गाठता यावा. अतींद्रियाला उत्तुंग अनुभवत्व यावं; त्याच्या अंगभूत चैतन्याच्या सर्वच कडांसहीत त्याचं संश्लेषण व्हावं; कलेतून जीवनदर्शन घडतं असं म्हणत असताना वरील सर्वच संदर्भ टाळता येणं अशक्य आहे.

अर्थात कलावंताची वेडर झेप, विश्ववास्तवाला कवळण्याची त्याची कुवत आणि त्याची अनुभव ग्रहणाची व व्यक्तीकरणाची समृद्ध ताकद वा त्याची कलात्मक समज या गोष्टींवर कलाकृतीचा अमर जन्म शक्य असतो. म्हणून ठोक ठोकताळे, भुंडे बेवारस निष्कर्ष आणि डोकेबाज अंतिम उत्तरं मला नको असतात. माझ्या डोळयांच्या कक्षा आणि मनाची तृषा आधाशी करणारं अर्थवान प्रतीतीचं सौंदर्यपूर्ण संश्लेषण ही माझ्या मनाची आसक्ती असते. आणि ललित वाङमयाची मूल प्रकृती लक्षात घेता व्यक्तिपूर्ण अनुभव साक्षात, सुरूप करण्याच्या प्रतिज्ञेने समग्र ललित वाङ्मयाचा व्यवहार चाललेला आहे असंच दिसतं.

ललित वाङमयाची उपरोक्त प्रतिज्ञा विशुद्धपणे कवितेतच पूर्ण होताना दिसते. कारण कविता ललितवाङ्मयाच्या अग्रभागी आहे. तीच प्रथम वाट काढते. ती अर्कासारखी आहे. तिच्यामागे इतर वाङ्मयप्रकार धावतात. त्यांनाही या धडपडीत थोरवी आणि सामर्थ्य प्राप्त होतं. पण कवितेचं सच्चेपण आणि विशुद्धता त्यांना प्राप्त होणं कठीण असतं. किंबहुना केवळ आत्माविष्कारामुळे विशुद्धतेची गौरीशंकरं कवितेतच पाहावयाला मिळतात. कथा, नाटक वा निबंध विशुद्धत्वाकडे झुकताहेत असं आपण म्हणतो तेव्हा तेव्हा प्रकृतीनं ते कवितेजवळ जाऊ पाहतात असाच त्याचा अर्थ होतो.

ललितवाङ्मयाची 'स्मृति' कवितेतूनच घडलेली आहे. म्हणूनच कवितारूपाचा विचार हा सर्वच ललित वाङमयप्रकारांचा विचार म्हणायला फारसा प्रत्यवाय नसावा. (प्रा. फडके प्रतिभासाधनात कवितेचा विचारच करीत नाहीत. ही गोष्ट लक्षणीय जरूर ठरावी.)

तर कवितेत अनेक शब्द किंवा प्रतिमा असतात. शेवटच्या शब्दावरून पुढे गेलं की हे सर्वच शब्द-प्रतिमा एकाच प्रतिमेत लोप पावतात. ही प्रतिमा रसिकमनात अनेक सूक्ष्मतरल वाटांनी उतरून येते. ही किमया घडते याचे कारण जीवनाचे अत्यंत भावपूर्ण अर्थभार किंवा कवीगत ग्रहणाचं संपृक्त-रसायन कवितेच्या वाह्यतः लघू पण पूर्ण रुपात अपरिहार्य शब्दांच्या संघटनेमधून गोठविलेलं असतं.

कवीगत प्रतीतीला अनेक संवादी विरोधी अर्थ-सार मिळून त्या प्रतीतीची घनता वाढते. या प्रतीतीला लक्ष्यवेधी निरिंद्रिय गर्भाला कवीमनातच एक सेंद्रिय रूप प्राप्त होतं. त्यासारखं तेच असं ते सेंद्रिय रूप कवी शब्दांमध्ये शोधण्याचा प्रयत्न करतो. या शोधा-तूनच ती शब्द न फुटलेली तगमग एका अनावर भरतीच्या क्षणी सशब्द होऊन निघते. सूर्याला जरा किरणांचा पिसारा तसा या सशब्दाला अर्थाचा मोर-पिसारा प्राप्त झालेला असतो. म्हणूनच कवितेच्या आकलनाने रसिकाच्या मनात एक प्रकाशमान जीवना-नुभव साकार होत राहतो.

कागदावरील प्रत्यक्ष कवितेत शब्दामध्ये अंतर असतं. ते कवीच्या अंतर्मनातील प्रतीतीरूपामध्ये नसतं. ते रूप एकसंध असतं. कवितेतील शेवटच्या शब्दावर जायला काही कालावधी लागतो; जो प्रतीतीत नसतो. चंद्र असा आडवा लिहिलेला नसल्याने तो प्रकाशगोळा आपल्या डोळ्यात एकदमच येतो. कविता अशी शब्दात लिहिलेली नसती तर त्या प्रतीतीची संघटना काही सौन्दर्यसंदर्भासह तरी चंद्राप्रमाणे एकाच क्षणी आपल्या मनात उतरली असती. (अर्थात यासाठी कविता अनिर्बंध-पणे भोगण्याची क्षमता अभिप्रेत आहे.) तरीही 'कविता वाचना'-नंतरची रसिकमनाची प्रतीती एकात्मच असते. गॅप्स भरून आलेल्या असतात. हे भरलेपणही सतत समृद्ध होत असतं. ही झाली कवितेची Chemistry.

कवितेची प्रकृतिसिद्ध विशुद्धता सांभळता येणं कठीण आहे. कारण इथे निवेदन, स्पष्टीकरण, अलंकरण, विस्तार हा सर्वच मामला गैरलागू आहे. अनुभव-सत्याशी प्रामाणिक राहून 'झटून भिडून' केलेला आत्माविष्कार इथे महत्त्वाचा. एकूण इतर वाङ्मय-प्रकारात उपरोक्त भाग खपून जातात. कवितेत ते खपले की कविता खपली म्हणून बिनधोक समजावे. म्हणून प्रामाणिक संश्लेषण हीच कवितेची मूलप्रकृती ठरते. अनुभव मग संवेदनात्म, भावात्म वा विचारात्म असो त्याचे सर्जन करायला अनुभवाचेच प्रतिरूप शब्द कवीला बांधावे लागतात. आणि हे सोपं नाही. त्या प्रमाणेच हे लयात्म शब्द फोडून त्यातील जीवनसत्य भोगता येणंही कठीण आहे. कारण कविता मुकी नसली तरी ती प्रकृतिविशेषांनुसार एकदमच सर्व बोलूनही जात नाही. दर नव्या भोगण्यामधून कविता आपल्या मनात नव्यानं मोठी होत राहते. लाजतच पण नवोढेप्रमाणे रसिक मनात फुलारत राहाते.

कवितेकडे आपण आज कविता म्हणून पाहात आहोत. कवितेनं प्रथम आणि कधीही फक्त कविता असावं आणि ही जाणीव जेव्हा जेव्हा विसरली गेली तेव्हा तेव्हा कवितेला कवितेतर प्रयोजनांचा वनवास सहन करावा लागला. आज कवितेची जन्मप्रक्रिया आपल्या दृष्टीने महत्त्वाची बाब ठरली आहे. आणि कवितेच्या संदर्भात आपण आज विशुद्धत्वाची स्पष्ट भूमिका घेताहोत. कवितेहून वेगळ्या दृष्टीने कवितेकडे पाहणं आपण आज अमान्य करतो आहोत. म्हणून प्रारंभीच म्हटलं की आपण आज एका डोळस वाङ्मयीन वातावरणात उभे आहोत. अशावेळी अर्थातच कवितेविषयी कवितेपेक्षा वेगळी अपेक्षा करणं म्हणजे कलाव्यवहाराचं अज्ञान साधार स्पष्ट करण्यासारखं आहे.

या भूमिकेतून मी मराठी कवितेकडे पाहणार आहे. आधुनिक कवितेचा आजवरचा प्रवास पाहिला तर कविता ह्या वाङमयप्रकाराच्या अनुभवाभिव्याक्तीच्या

कक्षा कधी खूप वाढलेल्या दिसतात तर कधी तो आपलं स्वत्व आणि सामर्थ्य हरवून कफल्लक झालेला दिसतो. अर्थात हे चढउतार वाङ्मयात शक्य असतात. म्हणूनच हा स्थितिगतीचा विचार कुठल्याही वाङ्मयप्रकाराकडे पाहाताना महत्वाचा ठरतो....स्वत्व विसरलेल्या गतानुगतिक मराठी कवितेला केशवसुत स्वत्व प्राप्त करून देतात. इथे एक वेगळाच जिवंत वळसा आणि वारसा मराठी कविता घेते. गोविंदाग्रज, बालकवी, माधव ज्यूलियन यांच्याकडूनही काही वेगवेगळचा प्रकृतीची थोडीबहुत ताकद घेऊन मराठी कविता मर्ढेकरांपर्यंत येईतो मधल्या काळात बरीचशी संकेतशरण होताना दिसते. मर्ढेकर आशय अभिव्यक्तीच्या संदर्भात एक वेगळीच एकात्म घनता तिला प्राप्त करून देतात. इथे एक अत्यंत सखोल उंची मराठी कवितेला प्राप्त होते. करंदीकर मृद्गंधात त्या उंचीच्या दिशेने जाऊ पाहतात. पुढे त्या प्रवासातून ढळतात; मागे येतात. पाडगावकर, बापट, करंदीकर यांनी पुन्हा एकदा रविकिरणमंडळाशी नाते सांगून वाचनाद्वारे कविता लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. प्रयोगशील वेडरपणाने करंदीकर बाकीच्या दोघाहून उजवे ठरले. पाडगावकर, बापट संपलेपणातच (लिहीत राहूनही) जमा झाले. मक्तिबोध, बोरकर, अनिल, कुसुमाग्रज वगैरे कवी याच काळात लिहीत होते. आपापलं वेगळेपण जपत होते. मुक्तिबोधांची काही कविता विलक्षण अस्वस्थ करते. तिच्यात एक ठोक आशयगर्भ ताकद आहे. पण जेव्हा त्यांची कविता विचारानुभवाचं केंद्र आळविण्याचं सोडून नियोजित श्रद्धा मांडते तेव्हा विरस होतो. अनिलांच्या दशपद्या आणि त्याप्रमाणेच बोरकरांची चित्रविणेपर्यंतची काही प्रेमकविता झपाटून टाकते. बाकी ‘ आलबेल ’ आहे.

एवढ्यातच आरती प्रभू, चित्रे हे कवी पुढे आले. चित्र्यांची कविता एका विलक्षण वेगळ्या संवेदनस्वभावामुळे एका अतिरिक्त, एकाकी आणि बेवारशी अस्तित्वाचे समर्थ दर्शन घडवू लागली. सांकेतिकतेमुळे जन्मलेल्या निर्जीवतेविरुद्ध एक जोरकस प्रतिक्रिया इथे घडली. अस्तित्वानुभव आणि शब्द यांच्याशी त्यांचं तन्मय होणं एकरसच असतं. आशय अभिव्यतीचं एक दाणेदार एकात्मीकरण इथे प्रकर्षानं उमटून पडतं. चित्रे आता थोडे थांबल्यासारखे वाटतात. हे थांबणंही महत्वाचं ठरावं. कारण वादळापूर्वीची शांतता वांझ कोण म्हणेल ? काही असो. चित्र्यांच्या कवितेतील एकात्म ताकदीचा उंच प्रत्यय आजच्या कवितेत अपवादानेच येतो असं वाटतं. Little Magazinesची प्रस्थापिताविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून चळवळ आली. असो, फक्त भारुड, वाचा, चक्रवर्ती, टिंब, अबकडइ हा प्रपंच त्यातून सिद्ध झाला. विलक्षण प्रयोग होवू लागले. कोल्हटकर, चंद्रकान्त खोत, काळसेकर, गुर्जर वगैरे कवी एका झंझावाती दमानं लिहू लागले. या कवितेला समजून घेणारे पुढे यावेत. थोरांवर ही जबाबदारी आहे. दुर्बोध किंवा फॅशनबाजी म्हणून तिला झटकून टाकता येणार नाही. कारण त्यामुळे समजत नाही म्हणून कुटाळी करतात, पेलवत नाही म्हणून बगल देतात ही टीका नियोजित आहे. कारण न्याय मिळत नाही म्हणून प्रस्थापितांची मातब्बरी मानायला हे ‘ व्रती ’ तयार नाहीत. ‘ वैतागीक ’ Moods, लैंगिकतेला जवळची प्रतिभासृष्टी आणि एकप्रकारचा तप्त चिडखोरपणा व आकस यातून या संताप्तांची कविता साकार होते. जुन्यांच्या पुष्ट नकारार्थी भूमिकेला हे कवी तेवढाच समर्थ होकार देत आहेत. काल जे ओंगळ म्हणून नाकारलं तेच वस्तुतः जीवन होय असं या कवींना वाटतेय. आजच्या कवितेतील वैतागिकता, शून्यवाद, भंकसपणा त्याचं फलीत होय. आजचा कवी घाण्याचा बैल नव्हे; कोणी सांगवं आणि त्यानं मान्यवर आवर्तात डोळे नाकारून फिरावं. हे तो मान्य करणार नाही. जुन्यांच्या करपट नजरेची कॉपी तो करणार नाही. कारण त्याला त्याची खास नजर आहे. अशी काहीशी या कवींच्या प्रगट मनाची भूमिका, प्रत्यक्ष कविता वाचून काय हाती लागतं हा प्रश्न आहे. ही कविता वाचताना या कवितेचं एकमेव लक्षण प्रतिमांचा अतिरिक्त हव्यास हे दिसतं. कविता तर्कातीत असणे म्हणजे प्रतिमांमध्ये कुठलाही संदर्भ वा नाते न जोडणे या चुकीच्या गृहितकृत्याने या कवींची कविता संघटनेतील भाववद्ध सेंद्रियत्व नाकारते. जाणिवांच्या दृष्टीने या कवींची कविता बरेचदा समान वाटते. चित्र्यांच्या कवितेतील संवेदनविश्व त्यांचं एकटयाचं. उलट या

कवींचं संवेदनविश्व बरचसं सामाईक. त्यामुळे दिसली असती ती उंची विभागली जाते. म्हणून चित्र्यांच्या कवितेतील एकात्म ताकदीचा धारदार प्रत्यय फारसा येत नाही असं विधान वर मी केलंय्. आत्मगौरव किंवा दाखवेखोरी इथे महत्त्वाची ठरू पाहाते असं वाटतं. म्हणून बंडखोरीचा नको तेवढा आव आणि बदलानं (प्रत्यक्ष जाणिवविश्वांना कला-रूप देण्यापेक्षा) झंपाटलं जाणं मराठी कवितेला फारसं हितावह ठरणार नाही. तरीही स्वतंत्र जाणीवविश्वाशी इमानदार राहून त्यांच्या स्वतंत्र व्यक्तित्वानुसार त्यांचे भावबद्ध संघटनेमधून आविष्करण झाले तर एका बुलंद सामर्थ्याची शक्यताही अटळ आहे. हे या कवींचं अत्यंत पारदर्शक आणि जिवंत प्रतिमाविश्व तसेच बेगुमान झंझावाती Moods पाहिले म्हणजे म्हणणं भाग पडतं.

याच काळातील दोन भिन्न प्रवृत्तींची नोंद घ्यायला हवी. सामाजिक जाणिवांना कलापातळीवर नेऊ पाहणारी एक. हीत सूर्वे प्रमुख. कामगार विश्वाच्या उपेक्षित व्यथांचं विश्व इथे सरळ सच्च्या प्रामाणिक-पणाने उत्कटरूपात व्यक्त होतं. एक जीवघेणी तळमळ, गहिरी आत्मीयता या लेखनामागे आहे. म्हणून ही कविता सरळ हृदयाशी भिडते. पण कधी सूर्व्यांमधला माणूस त्यांच्यातल्या कलावंताला रावबतो आणि सुर्वे काही हुकुमी इलाज सुचविण्यात धन्यता मानतात तेव्हा त्या दुःखाची व तळमळीची किंमतच कोसळून पडते. दुसरी प्रवृत्ती सूक्ष्म तरल मनोभाव साक्षात करणाऱ्या कवींची. शब्दामधील सूक्ष्म लयकारीतून ही कविता रूप घेते. ग्रेस, अनुराधा पोतदार, महानोर हे अशी कविता लिहिणारे काही कवी. पैकी ग्रेसच्या कवितेतील व्याकूळ भावविश्व आणि तिचा लयात्म आविष्कार लक्षणीय आहे. एक समर्थ अभिजात कविता ग्रेसनी लिहिली. भावसंवेदनांची धून शब्दांमधून लाडीक आर्ततेनं पेरून देण्याची किंवा अनुभवाची प्राणलय शब्दातून एका रिमझिम व्याकूळतेतून चेतविण्याची ग्रेसची क्षमता कुणीही नाकारणार नाही. विविध आर्द्र स्पंदनं आणि संदर्भ घेऊन अनेकदा येणारी मृत्यूची प्रतिमा ग्रेसच्या कवितेत मोठ्या बळाची ठरते. तरी जी उंची ग्रेसनी गाठली तिची कक्षा आता संपलीय् असं वाटतं. तेव्हा मर्यादशीलपणातून पुनरुक्ती येऊ नये. त्यांच्या कवितेला ते फारसं उपकारक ठरणार नाही. काही असो, ग्रेसची कविता आपल्या वेगळचा वैशिष्टचांनी उठून दिसेल इतकी संपन्न खचितच आहे. वामन इंगळे व केशव मेश्राम या दोन कवींचीही कविता आपल्या लक्षणीय वेगळेपणाला जपून आहे.

रेगे, इंदिरा आजही लिहीत आहेत. संतांची कविता आपल्या लडिवाळ भाववलानं आपलं एक स्थान नोंदवून गेली. रेगे हे सदाफुलीसारखे. तेव्हापासून आजही सतत फुलताहेत. स्त्रीसंलग्न विविध तरल भाववृत्ती शब्दांजवळ निरोपून देणारी ही शब्दभोगी कविता आहे. त्यांची कविता तेच प्रथम आणि फक्त तेच लिहू शकले. म्हणून ही कविता एकाकीच. मराठी कवितेला त्यांनी दिलेली ही देणगी मागेपुढे अनोखीच. असो. स्थूलमानाने तरीही काहीशा पारंपारिक पद्धतीने सोयीसाठी काही ठळक प्रवृत्ती टिपण्याचा प्रयत्न केला.

एकूण खरीखुरी कविता मग तिच्यातून 'वैतागीक', सामाजिक, राजकीय कोणतीही जाणीव व्यक्त होवो ती कविताच असते. म्हणूनच वर्गीकरणाला कुठलाच मूल्यात्मक अर्थ नसतो. नवसर्जनाचा चैतन्य-स्पर्श आहे तिथे कला आहे. या प्रक्रियेतून जन्माला आलेली सच्ची कविता आपल्या चिरसौन्दर्यानं रसिकाला नवप्रत्यय देत राहणार. तेव्हा जिवंत जीवनसत्यांचा सौंदर्यपूर्ण प्रत्यय कवितेनं रसिकाला उत्कटपणे द्यावा. त्याला जिवभरी थरारून, अस्वस्थ करून टाकावं. वैशिष्ठ्यपूर्ण अनुभवसत्याचे विविध स्तर आणि त्याची प्राणगर्भ लय एकात्मतेने भोगणारा कवीच चिरतरुण आणि चिरसुंदर कविता लिहू शकेल या उजळ जाणिवेतून कविता जन्मावी. कवितेनं या प्रकारे जिवंत आणि सच्चा जन्म घेऊन यावं. मरण अमरपणात विरघळून जाईल. आणि म्हणूनच कवितापणात कुठलीही उणीव नसणारी कविता वैपुल्याने जन्माला यावी. एवढीच आणि फक्त कवितेविषयीची माझी अपेक्षा आहे......

पत्रव्यवहार

नटवर्य केशवराव दाते यांचे पत्र

श्री

ता. २६–२–७०

१२१ विजयनगर, दादर, मुंबई–२८

श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांस,
कृ. नमस्कार वि. वि.

आपणास आपल्या दोन लेखांबद्दल धन्यवाद देण्याकरता हे पत्र लिहिण्याचे धाडस करीत आहे. धाडस म्हणण्याचे कारण असे की, धन्यवाद देणारालाही पात्रता असावी लागते; व ती तशी असेल तरच ते घेणारालाही आनंद होईल. तशी पात्रता माझी नाही. तरीपण आपल्या प्रदीर्घ साहित्यसेवेकडे स्तिमित होऊन पहाणारा व केव्हा तरी त्याचा आस्वाद घेणारा मी एक सामान्य रसिक आहे. या नात्याने मी आपले अभिनंदन केले, तर ते आपणास हास्यास्पद वाटणार नाही, अशी मी आशा करतो. अलिकडे 'युगवाणी'मध्ये आलेले आपले दोन लेख मला फार मोलाचे वाटले. आणि ते म्हणजे महात्मा गांधी जन्म शताब्दी अंकातील आपला 'जीवनयज्ञ' हा लेख व बडोदा येथील परिषदेतील भाषण 'मराठी साहित्याची जीवनमूल्ये' हे होत. हे दोनही लेख मन प्रक्षुब्ध करणारे व अंतःकरणात घर करून बसणारे आहेत. आपल्या या लेखातील शेवटच्या प्याऱ्यामधे "आपल्या सर्वांच्या हृदयात असलेली ती शारदा" येथपासूनचा शेवटचा भाग अत्यंत मननीय आहे. आपण म्हणता त्या तऱ्हेचे वाङ्मयतप आपआपल्या शक्तिनुसार ज्यांनी आतापर्यंत केले, त्यांच्या सावलीत राहून विचार करण्याची संधी माझ्या सुदैवाने मला मिळाली; व त्याच्या तपाचे दर्शन यथाशक्ती लोकांना घडवावे हे आपले जीवित–कार्य असे मी समजत आलो आहे. आणि म्हणूनच कदाचित आपल्या या भाषणाने मला बेचैन करून टाकले.

मौज अशी की, गेल्या दोन तीन महिन्यातील तीन भाषणे म्हणजे आपले वरील भाषण, श्री. भाऊसाहेब खांडेकर यांची पुण्यास जानेवारीत झालेली भाषणे व श्री. कुसुमाग्रज यांचे नाटय–परिषदेतील भाषण या तिघांचेही राग थोडे निराळे वाटले तरी सूर एकच आहे. त्यात आपला सूर म्हणजे टणत्कार होय. वाङमयाच्या प्रांतात आपणासारखे शिलेदार आपला भाला अजून उंच धरीत आहेत, हे महाराष्ट्राचे भाग्यच म्हणावयास पाहिजे.

'जीवनयज्ञ' हा आपला लेखही या अंकातील सर्व लेखांपेक्षा मूलग्राही व विलक्षण अंतर्मुख करणारा आहे. 'सत्व–परीक्षा' नाटकात रोहिदासाच्या मरणानंतर तारामती म्हणते, 'रोहिदासाच्या आत्मयज्ञाकडे पाहिले म्हणजे बुद्धीला गरगर फिरल्यासारखे वाटते.' तशीच काहीशी अवस्था वरील आपला लेख वाचून होते. असो. आपल्या या दोन्ही लेखांबद्दल आपणास त्रिवार धन्यवाद.

दुसऱ्याही एक दोन गोष्टींबदल आपले अभिनंदन करावयास पाहिजे. विदर्भ साहित्य संघाचे आपण अध्यक्ष आहात व आपल्या कारकिर्दीत 'युगवाणीचे' स्वरूप अंतर्बाह्य सुंदर होत आहे, हे पाहून आनंद वाटतो. अर्थात ही सुंदरता प्रतिष्ठित प्रौढीची आहे. ती नवतरुणांना कितपत पटेल हा प्रश्नच आहे. काही असले तरी, संघ आपल्या ह्या धोरणाला चिकटून राहील, अशी मी आशा करतो. याबद्दल 'युगवाणी'च्या नवीन संपादकासही धन्यवाद दिले पाहिजेत.

वाङ्मय–मुलखात चौफेर यश मिळविले त्या आपल्यासारख्यांच्या नजरेखाली असलेल्या 'युगवाणी'स, पूर्वीच्या 'विविधज्ञान विस्तारा'ची, प्रतिष्ठा प्राप्त होईल, अशी खात्री वाटते.

चार पाच वर्षांपूर्वी मी नागपुरला आलो होतो, त्या वेळी आपल्यासारख्या थोरांनी माझे जे भव्य व हार्दिक आदरातिथ्य केले त्याच्या स्मृती वारंवार मनात घोळत असतात. त्या नंतरच्या काही काळात मनाला खिन्न करणारीही एक गोष्ट कानी आली.

(पुढील मजकूर पान ५९२ वर)

पुस्तक-परीक्षण

कोल्हटकर आणि हिराबाई*

नाट्येतिहासावर नवा प्रकाश टाकणारा ग्रंथ

—प्रा. म. ना. लोही

विदर्भ साहित्य संघाच्या आर्वी येथील अठ्ठाविसाव्या वार्षिक अधिवेशनात प्रा. म. ल. वऱ्हाडपांडे यांनी लिहिलेल्या आणि मुंबईच्या साहित्य सहकार संघाने प्रकाशित केलेल्या 'कोल्हटकर आणि हिराबाई' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. हिराबाई म्हणजे मराठीतील गेल्या पिढीत गाजलेल्या कवयित्री आणि रंगभूमीवर आलेल्या 'दामिनी' नाटकाच्या पहिल्या स्त्रीनाटककार हिराबाई पेडणेकर आणि कोल्हटकर म्हणजे मराठीचे विनोदाचार्य आणि नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर होत. या दोघांचा संबंध वरवर गुरु–शिष्येचा, पण अंतर्यामी प्रियकर-प्रेयसीचा. कोल्हटकरांसारख्या बुद्धिमान आणि बौद्धिक सौंदर्याकडे आकृष्ट होणाऱ्या थोर साहित्यिकाला मोहिनी घालणाऱ्या रमणीविषयी जाणून घेण्यास मराठी वाचक व साहित्यप्रेमी उत्सुक असल्यास नवल नाही. ही जिज्ञासा तृप्त करण्यासाठी प्रा. म ल. वऱ्हाडपांडे यांनी परिश्रमपूर्वक लिहिलेल्या या ग्रंथाचा उपयोग होईल, याबद्दल तिळमात्र शंका नाही.

पुढील वर्षी श्रीपाद कृष्णांची जन्मशताब्दी साजरी केली जाणार आहे. त्या निमित्ताने प्रस्तुत पुस्तक औचित्यपूर्णच म्हणावे लागेल. साहित्याच्या गुणवत्तेशी आणि आस्वादाशी निर्मात्याच्या वैयक्तिक जीवनाचा संबंध येत नाही. साहित्यसमीक्षेलाही ते मारक की पूरक हा विवाद्य प्रश्न आहे. तरीही शेक्सपियरपासून शॉपर्यंत कित्येक थोर साहित्यिकांच्या व्यक्तिगत जीवनासंबंधी इंग्रजीत भरपूर लिहिले गेले असून, त्याच्या अनुषंगाने त्यांच्या साहित्याच्या उगमापासून आविष्कारापर्यंत चर्चा झालेली आहे. कोल्हटकरांचे पट्टशिष्य श्री. राम गणेश गडकरी (गोविन्दाग्रज) यांच्या आयुष्यातील प्रीतिविषयक अज्ञात रहस्याचा शोध घेणे सुरूच आहे. कोल्हटकरांचे व हिराबाईंचे,–अल्पकाळ का होईनात,–केवळ स्नेहाचेच नव्हे तर प्रेमाचे संबंध होते. त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न अनुचित म्हणता येणार नाही. त्याचे प्रयोजन काय आणि कितपत आहे, हा प्रश्न वेगळा. त्याचेही थोडे फार उत्तर या पुस्तकात सापडते.

हिराबाई पेडणेकर (इ. स. १८८५ ते १९५१) या नायकीणकन्यका. बालपणीच आईचा मृत्यू झाला. वयाच्या आठव्या किंवा नवव्या वर्षी त्या सावंतवाडीहून मुंबईला मावशीकडे आल्या. गिरगावच्या शाळेत त्यांचे चार–सहा इयत्तेपर्यंत शिक्षण झाले. 'हीन कुळात जन्म झाला याबद्दल हिराबाईंना विलक्षण खंत वाटत होती.' 'कुलीन स्त्रीप्रमाणे विवाह करून आदर्श संसार करायचा' त्यांचा मानस होता. परंतु ते शक्य झाले नाही. निरुपायाने त्यांना नायकिणीचा पेशा पत्करावा लागला. मात्र पेडणेकर कुटुंबाचे संबंध तत्कालीन प्रतिष्ठितांशी होते. त्यात श्री. गोविंद बल्लाळ देवल यांचाही समावेश होता. हिराबाई या देवलांच्या केवळ मानसकन्याच नव्हेत, तर अनौरस कन्या असाव्यात (आत्मवृत्त: कोल्हटकर पृ. ५६). साहजिकच त्यांच्या

* ले. प्रा. म. ल. वऱ्हाडपांडे. प्रकाशक–वा. वि. भट, साहित्य सहकार संघ, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर–मुंबई १४. पृष्ठे १८३+५१ (डेमी) किंमत १० रुपये.

सहवासाने हिराबाई सुविद्य नव्हे तरी सुसंस्कृत बनल्या. त्यांना काव्याची गोडी असून संतकाव्याचा त्यांचा चांगला अभ्यास होता. नाटकाचीही त्यांना आवड होती. हिराबाईंनी 'जयद्रथ-विडंबन' (इ. स. १९०८) आणि 'संगीत दामिनी' (इ. स. १९१२) अशी दोन नाटके तर लिहिलीच पण त्यांच्या काही कविता 'मासिक मनोरंजना'तून प्रसिद्ध झाल्या. उत्तरायुष्यात मात्र त्यांनी काहीच लेखन केले नाही. असा बाईंचा संक्षेपाने जीवनवृत्तांत आहे.

हिराबाईंच्या काळात सुशिक्षितांचे नायकिणींशी संबंध असत. साहजिकच त्यांचा कित्येकांशी संबंध आला. त्यातीलच एक कोल्हटकर. हिराबाईंना ऐन तारुण्यात (वयाच्या सोळाव्या वर्षी) जोगळेकरांविषयी आकर्षण वाटले. जोगळेकर सुशिक्षित होते, देखणे होते आणि मुख्यतः गाननिपुण नट होते. त्याच सुमारास कोल्हटकरांचा व हिराबाईंचा परिचय झाला. पुढे त्याचे रूपांतर गाढ स्नेहात झाले. कोल्हटकरांच्या मनात हिराबाईंविषयी आसक्ती असली, तरी हिराबाईंच्या मनात कोणती भावना होती, हे सांगणे कठीणच. कदाचित हिराबाईंच्या मनात कोल्हटकरांविषयी आसक्तीऐवजी आदरभावच असण्याची शक्यता अधिक. साहजिकच या संबंधाला हिराबाईंच्या दृष्टीने फारसे महत्त्व नाही. मात्र कोल्हटकरांच्या दृष्टीने त्याला निश्चितच महत्त्व आहे. कोल्हटकर केवळ स्त्रीसौंदर्यावर भाळण्याइतके उच्छृंखल नव्हते. तरीही काही काळ नादी लावण्याचे हिराबाईंचे सामर्थ्य त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारे आणि प्रभाव दाखवणारे ठरेल. यात कोल्हटकरांच्या वाट्याला काही मोठेपण येते असे दिसत नाही. म्हणूनच या संबंधाची अहमहमिकेने तरफदारी करण्यामागील श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांची भूमिका चटकन लक्षात येत नाही. भाऊसाहेब माडखोलकरांना गुरूविषयी वाटणारा आदर निर्विवाद आहे. मात्र या प्रकरणातून माडखोलकरांनी काय साधले याचा अर्थबोध मला तरी होत नाही. बहुधा त्यांना हेच सुचवायचे असावे की, त्यांच्या गुरूंवर रूपवती स्त्रियाही आसक्त होत.

वास्तविक प्रा. वऱ्हाडपांडे यांना हिराबाई पेडणेकरांवर लिहावयाचे होते. पण हिराबाई आणि कोल्हटकर यांच्या परस्परसंबंधाविषयी जे लेख भाऊसाहेब माडखोलकरांनी पूर्वीच लिहून ठेवले होते, त्याबद्दल खुलासा करण्याशिवाय लेखकाला गत्यंतर नव्हते. लेखकाने आपली भूमिका का स्पष्ट केली नाही, ऋणनिर्देशही का केला नाही, हे एक गूढच आहे. लेखकाने श्री. माडखोलकरांकडून प्रस्तावना लिहून मागितली. त्यांनीही चांगली एक्कावन्न पृष्ठांची प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली. तथापी, या प्रस्तावनेत लेखकाची भूमिका स्पष्ट न करता, कोल्हटकरांच्या आत्मवृत्ताविषयी तपशीलवार मजकूर लिहून, त्यांची पडती बाजू सावरून धरण्याचाच तेवढा प्रयत्न त्यांनी केला आहे.

कोल्हटकरांचा हिराबाईंवर काय परिणाम झाला हे सांगणे कठीण नाही. 'दामिनी' नाटकाचे कथानक पाहिले तर याची कल्पना येते. कथानकाची गुंतागुंत, रहस्यप्रधानता, वेषांतरे, कारस्थाने आदी गोष्टी कोल्हटकरी वळणाच्या आहेत. नाटकात सूत्रधार-नटीचा प्रवेश नाही. मात्र या नाटकातील पदरचना सुबोध, सुश्लिष्ट आणि प्रसादपूर्ण आहे. हिराबाईंनी काही बाबतीत कोल्हटकरांचे अनुकरण आणि अनुसरण केले, तर काही बाबतीत स्वतंत्र मार्ग चोखाळला उलट, कोल्हटकर या कलावंत रूपसुंदरीच्या इतके आहारी गेले की, तिला समोर ठेवूनच (मॉडेल) त्यांनी आपल्या नाटकांतील नायिकांची निर्मिती केली. या संबंधात ते स्वतःच कबूल करतात की, "हिराबाईंशी परिचय झाल्यापासून एका बुद्धिमान स्त्रीच्या सौंदर्याचा व विभ्रमाचा एक बराच चांगला आदर्श मिळाल्यासारखा होऊन माझ्या सौंदर्याभिरुचीचे पोषण होऊ लागले व त्याचा परिणाम माझ्या पुढील कृतीवर दिसू लागला." किंवहुना "माझ्या आयुष्यावर ज्या काही व्यक्तींचा चिरस्थायी परिणाम झाला आहे त्यांपैकी एक..." असे हिराबाईंचे वर्णनही त्यांनी केले आहे. म्हणजेच कोल्हटकरांवर हिराबाईंचा अधिक प्रभाव पडला. हिराबाई सुंदर आणि चतुर स्त्री असल्यानेही हे घडले असेल. पण यात सरशी कोणाची? हिराबाईंची की कोल्हटकरांची?

या बाबतीत लेखकाने घेतलेली तटस्थतेची भावना स्पृहणीय आहे. तरीही हिराबाईंवरील या ग्रंथात लेखकाने कोल्हटकरांसंबंधी केलेली चर्चा प्रमाणाबाहेर झाल्यासारखे वाटते. कोल्हटकरांवरील ग्रंथात तिला औचित्य आले असते ही एक बाजू सोडली, तर इतर बाबतीत लेखक कौतुकास पात्र आहे. विशेषतः

केवळ अडतीस पृष्ठांच्या चरित्राला त्यांनी सव्वीस पृष्ठांच्या मर्यादेत सुमारे शंभर टीपा जोडून मूळ चरित्र अधिक परिपूर्ण आणि स्पष्टीकरणयुक्त बनवले आहे. शिवाय छत्तीस पृष्ठांच्या पत्रव्यवहाराची जोड देऊन लेखकाने आपल्या विधानांची पुष्टी केली आहे. त्यांच्या चरित्रलेखनात श्री. भाऊसाहेब माडखोलकर म्हणतात तसा विस्कळितपणा आला आहे, यात शंकाच नाही. परंतु, लेखकाच्या बाजूने असेही म्हणता येईल की, त्यांची मूळ कल्पना चरित्रलेखनाची नसून हिराबाईंची माहिती करून देण्याची होती. मूळ लेख लेखकाने परिष्कृत करून घेतला नसावा, म्हणून तो दोष तसाच राहून गेला.

'कोल्हटकर आणि हिराबाई' या ग्रंथातील दोन प्रकरणांचा विशेष उल्लेख करावा लागेल. पार्श्वभूमी या प्रकरणात मराठी रंगभूमीवरील हिंदी व उर्दू नाट्य आणि रंगभूमीचा परिणाम स्पष्ट केला आहे. तद्वतच पारशी रंगभूमीच्या कोल्हटकरांच्या नाट्यवाङ्मयावरील प्रभावाची चर्चा केली आहे. दुसऱ्या एका प्रकरणात (नव्हे परिशिष्टात) त्यांनी आद्य मराठी स्त्री नाटककार सोनाबाई चिमाजी केरकर (इ. स. १८८० ते १८९५) यांची व त्यांच्या 'संगीत छत्रपती संभाजी' या नाटकाची बरीच सविस्तर माहिती दिलेली आहे. मात्र येथे त्यांची मनःस्थिती द्विधा झालेली दिसते. एकदा लेखक म्हणतो, "एक सफल कलाकृती म्हणून नव्हे तरी नाट्यलेखनाच्या दृष्टीने स्त्रीने केलेला सर्वप्रथम प्रयत्न या दृष्टीने नाट्येतिहासाच्या अभ्यासकास त्याची दखल घ्यावी लागेल." सोनाबाईचे नाटक कधीच रंगभूमीवर आले नाही. त्याचा वाङ्मयीन दर्जाही फारच खालचा आहे. त्या काळात लोकनाट्य (की तमाशा ?) मान्यता पावले नव्हते. त्यामुळे शिष्ट रंगभूमीवर त्याला शिरकाव नव्हता. शृंगाराची रेलचेल असलेल्या 'संगीत छत्रपती संभाजी' नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग न होण्याचे हेही एक कारण असू शकेल. शिवाय पदवीअभावी गडकरी-वरेरकरांच्या नाटकांकडे नाटक मंडळ्यांनी बराच काळ दुर्लक्ष केले. तेथे एका कलावंतिणीच्या नाटकाची दखल कोण घेणार ? तर मुद्दा असा की, पुढे जाऊन लेखक म्हणतो, "...आद्य स्त्री–नाटककर्त्री (?) म्हणून हिराबाई पेडणेकरांचा गौरव करणे योग्य आहे." मला तरी त्यांचे हे दुसरे मत पटत नाही. कारण हिराबाईंचे नाटक जरी सोनाबाईच्या नाटकापेक्षा सरस व सकस असले तरीही आद्य स्त्री नाटककार सोनाबाईच म्हणावी लागेल. नाही म्हटले तरी सोनाबाईचे नाटक छापले गेले आहे. वयाच्या पंधराव्या वर्षी नाट्यलेखन करणाऱ्या मुलीचे कोण कौतुक करणार नाही ?

शेवटी या पुस्तकातील मुद्रणदोषांचा उल्लेख केल्याशिवाय राहावत नाही. एवढ्या अभ्यासपूर्ण आणि मौलिक ग्रंथात सनांचे आकडे चूक छापले जावेत, नावे चूक छापली जावीत हे मनाला खटकते. पण यात लेखकाचा दोष काय ? मराठी रंगभूमीच्या इतिहासात भर घालणारा एक मौलिक ग्रंथ लिहिल्याबद्दल लेखकाचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच होईल.

(पान ५८९ वरून)

अल्पगुणी कलावंताचीही कदर करून त्याचा सत्कार करणारा नागपुरातील चारुदत्त खरोखरीच चारुदत्त झाला. मनाला खिन्नता येते ती अशामुळे की, त्यांचे घरी पंचपक्वान्नांचा आस्वाद घेणारी माझ्यासारखी सामान्य माणसे, त्या घराची पडझड होत असता ढळणाऱ्या एका विटेलाही आधार देऊ शकत नाहीत. वस्तुस्थिती काय असेल ती आपणासारख्यांना जास्त माहित. असो.

आपले अभिनंदन केल्यावाचून चैन पडेना, म्हणून हा पत्राचा प्रपंच केला. काही कमीजास्त लिहिले गेले असेल तर राग नसावा.

आपण मुंबईस मधून मधून येत असालच. आपण याल अशा एखाद्या वेळी जर कार्ड पाठवून मला कळविले, तर आपल्या भेटीस मी अवश्य येईन. कळावे ही विनंती.

केशव त्र्यं. दाते

योगमास्थितः

—डॉ. अ. ना. देशपांडे

तमसा नदी

तसमा नदी. पुण्यसलिल गंगामातेच्या पावन परिसरातच विहरण करीत असलेली ही सत्वस्थ जलवाहिनी. आजीच्या कौतुकाच्या नजरेच्या टप्प्यात खेळत असलेली ही नातसदृश तरंगिणी. तिच्या किनाऱ्यावर कर्दममयतेचा ओंगळ सुस्तपणा अस्ताव्यस्तपणे पसरलेला नाही. ही पाण्याची लांबच लांब सतरंजी. तिचे काठ गोठलेले आहेत. या नदीचा किनारा इतका स्वच्छ, की असे वाटावे, त्यावर रमणीय घाटच बांधलेले आहेत. शीतल सुखद स्पर्श जणू काही येथे द्रवरूप धारण करून अवतरलेला आहे. एखादा दुर्मनस्क माणूस तेथे आला तर त्याच्या मनातील मळभ पाहता पाहता नाहीसे व्हावे आणि त्यात पौर्णिमेचे चांदणे पसरावे एवढा प्रभाव या नदीच्या सान्निध्यात आहे. वाल्मिकी ऋषी हे तर शुद्धमनस्क महात्मा. ते जेव्हा आपल्या शिष्यांसह त्या नदीजवळ आले आणि सज्जनाच्या अंतःकरणाप्रमाणे निर्मळ असलेल्या तिच्या जलप्रवाहाचे त्यांनी जेव्हा अवलोकन केले तेव्हा त्यांच्या चित्तवृत्तींवर प्रसन्नतेचे दवबिंदू तरळू लागले. तमसेच्या तीर्थात स्नान करावे असे त्यांना वाटले.

नरक्रौंचवध पाहून वाल्मिकी हळहळले

तेवढ्यात त्यांच्या प्रसन्नतेचा छेद करीत एक बाण आला. तेथे जवळच कामप्रेरित क्रीडेत रत झालेले क्रौंचपक्ष्यांचे एक जोडपे फिरत होते. प्रेमचेष्टांत ते मग्न झाले होते. भोवतालच्या जगाचे त्यांचे भान अस्तास गेले होते. कामधुंद प्रीतीच्या स्वच्छंद आस्वादात ते रंगून गेले होते. नरक्रौंचाच्या नजरेतून तर कामभोगाच्या अधीरतेचा उन्माद ओसंडत होता. रतिसुखाबद्दलची त्याची उकळती उताविळी त्याच्या अंगप्रत्यंगातून, त्याच्या प्रत्येक हालचालीतून प्रकट होत होती. तेवढ्यात सू सू करीत एक तीक्ष्ण बाण आला. एका निषादाचा. त्याने नरक्रौंचाला छिन्नविच्छिन्न केले, रक्तबंबाळ करून टाकले, निष्प्राण करून सोडले. क्षणार्धापूर्वीची त्याची चैतन्यमय काया निर्जीव लोळागोळा होऊन पडली. अंतराळालाही कळवळा फुटेल असा अपरिमित दुःखाचा केविलवाणा टाहो क्रौंचपक्षिणीने फोडला. फळभाराच्या निर्मितीच्या अपेक्षेने ओथंबलेल्या एखाद्या वेलीवर अचानक वीज कोसळावी तशी त्या पक्षिणीची अवस्था झाली. तिचे जीवितसर्वस्वच एकाएकी हिरावून घेतल्या गेले. आनंदोन्मादाच्या शिखरावरून ती एकदम दारुण दुःखाच्या खाईतच पडली. तिची ती अवस्था पाहून वाल्मिकी हळहळले, द्रवले. तिचे दुःख त्यांच्या शुद्ध, सहानुभावशील अंतःकरणात संक्रमित झाले. दोन जलाशय असावेत. एकामेकाच्या अगदी जवळ. जणू काही हातात हात घालून एकमेकाला बिलगून असलेले. त्यापैकी एका जलाशयात कोणीतरी एक भला थोरला धोंडा फेकून मारला. पाणी हलले, हुंदकळले. लाटा उसळल्या. शेवटच्या लाटेने शेजारच्या जलाशयाच्या शांत अस्तित्वाला स्पर्श केला आणि त्याही जलाशयात लाटांची मालिका उत्पन्न झाली. वाल्मिकींच्या अंतःकरणात असेच दुःखाचे, शोकाचे कढ उत्पन्न झाले.

जीवनात व काव्यात दुःखाचे स्थान

समजा, त्या ठिकाणी वाल्मिकी नसते आणि त्या निषादाचा सोबती असा दुसरा एखादा निषाद असता तर त्याने आपल्या मित्राच्या शरसंधानकौशल्याचे तोंड भरून कौतुक केले असते, त्याच्या अंतःकरणाला दुःखाऐवजी आनंदाचे भरते आले असते. त्याला आनंदाचा अनुभव आला असता. वाल्मिकींना

दुःखाचा अनुभव आला. दोघांचाही अनुभवच. यातला कोणता अनुभव अधिक उत्कट, हृदयाचा अधिक ठाव घेणारा आणि अधिक आस्वाद्य समजावा ? माणसाच्या जीवनात सुखापेक्षा दुःख जास्त आहे. 'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे' हा जो तुकाराम महाराजांनी दिलेला निर्वाळा, त्यात जवळ जवळ सर्वच मानवमात्राची वेदना उमटलेली आहे. सुखापेक्षा दुःख माणसाजवळ जास्त वेळ राहाते म्हणून त्याच्याबद्दल त्याला जास्त आत्मीयता वाटत असावी, म्हणूनच दुःखाच्या स्मरणात त्याला आनंद वाटत असावा, म्हणूनच Our sweetest songs are those that tell of saddest thought असे शेलेने लिहिले असावे. करुण रस हाच एक महत्त्वाचा रस, 'एको रसः करुण एव निमित्त भेदात् । भिन्नः पृथक् पृथगिव श्रयते विवर्तान् ॥' हे भवभूतीचे उद्गार त्या दृष्टीने अतिशय अर्थपूर्ण आहेत. खरी, श्रेष्ठ रसार्द्रता करुणात आहे असे त्याला म्हणावयाचे आहे. दुःखाच्या दारातून गेल्याशिवाय जीवनाच्या अर्थाचा, जीवनाच्या रहस्याचा शोध लागणे अशक्य आहे. दुःखाचा अनुभव हा जीवनावर खोलवर प्रकाश टाकणारा आहे. म्हणून सुखाच्या, आनंदाच्या अनुभवापेक्षा तो श्रेष्ठ आहे. अधिक हवाहवासा वाटावा असा आहे. शोकात्म नाटक, शोकात्म कादंबरी, शोकात्म कथा ही अधिक प्रभावी ठरते यातले मर्म हे असे आहे. वाल्मिकीच्या मुखातून पुढे जे अमर महाकाव्य बाहेर पडले त्याचा मूळ स्रोत या दुःखशोकमय घटनेत आहे. रामायण कर्त्यांचा मूळ अनुभव दुःखाचा आहे.

अनुभव, अनुमान आणि अनुकरण

अनुभव काव्यनिर्मितीच्या दिशेने सरस्वती पाउले टाकते. त्यातले अनुभव हे पहिले पाऊल, आधी अनुभव मग काव्य, मग वाङ्मय. काव्याची, वाङ्मयाची इमारत ही अनुभवावर आधारलेली असते. अनुभवाशिवाय काव्य म्हणजे कवी विनायकाच्या शब्दांत, कर्णिकार सुमने—

'स्वानुभूत वासाचे दान । करावयाला जोवर ये न ॥
तोवर कवितालतिकेवरती । कर्णिकार सुमनांची भरती ॥'

तसे पाहिले तर, काव्याच्या, ललित वाङ्मयाच्या निर्मितीला आधारभूत अशा तीन शक्ती आहेत. अनुभव, अनुमान आणि अनुकरण. यात अनुकरण ही अर्थातच तिसऱ्या दर्जाची, तिय्यम महत्त्वाची शक्ती. अनुमानाची महत्ता दुय्यम श्रेणीची. काव्याला काव्यत्वाचा खरा तजेला तेव्हाच प्राप्त होतो जेव्हा त्यातले आद्य स्फुरण हे जिवंत स्वानुभवाचे असते. त्यातही पुन्हा जेव्हा ते जीवनातल्या दुःखमयतेचे असते. दुःख हा जीवनाचा गाभा आहे. दुःख हे जीवनातले पहिले आर्यसत्य आहे. दुःखाच्या दर्शनाने, त्याच्या अनुभवाने अंतःकरण मृदू होते, त्याच्या ठायी कोवळीक येते. दुसऱ्याची सुखदुःखे यथार्थ स्वरूपात समजण्यास लागणारी संवेदनक्षमता त्यात उत्पन्न होते. त्याचबरोबर ज्याने दुःख दिले त्याच्याबद्दल संतापही उत्पन्न होतो. वाल्मिकींची त्यावेळी अशीच अवस्था झालेली होती. त्यामुळे त्या क्रौंचपक्षिणीबद्दलच्या कळवळ्याच्या पोटी, "हे निषादा, त्या क्रौंचयुगुलापैकी काममोहित झालेल्या एका क्रौंचाचा तू, त्याचा काही अपराध नसताना, वध केलास, तुला यापुढे कधीही शांती लाभणार नाही" अशा आशयाची क्रोधजनित शापवाणी त्यांच्या मुखातून बाहेर पडली.

'मा निषाद प्रतिष्ठा त्वमगमः शाश्वती समा ।
यत् क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥'

छंदाची किमया

काव्यनिर्माण प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट ही की, ही वाणी छंदोबद्ध स्वरूपात बाहेर पडली. भावनेचा आवेग सहजच छंदोबद्ध असतो. त्यात अंगचाच ताल असतो, लय असते. भावना ही नैसर्गिक ऊर्मी आहे आणि निसर्गाचा समग्र आविर्भाव हा छंद-ताल–लयानुवर्ती आहे. वाल्मिकींचा श्लोक हा त्यांच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या शोकावेगाचा उत्स्फूर्त आविर्भावच होता. त्याला चार चरण होते. प्रत्येक चरणात आठ अक्षरे होती. वीणेच्या लयबद्ध साथीबरोबर तो गाता येत होता. शोक सहजच श्लोकरूप झाला होता. छंद, ताल, लय यांना आधारभूत अशी जी किमया आहे ती सौंदर्याभिव्यक्तीची आदिमाया आहे. वाल्मिकींच्या भावोत्कट वाणीतून ही किमया साकार झाली होती. त्यांची शोकसंतप्त वाणी सहज साजशृंगारासह अवतीर्ण झाली होती.

विवेक हा सारस्वताचा कणा

शापवाणी उच्चारल्याबरोबर वाल्मिकी अस्वस्थ झाले, व्यथित झाले. शोक वाटला हे ठीक झाले, पण शाप दिला हे चुकले. शोक असावा पण क्रोध नको. प्रेम असावे पण आसक्ती नको. हास्य फुलवावे पण कोणाच्या वर्मावर प्रहार करून नको. शृंगार असावा पण कामवासना ऐंद्रिय पातळीवर चाळविणे नको. श्रेष्ठ साहित्यनिर्मितीत हे पथ्य, हा विवेक अखंड जागरूकतेने सांभाळलेला असतो. विवेक हा सारस्वताचा कणाच असतो. आपण क्रोधविकारवश झालो या जाणिवेने वाल्मिकी बेचैन झालेले असतानाच त्यांच्याजवळ ब्रह्मदेव प्रगट झाले. त्यांची व्यथा त्यांनी ऐकून घेतली आणि तुझ्या ठिकाणी सरस्वती प्रकट होईल असा आशीर्वाद देऊन ते अदृश्य झाले.

काव्यनिर्मितीत योगधर्म

ब्रह्मदेवाच्या अनुग्रहाने सरस्वती प्रसन्न झाली. वाल्मिकी दर्भासनावर वसले. नारदांच्या मुखातून त्यांनी रामचरित्र संक्षेपरूपाने ऐकलेलेच होते. ते योगधर्मस्थित झाले, आणि रामचरित्रातल्या सर्व घटनांचे यथातथ्य असे साक्षात्कारस्वरूप दर्शन त्यांना घडले.

' तत् सर्वं धर्मवीर्येण यथावत् सम्प्रपश्यति।
ततः पश्यति धर्मात्मा तत् सर्वं योगमास्थितः।।

योगस्थित झाल्यानंतर, तमसा नदीच्या तीरावर सुरवातीला वाल्मिकींनी जशी प्रसन्नता अनुभविली तशीच प्रसन्नता त्यांना पुन्हा प्राप्त झाली, क्रोधाचा विकार गेला, पण शोकाला आधारभूत असलेला करुणेचा भाव राहिला, अंतःकरणाचा कोमलपणा राहिला. योगधर्मामुळे त्याला स्थिरतेची जोड मिळाली. भावनाशील मृदुता आणि संयमशील स्थिरता यांचा संयोग जुळून आला. वाल्मिकींची प्रतिभा जेव्हा या संयोगाने संपन्न झाली तेव्हाच तिने रामायणाला जन्म दिला. काव्यनिर्मितीसाठी कविअभिप्रेत हा संयोग असावाच लागतो. म्हणूनच तर Poetry is the spontaneous overflow of powerful feelings, recollected in moments of tranquility असे काव्याचे लक्षण वर्डस्वर्थला बांधावे लागले. यात भावनोद्रेक आहेच पण शांत प्रसन्न मनःस्थितीत त्याचे पुनर्स्मरण घडणे आवश्यक असल्याचेही स्पष्टपणे सुचविलेले आहे. हा संयोग रसास्वादातही, काव्यश्रवणातही आवश्यक आहे. या संयोगाची अत्यंत मनोहर प्रतिमा ज्ञानदेवांनी रंगविलेली आहे. त्यांनी आपल्या शब्दांच्या कुंचल्यांनी प्रथम कोमलतेचे चित्र रेखाटले आहे.

' जैसे शारदियेचे चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे ।।
ते वेचिती मने मवाळे । चकोरतलगे ।।
तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा ।।
अति हळुवारपणा चित्ता । आणुनिया ।। '

आस्वादक चित्त असे हळुवार, मवाळ असावे लागते. पण त्यावरोबर

जैसे भ्रमरू परागु नेती । परी कमळदळे नेणती ।
तैसी परी आहे सेविती । ग्रंथी इये ।।
का आपुला ठावो न सांडिता । अलिंगिजे चंद्र प्रकटता ।
हा अनुरागु भोगिता । कुमुदिनी जाणे ।।
ऐसेनि गंभीरपणे । स्थिरावलेनि अंतःकरणे ।
अस्थिला तोचि जाणे । मानू इये ।।

अशा प्रकारे ते गंभीर आणि स्थिरही असावे लागते. अंतःकरणाची अशी एकाच वेळी कोमल आणि गंभीर अवस्था असताना वाल्मिकींनी रामायण रचनेस आरंभ केला. आरंभ केल्यानंतर ते भराभर श्लोक कसेबसे रचित गेले असे नव्हे. त्यांनी चोवीस हजार श्लोक रचले पण ते रचताना त्यातून सौंदर्याची प्रतीती व्हावी यासाठी भरपूर परिश्रम घेतले. समाससंधीची यथाशास्त्र योजना केली. प्रकृति-प्रत्यय संबंधाचा यथायोग्य निर्वाह केला. ममता साधली. वाक्यरचना न्यूनाधिकदोषरहित केली. पदात माधुर्य आणले. अर्थामध्ये प्रसादगुण ठरविला. शृंगार, करुण, हास्य, रौद्र, वीर इत्यादी रसांनी ते त्यांनी अनुप्राणित केले. चतुर्विध पुरुषार्थाचे फळ देण्यास समर्थ ठरले असे प्रभावी रूप त्यांनी त्या काव्याला दिले.

काव्य गाऊन दाखवावे लागते

काव्य नुसते रचून चालत नाही. ते लोकांपुढे गाऊन दाखवावे लागते. स्वतः कवीला आपले काव्य गाऊन दाखविता येते असे थोडेच आहे ? वाल्मिकी याबाबतीत अतिशय भाग्यवान ठरले. रामायण हे समग्र काव्य तोंडपाठ करून गाऊन दाखविण्यासाठी त्यांना

(पुढील मजकूर पान ५९९ वर)

प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा*

—सौ. कुसुम मराठे

डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांनी लिहिलेले 'प्राचीन मराठी गद्य—प्रेरणा आणि परंपरा' हे पुस्तक वाचून, डॉ. साहेबांचे मराठी भाषा, मराठी देश आणि मराठी धर्म या विषयींचे आणि मराठी साहित्यावरील प्रेम आणि जिव्हाळा दिसून येतो. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक आणि सूक्ष्म दृष्टीने विचार करून आजपर्यंत बऱ्याच प्रमाणात उपेक्षित असलेल्या मराठी गद्याची प्रेरणा आणि परंपरा संशोधिली आहे. प्राचीन मराठी साहित्याचा त्यांचा सखोल नी गाढा व्यासंग या पुस्तकाच्या पानापानातून आपणास दिसून येतो.

'ऋणानुबंध', या प्रास्ताविक विवेचनात सुरवातीसच त्यांनी केवळ योगायोगाने नी अकल्पितपणे त्यांच्या हातून हे पुस्तक लिहले गेले–इतकेच नव्हे तर अनपेक्षित नी फार थोड्या कालावधीत लिहले गेले अशी मोठी प्रांजळ आणि निरभिनिवेश प्रकट करणारी वृत्ती दाखविली आहे. हाच प्रांजळपणा आणि विद्याविनयेन शोभते अशी त्यांची अनियमित विनम्र वृत्ती या पुस्तकाच्या वचनावचनातून आढळते.

उपलब्ध प्राचीन मराठी साहित्याचा अभ्यास करून आजवर प्रसिद्ध झालेल्या साहित्य सृष्टीत विहार करून पूर्वसुरींचे ऋण मान्य करून त्यांचा योग्य तो मान देऊन त्यांना विनम्र वदना करून या निवेदनामागील आपली भूमिका त्यांनी व्यक्त केली आहे. कै. वि. ल. भावे यांच्यापासून आज तागायत मराठीतील साहित्य संशोधक, समीक्षक, इतिहास लेखक यांच्या प्रयत्नांचे महत्त्व जाणून परंतु काही ना काही कारणाने आजवर उपेक्षित असलेल्या. व दुर्लक्षित झालेल्या प्राचीन गद्याकडे ते वळले आहेत.

प्राचीन साहित्याच्या इतिहासात आणि समालोचनात विस्ताराने अधिक असलेल्या आणि विशिष्ट परंपरा लाभलेल्या पद्याचाच अधिक प्रमाणात विचार होणे कसे रास्तच होते हे सांगून त्यातूनच नकळत झालेली मराठी गद्य साहित्याची उपेक्षा सहज अभिव्यक्त केली आहे.

त्याबरोबरच गद्यसाहित्याचा अजिबात विचार झालाच नाही असे नाही तर केवळ महानुभावीय गद्य आणि बखर वाङ्मय या गद्य साहित्याचा विचार झालेला आहे ही वस्तुस्थिती निदर्शनास आणून देऊन या व्यतिरिक्त असलेल्या प्राचीन गद्य साहित्याचा विचारच आपण प्रामुख्याने करणार आहोत ही स्वतःची भूमिका स्पष्ट केली आहे. अशी परिस्थिती असल्याने 'मराठी गद्याची परंपरा' हा शब्दप्रयोगही आज वदतोव्याघात वाटण्यासारखा आहे असे म्हटले आहे.

आणि मग त्यानंतर एकदम आपले प्रमेय मांडले आहे "प्राचीन मराठी गद्यसाहित्य पद्याइतके विपुल नसले तरीही या साहित्याला प्राचीन परंपरा आहे आणि मराठी साहित्याच्या आरंभापासून तो इंग्रजी अमदानीपर्यंत या साहित्याचा विकास विशिष्ट दिशेने झाला आहे. ही वस्तुस्थिती आहे." (पान २)

ताम्रपट आणि शिलालेख इत्यादींच्या द्वारे सुरवातीस कोठल्याही भाषेत गद्यसाहित्यनिर्मिती होत असतेच. परंतु मराठी भाषेचे खास वैशिष्ट्य म्हणजे शके ९६१ च्या सुमारास श्रीपतिभट्टानेच रचलेला 'ज्योतिषरत्नमाला' हा टीकाग्रंथ गद्यातच लिहलेला आहे.

* लेखक–डॉ. श्री. रं. कुळकर्णी, M. A. Ph. D. मराठी विभाग प्रमुख, उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद सिंधु पब्लिकेशनस्, प्रा. लि. मुंबई — किं. १२–५०

या ग्रंथापासून म्हणजे शालिवाहन शके १० ते १८ पर्यंतच्या काळात झालेल्या उपलब्ध गद्यवाङ्मयाचा शोध या पुस्तकात घेतला आहे. या कालातील मराठी गद्यात अनेक प्रवाह नी परंपरा आढळतात. हे प्रवाह व ह्या परंपरा तत्कालीन समाजजीवनाशी समांतर अशा आहेत असे दाखविले आहे.

प्राचीन मराठी गद्याच्या विकासात आढळून येणाऱ्या प्रेरणांचा व कार्यकारणाचा शोध घेण्याचा हा प्रयत्न अगदी पहिलाच आणि अभिनव आहे. यापूर्वी असा प्रयत्न न होण्याचे कारण प्राचीन साहित्याचा अभ्यास संकलित दृष्टिकोनातून झालेला नाही असे दिलेले आहे.

साहित्यात कोणतेही नवे प्रवाह योगायोगाने येत नाहीत तर या नव्या प्रवाहाचे मूळ जुन्या परंपरेत वा इतिहासात दडलेले असते.

'उपेक्षित प्राचीन गद्य' ही ह्या पुस्तकाची क्षेत्रमर्यादा. अशी मर्यादा घालण्याचे कारण एकच आणि ते म्हणजे मराठी मनाच्या आशा–आकांक्षाशी गद्याचे असलेले जवळचे नाते. मराठीतील ताम्रपट आणि कोरीव लेख यांचा अंतर्भाव यात करण्यात आलेला नाही. कारण ही साधने जनमानसाचे संपूर्ण आकलन करून घेण्याच्या दृष्टीने अबोल ठरतात.

'इवलेसे रोप लावियेले द्वारी' या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे 'शके ९६१'च्या सुमारास श्रीपतिभट्टाने रचलेली 'ज्योतिषरत्नमाला' हा टीका-ग्रंथ गद्यसाहित्याची गंगोत्री होय. स्वतःचा हाच ग्रंथ मराठीत टीका करण्यास निवडण्याचे कारण त्याकाळी सामान्यांच्या जीवनात मुहूर्ताला अनन्यसाधारण महत्त्व होते आणि म्हणूनच सामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेले शास्त्र स्वभाषेच्या आधाराने समजून घेता यावे ही 'ज्योतिषरत्नमालेच्या' मराठी अवताराची प्रेरणा होय.

कालाबरोबर समाजाच्या आवडीनिवडी बदलतात आणि समाजाच्या गरजादेखील. महाराष्ट्रावरील यावनी आक्रमणाने धर्माचा पुरस्कार नव्या स्वरूपात करणाऱ्या साहित्याचा प्रारंभ झाला. ही धर्मरक्षणाची प्रेरणा होय.

प्राचीन मराठी गद्याचा इतिहास त्रिविध प्रेरणांनी घडविला आहे.

१. मराठी गद्याची पंडिती परंपरा :—जनसामान्यांत विद्येचा प्रसार व्हावा म्हणून संस्कृत साहित्याच्या आधारे निर्माण झालेले साहित्य.

२. कथाप्रधान परंपरा :—लोककथात्मक साहित्याचा आधार घेऊन धर्मप्रसार करण्याच्या हेतूने अस्तित्वात आलेले साहित्य.

३. पौराणिक परंपरा :—धर्मरक्षणाच्या प्रेरणेने पुराणोक्त धर्माचा प्रसार करणारे साहित्य. बखर-साहित्य या नावाने हे साहित्य ओळखले जाते.

समाजपरिस्थित्यनुरूप या त्रिविध प्रेरणा भिन्न-कालात साहित्यनिर्मितीस प्रेरक ठरल्या. प्रेरणांच्या त्रिविधतेने साहित्यिक सातत्यात विक्षेप निर्माण झाला नाही. उलट भाषेचे स्वरूप आणि घाट या दृष्टीने त्यात एकात्मता आढळते हे तिचे खास वैशिष्ट्य.

अशा रीतीने १ल्या प्रकरणात आपली भूमिका आणि क्षेत्र स्पष्ट केल्यानंतर पुढील तीन प्रकरणांतून या तीन प्रेरणांचा सविस्तर आणि सोदाहरण उहापोह केलेला आहे. यांतील उतारे वाचून जनमानसातील गद्यसाहित्यासंबंधीची आवड वृद्धिगत होईल असेच हे विवेचन केलेले आहे.

गद्यसाहित्याच्या प्रेरणा आणि परंपरा यांचा शोध घेत असताना पंडित परंपरेचा विस्तार अधिक झाला आहे याची कारणे मुख्यतः दोन. (१) ही परंपरा साहित्याच्या प्रारंभापासून या कालखंडाच्या अंतापर्यंत आढळते. (२) या परंपरेने अनेक परंपरांना जन्म दिला आहे.

आणि म्हणूनच या परंपरेचा लेखकाने कालशः आणि प्रवाहशः विचार केला आहे. साहित्य निर्मितीच्या दृष्टीने या परंपरेचे तीन प्रमुख कालखंड पडतात. (१) प्रारंभापासून शके १२०० पर्यंत, (२) १२०० ते १४००, (३) १५०० ते १७४० पर्यंत. त्यामुळेच या पुस्तकाच्या १६० पानांपैकी ५२ पाने या परंपरेनो व्यापलेली आहेत.

नंतर कथात्मक साहित्य हे तिसरे प्रकरण. यात मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोककथांचा विचार केलेला नाही. नीतिकथा, व्रतकथा, पौराणिक कथा आणि आख्याने यांचे धावते समालोचन करून महानुभावीय परंपरेत कथात्मक वाङ्मयास जे विशिष्ट स्वरूप आणि महत्त्व प्राप्त झाले त्याची मीमांसा केली

आहे. पंडिती परंपरेतील महानुभावीय गद्य आणि चरित्र ग्रंथातील कथात्मक साहित्य यांचा घाट वेगळा असला तरी प्रेरणा अभिन्न आहेत हे सिद्ध केले आहे.

चवथ्या प्रकरणात क ाप्रधान साहित्याचा स्वतंत्र प्रकार असलेल्या बखर साहित्याचा आढावा घेतलेला आहे. या साहित्याचा घाट आणि प्रेरणा इतर साहित्याहून भिन्न आहे.

हीच ती मराठी साहित्याची पौराणिक परंपरा असे म्हणण्याचे मुख्य कारण म्हणजे पुराणवाङ्मयाच्या पंचविध लक्षणांपैकी 'वेशानुचरित' हे लक्षण बखर वाङ्मयाला चपखल लागू पडते. धर्मरक्षण ही या साहित्याची प्रेरणा. ही प्रेरणा साकार करणाऱ्या धर्मपुरुषांचे चरित्र आख्यान हे या साहित्याचे विषय. पुराणांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही रचना झाल्याने बखर साहित्यात पुराणांचे कितीतरी गुणविशेष उतरले आहेत. स्वराज्याच्या वाढत्या आकांक्षेने या साहित्याला बहर आला. आणि स्वराज्यनिष्ठा ओसरू लागताच ते कोमेजून गेले.

अशा रीतीने पौराणिक परंपरेचा विचार करताना एक अगदी अभिनव आणि आगळे प्रमेय यांनी मांडलेले आहे. आणि म्हणूनच श्री. माडखोलकर यांच्या पत्राच्या उताऱ्यात त्यांनी म्हटल्याप्रमाणे "आपल्या या लेखात बखर वाङ्मयाविषयी आपण केलेले विवेचन मौलिक असून अनेक पूर्वग्रह आणि दुर्ग्रह यांचा निरास करणारे आहे", "बखर शब्दाची उपपत्ती चिंतनीय आहे" आणि "बखरवाङ्मयाकडेच नव्हे तर मराठ्यांच्या इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी संशोधकांना, अभ्यासकांना आणि वाचकांना देणारे हे विवेचन आहे."

या तीन प्रेरणांशिवाय प्राचीन मराठी गद्याला समृद्ध करणाऱ्या पत्रव्यवहाराचा आढावा ५व्या प्रकरणात घेण्यात आलेला आहे. या पत्रव्यवहाराच्या मुळाशी तशी कोणतीच प्रेरणा नसूनही इतिहासाचे एक अव्वल दर्जाचे साधन या दृष्टीने त्याचे असलेले वादातीत महत्त्व पटवून दिलेले आहे.

प्राचीन गद्याच्या प्रेरणांचा नी परंपरांचा अभ्यास केल्यानंतर त्यातील भाषेचे द्विविध स्वरूप लक्षात येते. टीकाभावात्मक ग्रंथांची भाषा संस्कृत वळणावर असून कालानुसार विशेष बदललेली नाही. उलट बोलीभाषेवर यावनी सत्तेचा संपर्क झाल्याने बराच परिणाम झालेला दिसतो. ऐतिहासिक कागदपत्रे नी पत्रव्यवहार यात अशी भाषा प्रामुख्याने आढळते. बखर साहित्यातील भाषेचे स्वरूप मात्र वेगळे आहे. फारशी संपर्कापासून ती फार अलिप्त आहे. अशा रीतीने समारोपात साहित्यनिर्मितीची प्रेरणा बदलली की साहित्याचा आशय नी घाट बदलत असतो हे मराठी गद्यातील भिन्न प्रवाहांचे विश्लेषण करून विशिष्ट काळात साहित्याला विशिष्ट वळण लागले ? निराळा घाट कोणत्या जाणिवेतून आकारला या प्रश्नांच्या उत्तराचा शोध घेऊन सांगितले आहे. त्याबरोबरच हा अगदी पहिलाच असा प्रयत्न आहे असे विनम्र निवेदन केले आहे. या प्रतिपादनातून समाजजीवनातील जाणीवांनी केवळ गद्य साहित्यालाच आकार दिला, पद्याला नाही असा अर्थ कोणी काढू नये याची काळजी घेतली आहे. विशेष म्हणजे प्राचीन गद्याच्या परंपरेचा नी प्रेरणांचा विचार करीत असताना जुन्या नव्या साऱ्या विचारप्रणालींचा उपयोग केला आहे. समारोपात पान १५२वर त्यांनी मार्क्सचे "जग हे कसे आहे हे तत्वज्ञ सांगतात. ते कसे असावे हे ठरविणे आमचे कर्तव्य आहे." हे वचन देऊन साहित्य निर्मितीचे स्वरूप समजून घेताना मात्र ती कशा स्वरूपाची आहे याचाच विचार महत्वाचा ठरतो असे स्वतःचे ठाम मत मांडले आहे.

पुस्तक शक्यतो अद्ययावत उपलब्ध साहित्याचे विवेचन करणारे असावे असे जाणून शेवटी एका परिशिष्टात संगीत शास्त्रावरील उपलब्ध मराठी गद्यटीकेचाही अंतर्भाव करून टाकलेला आहे. अभ्यासकाला आवश्यक असलेल्या निरागस वृत्तीचे या विवेचनात वारंवार दर्शन घडते. विवेचन मुद्देसूद असून अभ्यासपूर्ण असल्याने प्रत्ययकारी वठले आहे.

१६० पानांच्या या पुस्तकासाठी लेखकाने आजपर्यंत उपलब्ध असलेले ८१ ग्रंथ आणि अनेक नियतकालिकांचे अंक अभ्यासिले आहेत.

या पुस्तकातून लेखकाची निरभिमानी व विनम्र वृत्ती, प्रांजळपणा, तोचतोपणा व पुनरुक्ती टाळण्याचा प्रयत्न, कमावलेली भाषा इत्यादी गुणविशेष गद्यासारख्या रुक्ष विषयाचेही विश्लेषण आणि समालोचन किती वाचनीय करू शकतात हे निदर्शनास येते.

लेखकाने प्रयत्नपूर्वक हे साहित्यशिल्प तयार केलेले आहे. या शिल्पावर काही तत्त्वरूप–रत्ने अगदी

सहज अशा अलंकारिक शैलीच्या सुवर्ण-कोंदणात वसविलेली आहेत. ती या शिल्पाचे सौंदर्य खासच खुलवितात.

आयुर्वेदापासून संगीतशास्त्रापर्यंत आणि बाल-वाङ्मयापासून संशोधनपर प्रबंधापर्यंत लीलया संचार करणाऱ्या डॉ. कुळकर्णी यांच्या आजवरच्या कीर्तीत भर टाकणारे असेच हे केवळ योगायोगाने आणि मराठी वाचकांच्या सुभाग्याने तयार झालेले शिल्प झाले आहे असे म्हटल्याशिवाय शेवटी राहवत नाही.

(पान ५९५ वरून)

मुनिवेषधारी कुशलव हे राजकुमार लाभले. या राज-पुत्रांची गुणप्रशस्ती किती करावी ? ते रूपलक्षण-संपन्न होते. ते धर्मज्ञ होते. स्वरसम्राट होते. त्यांची धारणाशक्ती अद्‌भुत होती. संगीतशास्त्राचे ते जाणकार होते. ते प्रतिराम होते. असे हे कुशलव. या गुणसाग-रांनी गायिलेल्या आणि वाल्मिकींनी रचलेल्या रामायणाला

यावत् स्थास्यन्ति गिरय: सरितस्य महीतले
यावद् रामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति

असे अमर वैभव प्राप्त झाले.

श्रेष्ठ काव्य कसे निर्माण होते ?

रामायणाला हे अमर पद मिळण्याची कारणे कोणती ? वाल्मिकी रामायणात रामायणनिर्मितीची जी प्रक्रिया वर्णिलेली आहे तीवरून श्रेष्ठ काव्यनिर्मि-तीवर कोणता प्रकाश पडतो ? त्यासाठी कोणते घटक एकत्र जुळून यावे लागतात ? त्यांची क्रमश: मांडणी करावयाची झाली तर ती कशी करता येईल ?

१. श्रेष्ठ काव्यातील–महाकाव्यातील– प्रतिपाद्य विषय हा एखाद्या महापुरुषाच्या महान् चरित्राचा असावा.

२. त्या चरित्राचे कवीकडून श्रद्धापूर्वक श्रवण वा वाचन घडलेले असावे.

३. कवी निर्मलमनस्क असावा.

४. ज्यामुळे समग्र भावविश्वाला भूकंपासारखा जबरदस्त हादरा बसेल व ज्यामुळे सगळ्या भाववृत्ती तरारून उठतील अशा अनुभवाने कवीचे व्यक्तित्व तापून निघालेले असावे.

५. हा तप्त प्रक्षोभ ओसरावा, त्यावर समुचित चिंतनाचे शुभ संस्कार व्हावे.

६. हे काव्य प्रदीर्घ असले तरी ते समुचित रचनापद्धतींनी आणि रसालंकारादिकांनी योजनापूर्वक समृद्ध असावे.

७. ते काव्य गायनकुशल अशा प्रसन्न मनाच्या व्यक्तींकडून लोकांपुढे गाऊन दाखविले जावे.

८. ते चतुर्विध पुरुषार्थसाधक असावे.

९. हे काव्य रचावयाला तमसा नदीच्या परि-सराप्रमाणे शांत व पवित्र स्थल लाभावे. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात योगसाधनेला अनुकूल अशा स्थळाचे जे वर्णन केले आहे—

'अभ्यासुचि आपणयाते करी । हृदया ते अनुभव वरी ।
ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥'

ते येथे आठवावे आणि काव्यलेखन ही योगसाधनाच आहे हे लक्षात असू द्यावे.

पुस्तक परिचय

—चंद्रकांत कुळकर्णी

गडकरी जीवन चरित्र

लेखक—वि. ना. कोठीवाले
उषा प्रकाशन पुणे
मूल्य—रु. १२–५०

गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांनी १९२८ साली शंकरराव मुजुमदारांनी 'रंगभूमी' मासिक पुन्हा चालू केले. 'रंगभूमी'चा हा नवीन अवतार झाल्यानंतर मुजुमदारांनी गडकऱ्यांचे चरित्र लिहिले. गडकऱ्याशी ज्यांचा निदान एक तप अगदी निकटचा परिचय होता, आणि गडकऱ्यांचा वाङ्मयीन आणि नाटकी संसार ज्यांनी बारकाईने पाहिला होता त्या शंकरराव मुजुमदारांनी सदर चरित्र लिहिलेले असल्यामुळे त्याचे महत्त्व विशेष आहे. सदर चरित्र लहान असले तरी गडकऱ्यांचे ते पहिलेच अधिकृत चरित्र आहे. यानंतर १९३२ साली वि. स. खांडेकरांनी 'गडकरी व्यक्ति आणि वाङ्मय' हा बहुमोल ग्रंथ लिहून गडकऱ्यांचा जीवनवृत्तान्त साक्षेपाने आणि चिकित्सकपणाने दिला आहे. त्यानंतर गेल्या सदतीस वर्षामध्ये गडकऱ्यांच्या साहित्याचे विवेचन करणारे असंख्य लेख प्रसिद्ध झाले. नाटककार गडकरी (वाळिंबे), गडकऱ्यांचे अंतरंग (वाळिंबे), अप्रकाशित गडकरी इ. अनेक महत्त्वाचे ग्रंथही प्रकाशित झाले. या प्रकारचे वाङ्मय उपलब्ध असले तरी देखील गडकऱ्यांच्या सांगोपांग चरित्राची उणीव राहिली होतीच. ही उणीव या चरित्रग्रंथाने थोडयाफार प्रमाणात दूर झालेली आहे. प्रस्तुत ग्रंथाचे लेखक श्री. वि. ना. कोठीवाले. यांनी 'गर्वनिर्वाण' हे गडकऱ्यांचे अपूर्ण नाटक लिहून पूर्ण केले व ते १९४८ साली प्रसिद्ध केले.

प्रस्तुत चरित्र ग्रंथाचे लेखन मुख्यत: त्यांच्या आयुष्यात आलेल्या अनेक व्यक्तींच्या मुलाखतीवर आणि आप्तेष्टादि परिवाराच्या तोंडच्या हकीकतींवर आधारलेले आहे. गडकऱ्यांच्या मातोश्री, त्यांच्या उभय पत्नी आणि सख्खे बंधू, चुलत घराणे व मावस घराणी यांच्याकडून मिळालेल्या माहितीमुळे गडकऱ्यांच्या आजपावेतो प्रकाशित झालेल्या चरित्रवाङ्मयात नव्याने भर पडली आहे. १८८५ ते १९२० या पंधरा वर्षांच्या काळातील गडकऱ्यांच्या जीवनातील घटनांचा साद्यन्त व साधार इतिहास आजपर्यंत उपलब्ध नव्हता, हा इतिहास श्री. वि. ना. कोठीवाले यांनी बऱ्याच विस्ताराने दिला आहे. या ग्रंथाचा आणखी एक विशेष सांगायला हवा, तो म्हणजे या ग्रंथात १९०० ते १९२० या वीस वर्षांच्या कालखंडातील महाराष्ट्रीय नाटयजगताचे अनेकांगी दर्शन होते. किर्लोस्कर नाटक मंडळी, रंगभूमी मासिक, कोल्हटकर–गडकरी संबंध यासंबधी अधिक माहिती नाटयरसिकांना हा ग्रंथ वाचताना होते. 'प्रेमसन्यास', 'पुण्यप्रभाव', आणि 'राजसंन्यास' या नाटकांच्या निर्मितीचा इतिहासही त्यांनी सविस्तर व रसाळपणे सांगितला आहे. 'उपसंहार' या प्रकरणातील गडकऱ्यांचा अखेरचा आजार व दु:खद मृत्यूची हृदयस्पर्शी हकीगत प्रथमच उघडकीस आली आहे.

सुप्रसिद्ध नाटयसमीक्षक श्री. रा. शं. वाळिंबे यांची मार्मिक प्रस्तावना हे या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्टय. त्यांनी ग्रंथाचे मार्मिक परीक्षण करून त्याचे अंतरंग उलगडून दाखविले आहे या ग्रंथातील चुका दाखविताना त्यातील नवीन माहितीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला आहे.

गडकरी चरित्र ग्रंथातील एक महत्वाचा चरित्र-ग्रंथ, मराठी नाटय वाङ्मयावरील एक महत्वाचा संदर्भ ग्रंथ म्हणून या पुस्तकाला महत्त्वाचे स्थान राहील यात शंका नाही.

श्री. वि. ना. कोठीवाले हे गडकऱ्यांच्या वाङमयासंबंधी 'रामरसवंती' या संकल्पित अकराशे पृष्ठांच्या ग्रंथात सविस्तर लिहिणार आहेत. या ग्रंथाची अभ्यासक उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

२

स्वाद आणि शोध

लेखक—प्रा. श्री. रा. जहागीरदार
प्रकाशक— भा. ल. कुळकर्णी, रचना प्रकाशन,
नेहरू मार्ग, सीताबर्डी, नागपूर
मूल्य—दहा रुपये

नागपूरचे एक उत्साही व धाडशी तरुण प्रकाशक श्री. राजाभाऊ कुलकर्णी यांनी नुकताच एक समीक्षणात्मक लेखांचा संग्रह आपल्या रचना प्रकाशनामार्फत प्रसिद्ध केला आहे. हा समीक्षणात्मक लेखांचा संग्रह खामगावचे मराठीचे तरुण, व्यासंगी प्राध्यापक श्री. श्री. रा. जहागीरदार यांचा आहे. या संग्रहातील काही लेख यापूर्वी वसंत, नवभारत इ. मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत व त्याचे अभ्यासकाने चांगले स्वागत केले आहे. या पुस्तकात त्यांचे चौदा लेख संग्रहित करण्यात आले आहेत. त्यातील आठ लेख प्रथमच प्रकाशित होत आहेत. 'रामायणातील तीन आज्ञाभंग', 'महाभारतीय युद्धाचे मूळ कारण', 'भारतीय युद्धाचा नायक', 'गीतेचा उपसंहार आणि एक शब्द', 'ज्ञानेश्वरांचे स्वप्नदृष्टान्त', 'भंगलेले देऊळ' 'गडकऱ्यांचे खलनायक', 'मर्ढेकरांची सौंदर्य भावना', 'मर्ढेकर टीका आणि काव्य', 'विंदा करंदीकर : एक आस्वाद' इ. लेखांवरून लेखकाच्या प्राचीन व अर्वाचीन वाङमयाच्या सूक्ष्म अभ्यासाची कल्पना येते. विषयाची विविधता हा या समीक्षा-ग्रंथाचा महत्त्वाचा विशेष आहे.

विदर्भाचे सुप्रसिद्ध कवी व समीक्षक श्री. वा. ना. देशपांडे यांची या पुस्तकाला महत्त्वाची प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावनेत श्री. वा. ना. देशपांड्यांनी प्रा. जाहागीरदार यांच्या समीक्षाग्रंथाचा परिचय तर करून दिलाच आहे, याशिवाय 'गीतेतील चातुर्वर्ण्य' व नव्यकाव्य या विषयाची अत्यंत मार्मिक चर्चा केली आहे. ती अभ्यासकांना मार्गदर्शन करेल यात शंका नाही.

विदर्भाच्या या तरुण व्यासंगी समीक्षकाला 'स्वाद आणि शोध' या पुस्तकाच्या द्वारे मराठी वाचकांसमोर आणल्याबद्दल राजाभाऊ कुलकर्णींचे अभिनंदन. 'अस्वाद' व 'शोध' या दोन्ही प्रवृत्ती या समीक्षकाजवळ फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांच्या आगामी ग्रंथांची रसिक वाचक उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

३

(१) मी सोटे बोलतो आहे
(२) सोटेशाही

कवी—प्रा. दे. गं. सोटे, वर्धा

आपल्या निर्मळ विनोदी कवितांनी काव्य गायनाची मैफल गाजवून सोडणारे वर्ध्याचे कवी प्रा. दे. गं. सोटे यांचे वरील दोन काव्यसंग्रह वाचताना वाचकांना काव्यमैफलीचा आस्वाद घेतल्याचा पुनःप्रत्यय मिळतो. विडंबन काव्याची फार सुंदर परंपरा आचार्य अत्र्यांच्या 'झेंडूच्या फुलाने' घालून दिली. परंतु त्यानंतर याच विडंबन काव्याचे विडंबन सुरू झाले. प्रा. सोट्यांच्या काव्याने परत या काव्याला पालवी फुटणार असे वाटते. या दृष्टीने या काव्यसंग्रहाचे स्वागत करावेसे वाटते. त्यांनी आपल्या काव्यातून निवडलेले विषय खेड्यातून आणि बहुजन समाजाच्या रोजच्या जीवनातून निवडलेले आहेत व त्याला खास वऱ्हाडची पार्श्वभूमी लाभलेली आहे. 'व्हाले व्हा वाले', 'रामराव पाटलाले केसतोड झाला', 'माहा होयना म्हने माहा होयना', 'घेन्नरे बाबू खेलनं गोया' इत्यादी कवितांत चित्रित केलेले प्रसंग आणि भाषा ही दोन्ही अस्सल वऱ्हाडी असून, त्यातील विनोदाची जातही 'गावरान' आहे. अगदी गावरान आंब्याइतकी चवदार ! जीवनाकडे पाहण्याचा निरोगी दृष्टिकोन, मार्मिक निरीक्षण, जीवनासंबंधीचे प्रेम इ. गुणांमुळे सोट्यांच्या कविता या आपल्याला जवळच्या वाटतात. जीवनातील विसंगतीचा घेतलेला सुंदर 'क्लोजप' असे त्यांच्या दोन्ही काव्य संग्रहाचे वर्णन करता येईल. डॉ. वि. भि. कोलते, ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. मा. गो. देशमुख यांनी त्यांच्या काव्याचा व व्यक्तिमत्वाचा परिचय 'मी सोटे बोलतो आहे' या काव्यसंग्रहात करून दिला आहे. 'सोटेशाही'त मधुकर केचे यांनी त्यांचे सुंदर व्यक्तीचित्र काढले आहे. निर्मल विनोदाने ओथंबलेल्या त्यांच्या या कविता मराठी वाचकांनी अवश्य वाचाव्या, त्याहीपेक्षा त्यांच्या तोंडून प्रत्यक्ष ऐकण्यात अधिक मौज आहे.

संपादकीय

ज्ञानकोशाच्या प्रस्तावना खंडांचे पुनर्मुद्रण

मुंबईचे वृद्ध कार्यकर्ते श्री. रामचंद्र वासुदेव केतकर हे, डॉ. केतकर यांनी संपादन केलेल्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या पहिल्या पाच प्रस्तावना खंडांचे पुनर्मुद्रण करण्यासाठी, गेली तीन वर्षे सतत प्रयत्न करीत आहेत. या कार्याला सरकारी अनुदान मिळावे, म्हणून महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी आणि महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे त्यांनी निवेदने पाठविली. पण अजून तरी त्या निवेदनांचा अनुकूल विचार झाला असल्याचे दिसत नाही. गेल्या जानेवारीत त्यांनी मुद्दाम तर्कतीर्थांची मुंबईच्या सचिवालयात जाऊन भेट घेतली; व या मागणीचा सहानुभूतीने विचार करण्याची विनंती त्यांना केली. आम्हाला अशी उमेद आहे की, महाराष्ट्र सरकारचे शिक्षण खाते आणि महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ ही दोन्हीही, या पुनर्मुद्रणाच्या कामाचे महत्त्व ध्यानात घेऊन, त्याला जरूर ते अनुदान देतील.

डॉ. केतकर यांचे प्राचीन भारतीय वाङ्मय आणि इतिहास यांच्यासंबंधीचे मौलिक संशोधन आणि चिंतन या दोहोंचा परिपाक या प्रस्तावना खंडांत उतरलेला आहे. त्यात डॉक्टरसाहेबांनी काढलेले सर्वच निष्कर्ष, व्यक्त केलेले अभिप्राय आणि मांडलेली नवीन प्रमेये सर्वांना मान्य होतील, असे कोणीहि समजत नाही. त्याचप्रमाणे, त्यांनी जे माहितीचे प्रचंड संकलन या खंडांत केलेले आहे, ते गेल्या पन्नास वर्षांतील नवीन संशोधनामुळे अपुरे वाटावे, हेही अगदी साहजिक आहे. तरी सुद्धा, हे प्रस्तावना खंड पुनर्मुद्रित होऊन संशोधक आणि अभ्यासक यांच्यापुढे येणे अवश्य आहे, असे वाटते. कारण, त्यांतील संशोधन, संकलन आणि चिंतन ही तिन्ही अभ्यासकांना आणि संशोधकांना, इतक्या कालावधीनंतरही, निःसंशय उपयुक्त आणि विचारार्ह वाटतील. म्हणूनच, महाराष्ट्रातील सर्व साहित्यसंस्थांनी आणि मराठी साहित्य महामंडळानेही श्री. केतकर यांच्या या मागणीला पाठिंबा दिलेला आहे. ही गोष्ट ध्यानात घेऊन महाराष्ट्र सरकारने आणि महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळानेही या खंडांच्या पुनर्मुद्रणासाठी जरूर ती आर्थिक मदत करणे सर्वथैव इष्ट होईल.

त्याबरोबरच, श्री. केतकर यांनी या बाबतीत आणखीही प्रयत्न करणे अवश्य आहे, असे आम्हाला वाटते. केंद्रीय सरकारचे सांस्कृतिक खाते आणि साहित्य अकादमी ही दोन्ही अशा प्रकारच्या कामाला आर्थिक सहाय्य करीत असतात. उदाहरणार्थ, इतिहासाचार्य राजवाडे यांचे संशोधनात्मक वाङ्मय अत्यंत वादग्रस्त असतानादेखील, खुद्द तर्कतीर्थांनीच संपादन केलेला त्यांच्या महत्त्वाच्या लेखांचा संग्रह 'राजवाडे लेखसंग्रह' या नावाने अकादमीने प्रसिद्ध केलेला आहे. म्हणून, श्री. केतकर यांनी या कामी अकादमीचीही मदत मागणे इष्ट होईल. त्याचप्रमाणे केंद्रीय सरकारच्या सांस्कृतिक खात्याकडेही त्यांनी मदतीसाठी निवेदन पाठवणे तितकेच अवश्य आहे. या दोन स्वकीय दात्यांबरोबरच युनेस्कोची जी भारतीय शाखा दिल्ली येथे आहे, तिच्याकडेही त्यांनी आर्थिक सहाय्य मागितले पाहिजे. त्यांनी जर सर्व बाजूंनी असा प्रयत्न केला, तर या पुनर्मुद्रणाच्या कामासाठी जो बराच खर्च लागेल, तो भागण्याची शक्यता उत्पन्न होईल. श्री. केतकर या सूचनांचा अगत्याने विचार करतील, अशी आम्हाला आशा आहे.

क्षमस्व

'युगवाणी'चा हा एप्रिलचा अंक वाचकांच्या हाती पंधरा दिवस उशिराने पडत आहे, याबद्दल आम्ही वि. सा. संघाच्या सदस्यांची आणि आमच्या सर्व वाचकांची क्षमा मागतो. मात्र या विलंबाला नारायण मुद्रणालयाच्या अनपेक्षित अडचणीच कारण झाल्या, हे सांगणे अवश्य आहे. 'युगवाणी'चे संपादकत्व प्रस्तुत लेखकाकडे आल्यापासून त्याने आपल्याकडून अंक शक्य तितके चांगले आणि वेळेवर काढण्याची दक्षता घेतलेली आहे; व आतापर्यंत निघालेल्या अंकांबद्दल अनेक विद्वानांनी आणि कार्यकर्त्यांनी समाधानही व्यक्त केलेले आहे. पण, या महिन्यात अंक निघावयाला झालेला विलंब ही संपादकाच्या आटोक्यापलिकडली गोष्ट आहे. पुन्हा असा विलंब होऊ नये, म्हणून संपादक आणि मुद्रक हे दोघेही प्रयत्न करतील, असे आश्वासन आम्ही शेवटी देतो. —संपादक

संघवार्ता

श्री. मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

संमेलनाध्यक्ष श्री. शंकरराव सुरडकर यांचा सत्कार

आर्वी येथे दि. १४ व १५ फेब्रुवारी १९७० रोजी झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या २८ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. शंकरराव सुरडकर यांचा सत्कार दि. ३ फेब्रुवारी रोजी सायं. ६–३० वा. संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

सुरवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी श्री. सुरडकरांचा परिचय करून दिल्यानंतर अध्यक्षांनी पुष्पहार घालून व गुच्छ देऊन सुरडकर दाम्पत्याचा सत्कार केला.

यावेळी श्री. शंकररावांनी केलेल्या साहित्य सेवेचा गौरव करण्यात आला.

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. ना. रा. शेंडे, प्राचार्य या. मु. पाठक व प्रा. या. वा. वडसकर यांची गौरवपर भाषणे झाली.

याच प्रसंगी श्री. शंकरराव सुरडकरांचा, नागपुरातील अनेक संस्थांतर्फे पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

नाट्य समिती

नटश्रेष्ठ श्री. नानासाहेब फाटक यांचा सत्कार

विदर्भ साहित्य संघाची नाट्य समिती, नागपुरातील नाट्य संस्था आणि नाट्य रसिकांतर्फे गडकरी सभागृहात बुधवार, दि. ११ फेब्रुवारी १९७० रोजी सायंकाळी ६–३० वाजता नटश्रेष्ठ श्री. नानासाहेब फाटक यांचा ७१व्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

सुरुवातीला नाट्य समितीचे आमंत्रक श्री. अरविंद जहागीरदार यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर संस्थेतर्फे पुष्पहार घालून व गुच्छ देऊन सत्कार केला. नागपुरातील अन्य संस्था व रसिकांतर्फेही पुष्पहार घालून नानासाहेबांचा गौरव करण्यात आला.

विदर्भ साहित्य संघ, रंजन कलामंदिर, रंगरेखा, उत्कर्ष कलामंदिर आणि नागपूरकर यांचेकडून नटश्रेष्ठांना एक चांदीचे तबक भेट म्हणून देण्यात आले.

याचप्रसंगी ॲड. श्री. हु. ना. वैद्य, श्री. सखारामपंत जोशी, श्री. दि. ब. पंडित, श्री. शरद तळवलकर आणि डॉ. ढेकणे यांची गौरवपर भाषणे झाली.

शेवटी आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

अनुक्रमणिका

श्री तिलक यशोऽर्णव ग्रथाचे प्रकाशन

विदर्भ साहित्य संघ, विदर्भ संशोधन मंडळ, आणि श्री तिलक यशोऽर्णव प्रकाशन समिती पुणे या संस्थांच्या वतीने शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी १९७० रोजी सायंकाळी ६—०० वाजता कै. बापूजी अणे यांनी लिहिलेल्या 'श्री तिलक यशोऽर्णव' या काव्यमय संस्कृत ग्रंथाचे प्रकाशन, महाराष्ट्राचे हंगामी राज्यपाल श्री. एस्. पी. कोतवाल यांच्या हस्ते, वैदिक पद्धतीने वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात झाले.

या ग्रंथाचे प्रमुख संपादक डॉ. आर. एन. दांडेकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यानंतर मान्यवर श्रेष्ठींकडून आलेल्या संदेशांचे वाचन झाले.

यानंतर राज्यपालांचा पुष्पमाला घालून सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्यपाल एस्. पी. कोतवाल, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. वा. वि. मिराशी, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणे झाली.

शेवटी श्री. आचार्य भागवत यांनी आभार प्रदर्शन केले.

डॉ. दप्तरी लेखसंग्रहाचे प्रकाशन–

विदर्भ साहित्य संघ आणि डॉ. दप्तरी ग्रंथ प्रकाशन समिती, नागपूर या संस्थांच्या वतीने गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी १९७० रोजी सायंकाळी ५ वाजता गडकरी सभागृहात कै. भाऊजी दप्तरी यांच्या पुण्यतिथीदिनी 'डॉ. दप्तरी लेखसंग्रह : खंड पहिला' या ग्रंथाचे प्रकाशन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते झाले.

सुरुवातीला तर्कतीर्थांनी डॉ. दप्तरी यांच्या प्रतिमेला पुष्पमाला घातली.

प्रास्ताविक भाषणानंतर वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींना पुष्पमाला घालून सत्कार केला. नंतर 'डॉ. दप्तरी लेखसंग्रह खंड पहिला' या ग्रंथाचे प्रकाशन झाले.

यावेळी लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. सुरेश म. डोळके आदींची भाषणे झाली.

या कार्यक्रमाचे वेळी श्री. दि. ब. पंडित यांनी आभार मानल्यानंतर हा कार्यक्रम संपला.

कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा १९६९–७०

नाट्य समितीतर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा, दि. २४, २५ व २६ फेब्रुवारी १९७० रोजी, रोज रात्री ८ वाजता धनवटे रंगमंदिरात झाली. या स्पर्धेत एकूण खालील ११ संस्थांनी एकांकिका सादर केल्या.

मंगळवार दि. २४ फेब्रुवारी १९७०

(१) **बदामराणी चौकट गुलाम**—ले.–कै. पद्माकर डावरे, धरमपेठ महाविद्यालय, नागपूर

(२) **गाते धरण सप्तसुरांनी**—ले. प्रा. मनोहर रोकडे लिखित, कला संपदा, नागपूर

(३) **मद्रासीने केला मराठी भ्रतार**—ले.–प्रा. वसंत कानेटकर, व्ही. आर. सी. ई. जिमखाना, नागपूर

बुधवार दि. २५ फेब्रुवारी १९७०

(१) वेडी आशा आंधळी गरज--ले.-वामन पात्रीकर, नागपूर रसिक कला संघ, नागपूर
(२) निरोप--श्री. वसंत सबनीसकृत, गंधर्व कलामंदिर, नागपूर
(३) स्त्री पात्राच्या शोधात--ले.--श्री. वळवंत लामकाणे सुरुचि निकेतन, नागपूर
(४) सत्य--ले.-श्री. रत्नाकर मतकरी, रंगरेखा, नागपूर

गुरुवार दि. २६ फेब्रुवारी १९७०

(१) बळी--ले. श्री. विजय तेंडुलकर, पोस्टल ऑडिट रिक्रिएशन क्लब, नागपूर
(२) जावई शोध--ले.-पुरुषोत्तम दारव्हेकर, उत्कर्ष कलामंदिर, नागपूर
(३) विठ्ठल तो आला आला--ले.-श्री. पु. ल. देशपांडे, स्टाफ रिक्रिएशन क्लब, बँक ऑफ इंडिया, नागपूर
(४) जनावर--ले. श्री. शं. ना. नवरे, रंजन कलामंदिर, नागपूर

या स्पर्धेत परीक्षक म्हणून श्री. आनंदराव जोग, प्रा. प्रमोद पंडित, श्री. मधुकर डांग्रे यांनी सहकार्य दिल्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे.

गडकरी स्वगत स्पर्धा १९७०

गडकरी स्मारक समितीच्या वतीने मागील वर्षीप्रमाणेच गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी १९७० रोजी सायंकाळी ६ वाजता विद्यालयीन आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गडकरी स्वगत स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत कु. वीणा म. ओक, हर्षवर्धन निमखेडकर, कु. संध्या जोग, कु. इरा पाटील कु. नीलिमा साठे, चंद्रशेखर साल्पेकर, किशोर चिं. भट, दिलीप श्री. टाकळकर व कु. मेघना मेंढेकर यांनी शालेय गटात व श्री. अनिल पेंडसे यांनी महाविद्यालयीन गटात भाग घेतला.

यावेळी परीक्षक म्हणून श्री. राजा पाठक यांनी सहकार्य दिल्याबद्दल संस्था त्यांची अत्यंत आभारी आहे.

'वैदर्भीय काव्यदर्शन'

वि. सा. संघाच्या स्वर मंडळातर्फे रविवार दि. १५ फेब्रुवारी १९७० रोजी आर्वी येथील विदर्भ साहित्य संमेलनात 'वैदर्भीय काव्यदर्शन' कार्यक्रम सादर करण्यात आला.

स्वरमंडळाने रविवार दि. १ मार्च १९७० रोजी महाराष्ट्र राज्याच्या परिचय केंद्रातर्फे नवी दिल्ली येथे 'वैदर्भीय काव्यदर्शन' हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाला सर्वश्री आ. रा. देशपांडे, प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. बाळकृष्ण केसकर, विठ्ठलराव घाटे, प्रा. अनंत काणेकर, डॉ. सरोजिनी बाबर आदी मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती.

स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ

श्री. खोलकुटे आंतर महाविद्यालयीन ढाल नाट्य स्पर्धा, कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा आणि कै. गडकरी स्वगत स्पर्धा, या तिन्ही स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ, शनिवार, दि. ७ मार्च १९७० रोजी सायंकाळी ६-३० वाजता मुंबईच्या 'नाट्यसंपदा'चे सूत्रधार आणि सुप्रसिद्ध नट श्री. प्रभाकर पणशीकर यांच्या हस्ते गडकरी सभागृहात झाला.

नाट्यसमितीचे आमंत्रक श्री. अरविंद जहागीरदार यांनी प्रास्ताविक भाषणानंतर श्री. पणशीकरांचे पुष्पहार घालून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नंतर निम्नलिखित विजेत्यांना श्री. पणशीकरांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली.

पारितोषिक वितरण

खोलकुटे ढाल विजेते—

सीताबाई आर्टस कॉलेज, अकोला,
प्रयोग—काका किशाचा

सर्वोत्कृष्ट अभिनय—पुरुष भूमिका—वैयक्तिक पारितोषिक

श्री. भैय्या भागवत– सीताबाई आर्टस् कॉलेज, 'काका किशाचा' मध्ये 'किशा'ची भूमिका केल्याबद्दल आणि **सर्वोत्कृष्ट अभिनय स्त्री भूमिका—वैयक्तिक** पारितोषिक

कु. ज्योती पेंडसे— मेडिकल कॉलेज, नागपूर 'चोरावर मोर' मध्ये 'तारा'ची भूमिका केल्याबद्दल

कै. पद्माकर डावरे ढाल विजेते—रंजनकला मंदिर, नागपूर

एकांकिका—'जनावर.' सर्वोत्कृष्ट एकांकिकेचे रोख रु. ५० चे **प्रथम** पारितोषिक—रंजनकला मंदिर, नागपूर. एकांकिका—जनावर.

एकांकिकेचे द्वितीय पारितोषिक— रोख रुपये ३० चे चित्रकला महाविद्यालय, नागपूर. एकांकिका—'मद्रासीने केला मराठी भ्रतार'

सर्वोत्कृष्ट अभिनयाची वैयक्तिक पारितोषके—

प्रथम पारितोषिक–रुपये १५

'रंगरेखा' नागपूरने सादर केलेल्या 'सत्य' या एकांकिकेत 'दुसरा तरुण'ची भूमिका केल्याबद्दल श्री. अविनाश सोनक यांना मिळाले.

द्वितीय पारितोषिक–रुपये १० चे

रंजन कलामंदिरने सादर केलेल्या 'जनावर' या एकांकिकेत 'दुसरा इसम'ची भूमिका केल्याबद्दल श्री. नरेश जोशी यांना मिळाले.

ततीय पारितोषिक–रुपये ५ चे

चित्रकला महाविद्यालयाने सादर केलेल्या 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' या एकांकिकेत 'मनकर्णिका' ची भूमिका केल्याबद्दल कु. नंदिनी फाटक यांना मिळाले.

कै. गडकरी स्वगत स्पर्धा—

मुलांच्या गटात—

प्रथम पारितोषिक–रुपये २० चे

हर्षवर्धन निमखेडकर, हडस हायस्कूल, नागपूर

द्वितीय पारितोषिक–रुपये १५ चे

चंद्रशेखर साल्पेकर, हडस हायस्कूल, नागपूर

मुलींच्या गटात—

प्रथम पारितोषिक–रुपये २० चे

कु. इरा पाटील, हडस हायस्कूल, नागपूर

द्वितीय पारितोषिक–रुपये १५ चे

कु. नीलिमा साठे, हडस हायस्कूल, नागपूर यांना मिळाले.

यावेळी श्री. प्रभाकर पणशीकर यांचे व्याख्यान झाले. कै. गडकरी स्वगत स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषके देण्याकरिता अॅड. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी रुपये ७५ ची देणगी दिल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

श्री. ल. श्री. वाकणकर यांचे व्याख्यान

संस्थेतर्फे सोमवार दि. १६ मार्च १९७० रोजी मुंबईचे सुप्रसिद्ध लिपीतज्ज्ञ श्री. ल. श्री. वाकणकर यांचे 'आपली लिपी व गणेशविद्या' या विषयावर प्रात्यक्षिकांसह सुश्राव्य व्याख्यान झाले.

सुरुवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी श्री. वाकणकरांचा परिचय करून दिल्यानंतर संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले.

शेवटी आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

दुर्मिळ मासिकांची देणगी

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला, संस्थेचे आजीव सदस्य श्री. विनायकराव अळेकर यांनी आपल्या बहुमोल ग्रंथसंग्रहालयातील महत्त्वाची दुर्मिळ मासिके भेट म्हणून दिली. याबद्दल संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, शाखा वणी (यवतमाळ)

दोन उत्कृष्ट प्रकाशने

अक्षर–माधव

कै. लोकनायक बापूजी अणे यांच्या मौलिक व वेचक वाङमयीन लेखांचा हा संग्रह. राजकारण-धुरंधर बापूजींच्या एका वेगळ्या पैलूंचे मनोरम दर्शन घडविणारा हा संग्राह्य ग्रंथराज. या ग्रंथाचे साक्षेपी संपादन महाराष्ट्रातील नामवंत कवी व साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर यांनी केले असून, मराठीतील सव्यसाची पत्रपंडित आणि ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संपादित लेखांचा परामर्श घेणारी मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे.

डेमी आकार : पृष्ठसंख्या ३५० **किंमत १० रुपये**

पदाती

विदर्भातील जुन्या पिढीतील एक नामवंत कवी श्री. ना. मा. सरपटवार यांच्या नियत-कालिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या निवडक कवितांचा हा काव्यसंग्रह. या संग्रहाला मराठीतील मान्यवर कवी व रसिक काव्यसमीक्षक प्रा. भ. श्री. पंडित यांची रसोद्ग्राही प्रस्तावना लाभली आहे. तसेच आदरणीय अप्रबुद्ध, श्री. य. गो. जोशी, कविवर्य वा. ना. देशपांडे, पद्मभूषण लोकनायक अणे, पद्मभूषण य. दि. पेंढरकर, पद्मश्री ग. दि. माडगूळकर प्रभृतींनी कवितेबद्दल गौरवपर उद्गार काढले आहेत.

पृष्ठसंख्या ८० **किंमत : तीन रुपये**

अनुक्रमणिका

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१
मुद्रणस्थळ : नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर–१